**सभापतीस्थानी - मा.सभापती**

**पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे**

**पनवेल (जि.रायगड) येथील सर्व्हे नं.215, 216 या सिडकोच्या भूखंडावर केलेले बेकायदेशीर बांधकाम**

**(1) *12778 श्री.परशुराम उपरकर, डॉ.दिपक सावंत , श्री.रामदास कदम** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) रायगड जिल्ह्यातील पनवेल येथील सर्व्हे नं.215, 216 पैकी 243, 244, 245 मधील सिडको जमिनीवर बेकायदेशीर बांधकाम केल्याबाबत व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी जिल्हाधिकारी यांना सदर बांधकामे स्थगित करण्याबाबत दिनांक 21 सप्टेंबर, 2010 रोजी कळविले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, बेलापूर-पनवेल रेल्वे प्रकल्पासाठी जमीन वापरून शिल्लक राहिलेल्या जमिनीचा ताबा सिडकोकडे देऊन अंतिम भूखंड क्र.365/1, 365/2 या सिडकोच्या जमिनीत पनवेल नगरपालिकेने स्वत:चे आरेखन केले आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, नगरपालिकेच्या आरेखनामुळे व बांधकामाच्या परवानगीमुळे सुमारे 4 टॉवर बांधून 300 ते 400 सदनिकांची विक्री केली आहे, हे खरे आहे काय,

(4) तसेच,उर्वरित जमीन मालकांपैकी श्री.यशवंत भगत यांनी सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय ?

**श्री.भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण** : (1) हे खरे आहे.

(2) व (3) सिडकोसाठी संपादित करण्यात आलेले क्षेत्र व नगरपालिकेचे क्षेत्र यांची संयुक्त मोजणी करण्यात आली असून हद्द निश्चिती नंतर नेमकी वस्तुस्थिती काय आहे, हे पाहून योग्य ती कार्यवाही सिडकोमार्फत करण्यात येईल.

(4) श्री.यशवंत भगत यांनी मा.उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली असून ती प्रलंबित आहे.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, याठिकाणी जी जमीन संपादित केलेली आहे आणि त्याबाबत तेथील श्री.जितेंद्र टिबांडिया हे दर वाढविण्यासाठी कोर्टामध्ये गेले हे खरे आहे काय,तसेच यापूर्वी जमिनीची दोन वेळा मोजणी होत असताना त्यामध्ये व्यत्यय कोणी आणला आहे,त्यानंतर आता सदरहू जमिनीची मोजणी झालेली असेल तर त्यामध्ये काय निष्पन्न झाले आहे, कारण जमिनीची मोजणी होऊन आता जवळजवळ 10 ते 12 दिवस झालेले आहेत आणि तेथे असलेल्या या शासकीय भूखंडाबाबत नगरपालिकांमधील अधिकाऱ्यांनी ज्या परवानग्या दिलेल्या आहेत, त्या अधिकाऱ्यांवर काही कारवाई करणार आहात काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय,सन्माननीय सदस्यांनी एकाच वेळी चार प्रश्न उपस्थित उपस्थित केलेले आहे. त्यांनी पहिला प्रश्न असा विचारला की, येथील जागेचा दर वाढण्यासाठी ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12778 . . . .

श्री.भास्कर जाधव . . . .

श्री.टिंबाडिया कोर्टामध्ये गेला होता काय ? तर याबाबत सांगणे थोडे अवघड आहे. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न असा विचारला की, ही जागा मोजण्यासाठी कोणी अडथळे आणले आहेत ? ही गोष्ट खरी आहे की, श्री.टिंबाडिया यांच्या माणसांनी ही जागा मोजण्यासाठी अडथळे आणले. सन्माननीय सदस्यांनी तिसरा प्रश्न विचारला की, तालुका भूमी अभिलेख यांनी दि.17-03-2011 रोजी जी मोजणी केली, त्या मोजणीमध्ये ही जागा निश्चितपणे कोणाची झाली आहे ? याबाबतीत सांगावयाचे तर हल्लीच मोजणी झालेली आहे. म्हणून निश्चितपणे ही जागा कोणाची आहे याबाबत अहवाल आलेला नाही. सन्माननीय सदस्यांनी चौथा प्रश्न असा विचारला की, नगरपालिका असेल किंवा सिडको असेल तर ज्यांनी या बांधकामासाठी परवानगी दिली आहे, त्याबाबतीत काय कारवाई करण्यात आली आहे ? याबाबतीत सांगावयाचे तर 1986 मध्ये पनवेल नगरपालिकेची टी.पी.स्किम मंजूर झाली. त्यावेळेलाच राईट ऑफ रेकॉर्डला ही जागा निश्चितपणे कोणाची आहे याची नोंद झालेली नाही. 1992, 1993 आणि 1994 च्या दरम्यान येथे रेल्वेसाठी जागा संपादित करण्याचे काम करण्यात आले. परंतु त्याही वेळेला ही जागा निश्चित कोणाची होती यासंबंधी 7:12 ला नोंद होऊ शकली नाही. त्यामुळे या अनुषंगाने काही प्रश्न उपस्थित झालेले आहेत. त्याबाबतीत जिल्हाधिकारी यांनी सुध्दा अशी माहिती दिलेली आहे की, एन.ए.प्रकरण मंजूर केलेले आहे. नगरपालिकेने त्यांना परवानगी दिलेली आहे. परंतु आता याचे जॉईंट मेजरमेंट झाल्यामुळे ही जागा नक्की कोणाची आहे हे निश्चित होईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी जे प्रश्न विचारले आहेत. त्याप्रमाणे तेथील तहसीलदार डॉ.संदीप माने यांनी येथील बांधकाम बेकायदेशीर असल्याबाबत अहवाल दिलेला आहे हे खरे आहे काय ? जर तसे असेल तर मग जागा कोणाची आहे याबाबत अजून स्पष्टता झालेली नाही असे माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सांगितले आहे, त्या उत्तरामध्ये आपण काही सुधारणा करणार आहात काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, याठिकाणी तशा प्रकारचा कोणताही अहवाल प्राप्त झाल्याची माहिती नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सांगितले की, सदरहू जागा कोणाची आहे हे रेकॉर्डवर उपलब्ध नाही. परंतु याबाबतीत सर्व्हे केला तर 40 वर्षा-

पूर्वीचे रेकॉर्ड उपलब्ध असते. ज्यावेळी सिडकोने या परिसरामध्ये भूसंपादन केले किंवा जर नगरपालिकेच्या स्वत:च्या मालकीची जागा असेल तर त्यावेळी या जागेच्या बाबतीत सर्च रिपोर्ट घेतला होता काय किंवा 6-अ च्या उताऱ्यामध्ये पूर्वी या जागेची मालकी कोणाकडे होती याबाबत सिडकोने पहाणी केली होती काय ? तसेच सिडकोने सर्व जमिनीचे ॲक्वीझिशन केले.परंतु त्यावेळच्या ॲक्वीझिशनबाबत जे रेकॉर्ड उपलब्ध आहे, त्यामध्ये ॲक्वीझिशनपूर्वी या जमिनीबाबत वस्तुस्थिती काय होती ?

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12778....

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या प्रश्नाच्या बाबतीत असे झाले आहे की, ही जमीन ज्या मूळ मालकाची होती त्यांच्याकडून ती सिडकोने संपादित केलेली आहे आणि सिडकोकडून त्या जमीन मालकाला कॉम्पेन्सेशन देखील मिळालेले आहे. कॉम्पेन्सेशन मिळाल्यानंतर सुध्दा मी मघाशी म्हटल्याप्रमाणे रेकॉर्ड ऑफ राईटला सिडकोच्या नावाची नोंद व्हावयास पाहिजे होती ती नोंद होऊ शकलेली नाही, याचा फायदा घेऊन या जमीन मालकाने ही जागा या बिल्डरला विकली आहे. तसे बघितले तर ही जागा वेगवेगळया दोन-तीन लोकांकडे जाऊन ती या बिल्डरपर्यंत आलेली आहे. या बांधकामा करिता नगरपालिकेने परवानगी दिली आहे. तसेच जिल्हाधिकाऱ्याने सुध्दा एन.ओ.सी. दिली आहे. रेल्वे बोर्डाकडून सुध्दा या बिल्डरला एन.ओ.सी. मिळालेली आहे. परंतु ही मूळ जागा ज्या मालकाची होती त्याने कॉम्पेन्सेशन घेऊन ही जागा सिडकोला दिल्याचा पुरावा आहे. ही जागा विकण्यात आली, ही वस्तुस्थिती आहे. म्हणून 7/12 च्या उताऱ्यावर नोंद नसली तरी आज ही जागा सिडकोची आहे.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, याबाबत सिडकोच्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन आणि सदर जागा सिडकोची आहे हे मान्य करुन सिडकोच्या अधिकाऱ्यांनी सदर जागा सिडकोच्या मालकीची असल्याचे जिल्हाधिकाऱ्याला कळविले आहे, हे खरे आहे काय आणि ही जागा सिडकोच्या ताब्यात देण्यात येणार आहे काय?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, दिनांक 17/3/2011 रोजी या जागेची मोजणी झालेली आहे. या मोजणीमध्ये ही जागा आता नक्की कोणाची आहे हे सिध्द झाल्यानंतर हा प्रश्न निकाली निघेल.

-----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**हडपसर (जि.पुणे) येथील परिसरातून वाहणाऱ्या कालव्यात कचरा व डेब्रिज टाकणाऱ्यांवर करावयाची कारवाई**

**(2) * 13967 श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती अलका देसाई, श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.चरणसिंग सप्रा, श्री.सुभाष चव्हाण** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) हडपसर (जि.पुणे) येथील परिसरातून वाहणाऱ्या डाव्या व उजव्या मुळा-मुठा कालव्यात कचरा व डेब्रिज टाकल्याने त्यास कचराकुंडीचे स्वरुप प्राप्त झाल्याचे माहे जानेवारी, 2011 मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या कालव्यात टाकण्यात येत असलेला कचरा थांबविण्याबाबत तसेच कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्या करिता** : (1) हडपसर परिसरातील वाहणाऱ्या डाव्या व उजव्या मुळामुठा कालव्यामध्ये त्या परिसरातील नागरिकांकडून कचरा व राडारोडा टाकल्याचे दि.5.7.2010 रोजी निदर्शनास आले होते.

(2) कालव्यात टाकण्यात आलेला कचरा व राडारोडा साफ करण्यात आला असून, या कालव्यात टाकण्यात येत असलेला कचरा थांबविणेबाबत उपद्रव शोधपथक व आरोग्य निरीक्षकांमार्फत दंडात्मक कार्यवाही करण्यात येत असून, प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणुन 15 फुट उंचीची संरक्षण जाळी बसविण्याचे काम केलेले आहे.

संबंधित भागात नागरिकांना कचरा टाकण्याकरिता कचरा कंटेनरची व्यवस्था केलेली आहे. कालव्यालगतच झोपडपट्टीमध्ये घरोघरचा कचरा गोळा करुन त्याची परस्पर विल्हेवाट लावण्याकरीता "स्वच्छ" या अशासकीय संस्थेचे कचरा वेचक लावण्यात आलेले आहेत.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, तारांकित प्रश्न क्रमांक 13967.

श्री. भास्कर जधव :सभापती महोदय, छापील उत्तरामध्ये मी आपल्या अनुमतीने थोडी दुरुस्ती करु इच्छितो. उत्तर क्रमांक 2 मध्ये उपाययोजना म्हणून 15 फूट उंचीची संरक्षण जाळी बसविण्याचे काम केलेले आहे, असे म्हटले आहे. त्या ऐवजी 5 ते 15 फूट उंचीची असे वाचावे.

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, जुना आणि नवा कालवा पुणे शहरात आहे. नवीन कालव्यातून पाणी सोडण्यात येते आणि जुन्या कालव्यामध्ये राजरोजसपणे राडारोडा असेल किंवा कचरा टाकण्यात येतो, त्यामुळे त्या ठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे, त्यामुळे त्या ठिकाणी अनारोग्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्याचप्रमाणे या ठिकाणी 55 टक्के

झोपडपट्टी झालेली आहे. जलसंपदा विभागाची ही जागा आहे. या ठिकाणी संरक्षित जाळी बसविण्यासाठी शासनाने तरतूद केलेली आहे काय? तसेच या ठिकाणी राडारोडा टाकण्याचे काम चालू असल्यामुळे अनारोग्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्याला कोण जबाबदार आहे व त्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13967....

श्रीमती दिप्ती चवधरी.....

बाबतीत कोणती कारवाई करण्यात येणार आहे? जलसंपदा विभागाचे म्हणणे असे आहे की, या जागेचा ताबा त्यांच्याकडे आहे पण या जागेचे संरक्षण करण्याची जबाबदारी महापलिकेची आहे. तर ही जबाबदारी नक्की कोणाची आहे?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, पुणे शहरातून नवीन मुळामुठा कालवा जवळ जवळ 22 कि.मी. आणि जुना मुळामुठा कालवा 26 कि.मी. लांबीचा असून तो पश्चिमेकडून पूर्वेकडे जातो. हडपसर शहरामधून 8 कि.मी.लांबीचा नवीन मुळामुठा कालवा जातो आणि 12 कि.मी.लांबीचा जुना कालवा जातो. जुना कालवा बंद आहे. हा कालवा बंद असला तरी या कालव्याच्या दोन्ही बाजूला मोठया प्रमाणात वस्ती निर्माण झालेली आहे. सभापती महोदय, माणसाचा स्वभावधर्म असा आहे की, आपल्या घराच्या दरवाज्यात उभे रहावयाचे आणि असलेला कचरा प्लास्टिकच्या पिशवीत बांधून सहज मागे भिरकावून द्यावयाचा. अशा प्रकारे या ठिकाणी मोठया प्रमाणात कचरा साठत होता. या संदर्भात महानगरपालिकेने 1 कोटी 30 लाख रुपये खर्च करुन जुन्या कालव्याच्या ठिकाणी 4 कि.मी आणि नवीन कालव्याच्या ठिकाणी 1.400 कि.मी. लांबीची पाच ते पंधरा फुट उंचीची तारेची जाळी बांधलेली आहे, त्या पुढे सुध्दा जाळी बांधण्याची आवश्यकता आहे. या संदर्भात कालच इरिगेशनच्या अधिकाऱ्यांना बोलावण्यात आले होते. महानगरपालिकेची स्वच्छता ठेवणे ही जबाबदारी आहे. परंतु हा कालवा जलसंपदा विभागाचा आहे तेव्हा जलसंपदा विभागाने सुध्दा याबाबतीतील जबाबदारी उचलली पाहिजे, याची जाणीव करुन देण्यात आलेली आहे.

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, उत्तरात असे म्हटले आहे की, "कचरा आणि राडारोडा टाकल्याचे दिनांक 5/7/2010 रोजी निदर्शनास आले होते." त्यामुळे त्याची सफाई त्या वेळेला करण्यात आलेली आहे. परंतु पुन्हा आठ-नऊ महिन्याच्या कालावधीमध्ये पुन्हा तशीच परिस्थिती झालेली आहे तेव्हा या पुढे याबाबतीत काय कारवाई करण्यात येणार आहे?

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13967 .....

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे मी म्हणालो की, त्या ठिकाणी इरिगेशन विभागाच्या अधिकाऱ्यांना बोलावून त्यांनी सुध्दा स्वत:चे कॉन्ट्रिब्युशन द्यावे अशी कल्पना दिलेली आहे. त्या ठिकाणी 'स्वच्छ' नावाची संस्था आहे. त्या संस्थेकडे त्या भागातील संपूर्ण साफसफाई करण्याची, स्वच्छता करण्याची जबाबदारी दिलेली आहे. त्यांनी सुध्दा त्या ठिकाणी उपद्रवशोधक पथक नेमून, त्यामध्ये माजी सैनिक वगैरे नेमून, खाजगी संस्थेकडून साफसफाई करण्याचे काम मोठ्या प्रमाणावर करुन घेण्याचे महानगरपालिकेकडून सुरु आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, डेब्रिज कोठे टाकावयाचे या बाबत नियम केलेले आहेत. खरे म्हणजे हा प्रश्न जलसंपदा विभागाचा आहे. ज्यांनी त्या ठिकाणी डेब्रिज टाकलेले आहे त्यांच्यावर महानगरपालिकेने कोणती कारवाई केली, या पुढे असे डेब्रिज टाकले जाणार नाही यासाठी काळजी घेण्याचे आदेश शासन महानगरपालिकेला देईल का ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या संदर्भात संबंधित 540 लोकांवर कारवाई करण्यात आलेली आहे आणि त्यांच्याकडून 27 हजार रुपयांचा दंड वसूल केलेला आहे. परंतु माणसाच्या प्रवृत्तीमध्ये प्रबोधनाच्या माध्यमातून जास्तीत जास्त बदल घडविण्याची गरज आहे. एका बाजूला कायदा, दुसऱ्या बाजूला प्रबोधन आणि तिसऱ्या बाजूला स्वच्छतेचे महत्व समजावून सांगण्याचे काम सुरु आहे. याउपर ज्या खाजगी संस्थेला आपण खर्च करावयास देतो त्यासाठी प्रतिकुटुंब प्रतिमहा नागरिकांकडून 10 रुपये महानगरपालिकेने वसूल करण्यास सुरुवात केलेली आहे.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D

**राज्यात वाहन चालक पदाचा परवाना मिळण्यासाठी घेण्यात येणाऱ्या चाचणीसाठी सिम्युलेटर उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३) * १३२६८ श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.सतीश चव्हाण , श्री.हेमंत टकले , श्री.विक्रम काळे , श्रीमती उषाताई दराडे , श्री.रमेश शेंडगे :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वाहन चालकांना चालक पदाचा परवाना मिळण्यासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराची चाचणी घेण्याकरिता परिवहन विभागाला सिम्युलेटर उपलब्ध करून देण्याचा निर्णय मा.मुख्यमंत्री महोदयांनी माहे जानेवारी, २०१० वा त्या दरम्यान घेतला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तद्नुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गुलाबराव देवकर, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, या ठिकाणी प्रश्नाच्या उत्तरामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी अशा पध्दतीचे आश्वासन दिलेले नाही असे म्हटले आहे. ताडदेव येथील आरटीओ कार्यालयात स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून सिम्युलेटर बसविलेले आहे, हे खरे आहे काय ? जर त्या स्वयंसेवी संस्थेला सिम्युलेटर बसविण्याची परवानगी दिली असेल किंवा त्यांच्या सहकार्याने सिम्युलेटर बसविले असेल तर कायद्यामध्ये सिम्युलेटरच्या माध्यमातून चाचणी घेण्याची आज आपल्याकडे तरतूद आहे का ? जर आपण ही परवानगी दिली असेल तर ती परवानगी देण्यापूर्वी किंवा एखादे यंत्र येण्यापूर्वी त्यासाठी आपण कशा पध्दतीचे चार्जेस लावले पाहिजेत याचा निर्णय झाला होता का ?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, असे कोणत्याही प्रकारचे सिम्युलेटर आरटीओ कार्यालयामध्ये लावण्यात आलेले नाही. वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल असोसिएशनने एक प्रस्ताव आरटीओ विभागाकडे दिला होता. त्या प्रस्तावाची तपासणी आमच्या विभागामध्ये चालू आहे. या सिम्युलेटरचा उपयोग वाहन चालविण्याचा परवाना देण्याच्या अगोदर वाहन चालकाला जास्तीची तयारी करुन घेण्यासाठी होऊ शकतो. मोटार वाहन कायदा, 1988 च्या कलम 9 (6) अन्वये अर्जदारास ज्या वाहनाचे लायसन्स हवे असेल त्याच प्रकारच्या वाहनावर त्याला वाहन चालविण्याची तयारी करावी लागते. त्यामुळे या सिम्युलेटरचा उपयोग आरटीओ कार्यालयामध्ये पाहिजे तसा होऊ

...3...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 13268 ..... श्री. गुलाबराव देवकर ...

शकत नाही. जास्तीची चाचणी करुन घेण्यासाठी त्याचा उपयोग करता येईल का या संबंधीची तपासणी आम्ही करीत आहोत.

श्री. सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे यांनी या ठिकाणी अत्यंत महत्वाच्या आणि दुर्लक्षित विषयाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित करुन या विषयावर प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे त्या बद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. मला एका गोष्टीचा आनंद आहे की, सभागृहामध्ये माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांकडे बघण्याची महाराष्ट्रातील सगळ्यांची दृष्टी अजून तरी वरच्या पातळीची आहे. माझी सुध्दा तशीच दृष्टी आहे. पाहिजे तर मी शंभर रुपयाच्या बॉण्डवर लिहून देतो. ट्रॅक्टरवर ड्रायव्हींग करत करत ड्रायव्हर गाडीवर येतो आणि लाख मोलाच्या माणसाचा जीव जातो. आज लायसन्स देण्याची पध्दत अशी आहे की, कोणीही जावयाचे, ट्रॅक नाही, ज्याला प्रशिक्षण वगैरे काही नाही त्यांनी आरटीओच्या खिशात 500 रुपये घातले की, कोणालाही लायसन्स मिळते. म्हणून मला स्पेसिफिक प्रश्न विचारावयाचा आहे की, आपण खरोखरच या संदर्भातील सुधारणा करणार आहात का ? जर कोणी सुधारणा करणार असेल तर त्याला शासन मदत करणार का ? मी स्वत: 50-60 लाख रुपये यामध्ये संदर्भात खर्च केले आहेत. मी रस्त्यावर माणसे मरताना बघितली आणि आतापर्यंत

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/ पूर्वी श्री.बरवड 10:15

ता.प्र.क्र.13268.... श्री.सय्यद पाशा पटेल....

50 डेड बॉडीज माझ्या गाडीत घालून मी हॉस्पिटलमध्ये नेल्या आहेत. या अपघातातील सगळे वाहन चालक रस्त्यावरील चालक असल्याचे दिसून आले आहेत. सभापती महोदय, सगळ्याच क्षेत्रात आधनिुकीकरण आलेले आहे, परंतु परिवहन खात्यात मात्र आधुनिकीकरण आलेले नाही. सन्माननीय मुख्यमंत्र्यांचा स्वभाव व त्यांची दूर दृष्टी लक्षात घेता मी त्यांना प्रश्न विचारतो की, या परिवहन खात्याचे आपण आधुनिकीकरण करणार आहात काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. राज्यामध्ये 46 परिवहन विभागाची कार्यालये आहेत. या कार्यालयांकडून अंदाजे 85 लाख लोकांना गाडी चालविण्याचा परवाना दिला जातो. त्यासाठी त्यांची चाचणी घेतली जाते. हे इलेक्ट्रॉनिक सिम्युलेटर मशीन शासनाने विकत घेतलेले नाही. वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल असोसिएशनने दिलेले आहे. त्यांची कल्पना अशी आहे की, परिवहन विभागाने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. त्यामुळे हे मशीन आपल्याला मिळालेले आहे, त्यासाठी जागा तयार झालेली आहे. त्या मशीनची चाचणी झालेली आहे. परंतु कायद्यानुसार ते मशीन वापरता येत नाही. कारण हा केंद्रीय कायदा आहे. त्या कायद्यानुसार 4 चाकी वाहनावर किंवा दुचाकी वाहनावर प्रत्यक्षात चाचणी घ्यावी लागते. हा केंद्रीय कायदा असल्यामुळे त्यात केंद्र सरकारच बदल करु शकते. त्यासाठी राज्य शासन भूमिका घेईल. परंतु या मशीनचे काय करावयाचे हा प्रश्न आहे. त्याचा अनुभव तर घेतला पाहिजे. या मशीनचा प्रशिक्षणासाठी वापर करता येईल काय असा एक विचार सुरु आहे. लोकांच्या चाचणीसाठी नाही, परवाना देण्यासाठी नाही. प्रशिक्षणातून चांगला अनुभव आला तर सार्वजनिक वाहतुकीचे वाहन चालक असतील किंवा एस.टी.महामंडळाच्या वाहन असतील त्यांची या मशीनद्वारे चाचणी घ्यावयाची काय ? कारण एस.टी.च्या चालकांचे वय वाढल्यावर त्यांच्या डोळ्यांची तपासणी केली जाते, त्यासाठी विस्तृतपणे विचार करावा लागेल. पण जोपर्यंत केंद्रीय कायद्यात बदल होत नाही आणि या इलेक्ट्रॉनिक सिम्युलेटरचा वापर करण्यासाठी केंद्रीय कायद्यात तरतूद होत नाही तोपर्यंत लायसन्स देण्याच्या प्रक्रियेमध्ये त्याला आणता येणार नाही. मी सन्माननीय सदस्यांचे आभार मानतो. त्यांनी अत्यंत गंभीर प्रश्न विचारला आहे. खरेच या

2....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

ता.प्र.क्र.13268..... श्री.पृथ्वीराज चव्हाण....

विभागाला आधुनिकीकरणाची गरज आहे. कारण चुकीच्या पध्दतीने, प्रशिक्षणाशिवाय जर एखाद्याला परवाना मिळाला तर पुढे काय अनर्थ होऊ शकतो ते सगळयांना माहीत आहे. म्हणून या दृष्टीने शासनाला पुढे वाटचाल करावी लागेल. यासाठी केंद्रीय परिवहन खात्याशी चर्चा करुन त्यांचा या बाबतीत काय विचार आहेत ते जाणून घेतले जाईल. या मशीनचा प्रशिक्षणासाठी वापर करण्यासाठी शासनाकडून गंभीरपणे विचार केला जाईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. या राज्यामध्ये वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. वाहन चालकाने योग्य पध्दतीचे शिक्षण घेतल्याशिवाय त्याला परवाना देऊ नये. आताच माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितल्या प्रमाणे या विभागात सिम्युलेटर टेक्नोलॉजी वापरली जाणार आहे. अनेक ठिकाणी ड्रायव्हिंग स्कूल्स आहेत. ते लोकांना परवाना देतात. तेथे एक प्रकार असा दिसून येतो की, त्यांच्याकडे नावाची नोंदणी केल्यावर प्रशिक्षणासाठी महिनाभर जाण्याची आवश्यकता नाही. ते घरपोच परवाना आणून देतात. प्रत्यक्षात प्रशिक्षण मिळत नाही. अशा प्रकारे असुरक्षित वाहन चालकांची मोठी फौज राज्यात निर्माण होण्याची शक्यता आहे. या सिम्युलेटर मशीनची किंमत 14-15 लाख इतकी आहे. या सिम्युलेटरमार्फत प्रशिक्षण देण्याची सोय किमान एस.टी. विभागात करु शकतो काय, कारण अनेकदा त्यांचेही मोठे वाहन घेतले जाते. या नव्या टेक्नोलॉजीची सुरुवात माननीय मुख्यमंत्र्यांच्या अखत्यारितीत असलेल्या एस.टी.महामंडळाच्या वाहन चालकांना प्रशिक्षण देण्यापासून केली जाईल काय, तसेच ड्रायव्हिंग स्कूल्सना सिम्युलेटर्स घ्यावयाची असतील तर त्यासाठी एक विशिष्ट योजना राबविण्यासाठी शासन त्यांना सहकार्य करु शकेल काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : मी यापूर्वीच सांगितले आहे की, जोपर्यंत केंद्रीय कायद्यात तरतूद होत नाही तोपर्यंत परवाना देण्याच्या प्रक्रियेसाठी याचा विचार करता येणार नाही. पण त्यासाठी निश्चितपणे पावले टाकली जातील. प्रशिक्षणासाठी वापर करता येईल काय असा प्रश्न विचारण्यात आला आहे, इट इज सजेशन फॉर ॲक्शन. या मशीनची किंमत किती आहे त्याचा विचार करुन तिचा खरोखर उपयोग आहे काय हे देखील पाहिले जाईल.

यानंतर श्री.शिगम....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ D/ पूर्वी श्री. खंदारे 10:20

ता.प्र.क्र. 13268... श्री. पृथ्वीराज चव्हाण...

असे जर कोणाला वाटले की, इलेक्ट्रानिक सिम्युलेटरचे ट्रेनिंग घेऊन रस्त्यावर वाहन चालवीन तर ते चालणार नाही. प्रत्यक्षात रस्त्यावर वाहन चालविण्याचा अनुभव प्रशिक्षणार्थीने घ्यावयाचा आहे. या सिम्युलेटरचा उपयोग परिवहन विभागामध्ये करता येईल किंवा कसे याचा निश्चितच विचार करु.

श्री. हुसेन दलवाई : ड्रायव्हिंग स्कूलच्या मालकांनी मुंबईतच नाही तर मुंबईच्या बाहेर ड्रायव्हिंग स्कूल काढण्यासाठी भूखंड देण्याची सरकारला विनंती केलेली आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, भूखंड उपलब्ध झाला तर त्याठिकाणी तीन महिने वाहन चालविण्याचे उत्तम प्रकारे प्रशिक्षण देता येईल. आता वाहन प्रशिक्षणार्थींना गेअर बदलणे म्हणजे नक्की काय याची माहिती नसते, त्यांना थिअरी माहीत नसते. केवळ प्रॅक्टीकल माहिती दिली जाते. ड्रायव्हिंग हे थिअरीसह चांगल्या प्रकारे शिकविले जाण्याच्या दृष्टीने एक ड्रायव्हिंग युनिव्हर्सिटी सारखी व्यवस्था करण्याच्या संदर्भात सरकार विचार करील काय व त्यासाठी भूखंड उपलब्ध करुन देईल काय ?

श्री. गुलाबराव देवकर : असे काही प्रस्ताव आले तर ते निश्चितपणे तपासले जातील.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

30-03-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) E-2

**बीड (ता.जि.बीड) येथील प्रशासन व धान्य दुकानदार यांनी मिळून केलेल्या घोटाळ्याबाबत**

**(४) * १३०५३ प्रा.सुरेश नवले , श्री.राजन तेली , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड (ता.जि.बीड) येथे दिनांक २ जानेवारी, २०११ रोजी केंद्रीय दक्षता समिती आली असता जनसुनवाईमध्ये जनतेने सदर समितीसमोर प्रशासन व भ्रष्ट धान्य दुकानदार यांनी मिळून केलेल्या घोटाळ्यांची तक्रार करुन सदर घोटाळ्यात अडकलेल्या अधिकारी व दुकानदारांवर कारवाई करावी अशी मागणी केल्याचे माहे जानेवारी , २०११ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दक्षता समितीचे अध्यक्ष माजी न्यायमूर्ती श्री.पी.डी.बघता यांनी शासनाकडे या घटनेसंदर्भात अहवाल सादर केला आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रणजित कांबळे, श्री.अनिल देशमुख :** (१) नाही. तथापि, केंद्रीय दक्षता समितीने त्यांच्या महाराष्ट्र दौ-याच्या वेळी दिनांक १ जानेवारी, २०११ रोजी बीड येथे जनसुनवाई आयोजित केली होती. सदर जनसुनवाईच्या दरम्यान जनतेने समितीसमोर सार्वजनिक वितरण व्यवस्थेसंदर्भात काही तक्रारी सादर केल्या.

(२) होय.

(३) व (४) सदर अहवाल दिनांक २३.३.२०११ रोजी प्राप्त झाला असून त्यात उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत छाननी करुन पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

प्रा. सुरेश नवले : महाराष्ट्र शासनाकडे दक्षता समितीचा अहवाल प्राप्त झालेला असून त्याची छाननी सुरु आहे. ही छाननी केव्हा पूर्ण होईल, या अहवालामध्ये करण्यात आलेल्या शिफारशींचे स्वरुप काय आहे ?

श्री. रणजित कांबळे : सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार माजी न्यामूर्ती श्री. पी.डी. वाधवा यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता समिती स्थापन करण्यात आली. या समितीने 28.12.2010 ते 24.2.2011 या कालावधीत जनसुनवाई आयोजित केली होती. राज्यातील अनेक जिल्ह्यामध्ये जाऊन या समितीने लोकांच्या तक्रारी आणि त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. त्या समितीचा अहवाल राज्य सरकारला 23.3.2011 रोजी प्राप्त झाला. त्या अहवालामध्ये विविध प्रकारच्या 40-50 सूचना करण्यात आलेल्या आहेत. या संदर्भात ॲक्शन टेकन रिपोर्ट घेऊन तो सुप्रीम कोर्ट आणि केन्द्र शासनाला सादर करणे आवश्यक आहे. त्यासाठी राज्य शासनाने 3 महिन्यांची मुदत मागितलेली आहे.

..3..



MSS/ KTG/ D/ पूर्वी श्री. खंदारे 10:20

ता.प्र.क्र. 13053...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली : स्वस्तधान्य दुकानदार आणि रॉकेल वितरक यांनी मागील 4 महिन्यामध्ये काय काय केले हे संपूर्ण महाराष्ट्राने पाहिलेले आहे. हा विषय अत्यंत गंभीर आहे. धान्य दुकानदारांकडून घोटाळे होऊ नयेत म्हणून आदरणीय न्यायमूर्ती वाधवा यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने केलेल्या सूचना मधील महत्वाच्या सूचना कोणत्या आहेत ?

श्री. रणजित कांबळे : न्यायमूर्ती वाधवा यांच्या अध्यक्षतेखालील समितीने 40-50 सूचना केलेल्या आहेत. त्यातील महत्वाच्या सूचना अशा आहेत की, धान्याचे जे ट्रक येतात त्यांच्यावर जीपीएस सिस्टिम बसविली पाहिजे, महिला बचत गटांना स्वस्तधान्य दुकान दिल्यानंतर ते दुकान एकच व्यक्ती चालवत असल्याचे निदर्शनास आलेले आहे, म्हणून महिला बचत गटांना स्वस्त धान्य दुकान चालविण्यास दिल्यानंतर त्यामध्ये बचत गटाचा सहभाग असणे आवश्यक आहे. दुकानदाराला जी परवानगी दिली जाते त्यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे, संगणकीकरण करणे आवश्यक आहे, मंत्रालयीन अधिका-यांचा हस्तक्षेप कमी होणे आवश्यक आहे, अशा विविध सूचना केलेल्या आहेत.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ KTG/ 10:25

ता.प्र.क्र.13053... श्री. रणजित कांबळे...

त्यामुळे या समितीच्या शिफारशींचा पूर्णपणे अभ्यास करुन यासंबंधीचा ॲक्शन टेकन रिपोर्ट सुप्रीम कोटास सादर करणार आहोत. सुप्रीम कोर्टात जो ॲक्शन टेकन रिपोर्ट सादर केला जाईल त्याची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली जाईल.

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, न्यायमूर्ति श्री डी.पी. वाधवा ने नागपुर में एक मीटिंग ली थी और लोगों की शिकायतों को उन्होंने विस्तार से सुना है. मेरा कहना है कि यह विषय बहुत ही गंभीर है. पीडीएस योजना के माध्यम से गरीब लोगों को जो अनाज और रॉकेल मिलना चाहिए, वह उनको नहीं मिल पाता है, यह बात किसी से छिपी नहीं है. इस प्रकार के भ्रष्टाचार को रोकने के लिए कॅश सब्सिडि डायरेक्ट उपभोक्ता तक पहुंचाने की योजना केंद्र सरकार द्वारा बनायी जा रही है. लेकिन जब तक वह योजना तैयार नहीं होती, तब तक राज्य सरकार भ्रष्टाचार को रोकने के लिए दक्षता समिति बनाएगी या नहीं बनाएगी ? ये दक्षता समिति वर्षों से नहीं बनायी गयी हैं.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, अनुदान देण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. ही केंद्र शासनाची योजना आहे आणि अनुदान देण्याची बाब केंद्र शासनाच्या विचाराधीन आहे. राज्य शासनास धान्य देखील केंद्र शासन उपलब्ध करुन देते. केंद्र शासन या बाबतचा निर्णय घेईल, त्या निर्णयाची अंमलबजावणी राज्य शासनाकडून देखील केली जाणार आहे. अनुदान देण्याबाबतची बाब राज्य शासनाच्या अजून तरी विचाराधीन नाही. सन्माननीय सदस्यांनी दक्षता समिती बाबतीत दुसरा प्रश्न उपस्थित केला. त्या बाबतीत सांगू इच्छितो की, मागील काळात दक्षता समित्या गठीत केल्या होत्या. दक्षता समित्या लवकर गठीत करण्याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी सगळया पालकमंत्र्यांना आदेश दिलेले आहेत. या ठिकाणी एक गोष्ट नमूद करु इच्छितो की, वाधवा समितीने या अनुषंगाने शिफारस केली आहे. त्या शिफारशीमध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, या समितीमध्ये राजकीय व्यक्ती व शासकीय कर्मचारी न ठेवता महिला आणि इतर समाजातील व्यक्तींचा समावेश करावा. या शिफारशीच्या बाबतीत सरकार निश्चितपणे विचार करीत आहे.

2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13053...

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, बीड जिल्हयाच्या अनुषंगाने हा प्रश्न उपस्थित करण्यात आलेला असल्यामुळे बीड जिल्हयापूरतचा प्रश्न मी विचारणार आहे. बीड जिल्हयामध्ये दुकानदार आणि पुरवठा विभागाचे अधिकारी यांच्या संगनमताने दररोज कमीत कमी 20 ट्रक धान्य हैद्राबाद येथे जाते. यासंदर्भात अनेक वेळा तक्रारी केलेल्या आहेत. मी मागच्या अधिवेशनात या विषयाच्या अनुषंगाने केज तालुक्यातील एका प्रकरणाचा उल्लेख केला होता. मी त्यावेळी अशी बाब नमूद केली होती की, स्वस्त धान्य दुकानदार गैरमार्गाने धान्याची साठवणूक करतात. एका स्वस्त धान्य दुकानदाराने तहसीलदारास एक हिरो होंडा गाडी घेऊन दिली आहे. एवढा गंभीर प्रकार बीड जिल्हयातील केज तालुक्यात झालेला आहे. स्थानिक जनतेच्या तक्रारीमुळे अशा प्रकारचा साठेबाजी व काळाबाजार करणाऱ्या व्यापाऱ्यांना अटक करण्यात आली होती ही गोष्ट खरी आहे काय, आज त्या व्यापाऱ्याची परिस्थिती काय आहे, बीड जिल्हयात धान्याच्या होत असलेल्या काळाबाजाराच्या बाबतीत शासन चौकशी करील काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी वेगळा प्रश्न विचारलेला आहे, त्या बाबतची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. सन्माननीय सदस्यांनी केलेली तक्रार सत्य आहे असे समजून या प्रकरणाबाबतची सविस्तर माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, हा प्रश्न मुळात वेगळा आहे. मुळात हा प्रश्न भ्रष्टाचारासंबंधीचा आहे. त्यानंतरची ही दक्षता समिती आहे. या सभागृहाने या प्रश्नाचा आशय समजून घ्यावा. सन्माननीय सदस्य श्री. नवले यांनी जी व्यथा मांडली ती खरी आहे. अशा प्रकारचा भ्रष्टाचार, अशा प्रकारचे अनेक गुन्हे त्या विभागात झाले आणि म्हणून दक्षता समिती आली. दक्षता समिती त्या जिल्हयात अचानक कशी जाईल. मी देखील हा प्रश्न दिलेला आहे, तसेच या प्रश्नाचा मी पूर्णपणे अभ्यास केलेला आहे....

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13053....... श्री.भाई जगताप........

सभापती महोदय, मूळ प्रश्नापासून दूर जाता येणार नाही. शासनाकडून चुकीचे उत्तर देण्यात आले आहे. तक्रार आलेली नाही असे म्हणणे योग्य नाही. तक्रारी आल्या नसत्या तर दक्षता समिती का आली? भ्रष्ट अधिकारी आणि भ्रष्ट दुकानदार यांच्याविरुध्द तक्रारी असल्यामुळे त्याची माहिती घेऊन त्यांच्यावर कारवाई करणार आहात का? तक्रारी होत्या म्हणूनच दक्षता समितीने सुनावणी घेऊन अहवाल तयार केला आहे. या तक्रारी कोणत्या स्वरुपाच्या आहेत?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले की, सुप्रीम कोर्टामध्ये एक रिट पिटिशन, पिपल्स युनियन ऑफ सिव्हिल लिबर्टीज व्हर्सेस युनियन ऑफ इंडिया दाखल झाली होती. त्या प्रकरणामध्ये सुप्रीम कोर्टाने केंद्रीय दक्षता समिती नियुक्त केली. त्या समितीने फक्त बीड जिल्हा नव्हे तर महाराष्ट्रात औरंगाबाद, जालना, परभणी, बीड, नगर, नागपूर, वर्धा, यवतमाळ, अमरावती, ठाणे, मुंबई अशा वेगवेगळ्या जिल्हयात जाऊन लोकांच्या तक्रारी व सूचना समजून घेतल्या. त्यानंतर त्या समितीने अहवाल तयार केला. बीड जिल्हयाबाबत काही स्पेसिफिक तक्रारी होत्या म्हणून ती समिती आलेली नव्हती. बीड जिल्हयाबाबत तक्रारी होत्या म्हणून त्या समितीने बीड जिल्हयामध्ये सुनावणी घेतली असे नाही. सुप्रीम कोर्टाच्या आदेशाप्रमाणे वेगवेगळ्या जिल्हयात सुनावणी घेऊन लोकांच्या सूचना व तक्रारी जाणून घेतल्यानंतर दक्षता समितीने अहवाल तयार केला. पीडीएस व्यवस्था कशी दुरुस्त करता येईल त्याबाबत काही सूचना करण्यात आलेल्या आहेत. बीड जिल्हयामधून 15-16 सूचना प्राप्त झालेल्या आहेत. बीड जिल्हयात पारधी समाजाच्या लोकांना स्वस्त धान्य दुकानाचे वाटप झाले पाहिजे. ऊस तोड कामगार इतर जिल्हयामध्ये कामानिमित्त जातात त्यावेळी त्यांना तात्पुरती शिधापत्रिका देणे आवश्यक आहे. जवळजवळ 1 लाख कार्ड होल्डर्स आहेत. दक्षता समितीचे सदस्य स्वस्त धान्य दुकानाच्या मालकांना ब्लॅकमेल करतात अशा स्वरुपाच्या तक्रारी आलेल्या आहेत. स्पेसिफिकली धरमपुरी येथे लोकसंख्येच्या आधारे जेवढया शिधापत्रिका आवश्यक आहेत त्यापेक्षा अधिक प्रमाणात शिधापत्रिका दिल्या गेल्या आहेत, त्याची तपासणी होणे आवश्यक आहे अशीही तक्रार करण्यात आली होती. सभापती महोदय, मी ॲक्शन टेकन रिपोर्ट आणि पूर्ण अहवाल सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13053.......

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, प्रश्नाला भलतेच उत्तर दिले जात आहे. सभागृहाला का वेठीस धरले जात आहे. मंत्री महोदयांना या प्रश्नाची नीट माहिती नाही. अधिकारी त्यांना योग्य माहिती देत नाहीत. हा प्रश्न फक्त बीड जिल्हयापुरता मर्यादित नाही. बीड जिल्हयातील प्रश्नाला योग्य उत्तर दिलेले नाही. ही केंद्र सरकारची योजना आहे. गरीब लोकांना चांगल्या प्रतीचे धान्य मिळावे या स्तुत्य हेतूने ही योजना राबविली जात असताना महाराष्ट्रात मात्र या योजनेची योग्य पध्दतीने अंमलबजावणी होत नाही. मंत्री महोदयांना योग्य माहिती नसेल तर हा प्रश्न राखून ठेवावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**सभापती** : सन्माननीय राज्यमंत्र्यांनी या प्रश्नाच्या अनुषंगाने सदनातील माननीय सदस्यांचे समाधान करण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केलेला आहे. या प्रश्नाला फार मोठी व्यापक पार्श्वभूमी आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सत्ताधारी पक्षाच्या माननीय सदस्यांकडून असे सांगण्यात आले की, मंत्री महोदयांना कळत नाही, त्यांना नीट माहिती नाही. हे वक्तव्य रेकॉर्डवरुन वगळण्यात यावे. सत्ताधारी पक्षाच्या बाजूने मंत्री महोदयांबद्दल असे बोलणे योग्य आहे असे मला वाटत नाही.

**सभापती** : माननीय सदस्यांनी केलेली सूचना योग्य आहे. अशी काही आक्षेपार्ह वाक्य असतील तर ती रेकॉर्डवरुन वगळण्यात येतील.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांच्यात बदल झाला आहे असे मला वाटते.

नंतर एच1...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

PFK/ KTG/ पूर्वी श्री. भोगले...... 10:35

ता. प्र. क्र. 13053.........

**सभापती** : माननीय राज्य मंत्र्यांनी या प्रश्नाला उत्तर देताना शक्य तेवढे समाधानकारक उत्तर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. तरी देखील या प्रश्नाची व्याप्ती लक्षात घेता आणखी एक दोन प्रश्न विचारण्याची संधी मी देणार आहे. त्यानंतर माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांनी आपल्या दालनात या विषयाच्या अनुषंगाने हे अधिवेशन संपण्यापूर्वी किंवा अधिवेशनाच्या दरम्यान एक बैठक घ्यावी. कारण त्यांचेही या विषयासंबंधी काही ऑब्झर्वेशन्स असतील, त्यांना ते सभागृहाच्या पटलावर ठेवता येतील.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या प्रश्नाबद्दल विविध सन्माननीय सदस्य ज्या तळमळीने प्रश्न विचारतात त्यात महत्वाचा हेतू म्हणजे दक्षता समित्याबाबतचा आहे. मग त्या कोर्टाच्या आदेशाने नेमलेल्या असोत अथवा तक्रारीवरुन नेमलेल्या असोत. या समित्यांमध्ये लोकांकडून ज्या तक्रारी दिल्या जातात त्यासाठी विधान परिषद सदस्य म्हणून आम्हाला तर कधी बैठकांसाठी बोलावले जात नाही. पण या समित्यांच्या बैठका सुध्दा नियमितपणे होत नाहीत. तसेच स्वत:हून निवेदन दिले तरी त्या अनुषंगाने केलेली कारवाई आम्हाला कळवित नाहीत. म्हणून या दक्षता समित्यांच्या बैठका किमान दोन महिन्यातून तरी नियमितपणे घेण्यात येणार काय, तसेच या बैठकांसाठी किमान सामाजिक संघटना अथवा महिला संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना आमंत्रित करणार काय, अशा संघटनांकडून ज्या विविध तक्रारी केल्या जातात त्यांचा पाठपुरावा करण्यासाठी कोणती व्यवस्था विभागीय स्तरावर आहे, अशा विविध सूचना स्वीकारुन त्यांची अंमलबजावणी शासन करणार आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : महोदय, राज्यात दक्षता समित्यांच्या बैठका वारंवार होत असतात. पण तरी देखील सन्माननीय सदस्यांच्या स्पेसिफिक काही तक्रारी अथवा सूचना असतील तर त्यांची उत्तरे त्यांना दिली जातील.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : महोदय, या प्रश्नाचा मूळ गाभा म्हणजे धान्य वाटपात गैरप्रकार होतात हा आहे. उपलब्ध असलेल्या तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे शासनाने तत्वत: मान्य केले आहे. त्यानुसार प्रत्येक स्वस्त धान्य दुकानात बायोमेट्रिक रिडर आणि स्मार्ट कार्डाचा वापर करण्यात येईल असे अनेक दिवसांपासून ठरविले होते पण त्याचा अंमल अद्याप सुरु झालेला नाही.

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 13053........ श्री. राणा जगजितसिंह पाटील.....

म्हणून हा निर्णय शासन साधारण किती दिवसात घेणार आहे, तसेच दुकानात बायोमेट्रिक पध्दतीने रिडर्स लावून प्रत्येक ग्राहकाला स्मार्ट कार्डचे वाटप करणार काय ?

श्री. रणजित कांबळे : महोदय, राज्यात सांगली जिल्ह्यात प्रायोगिक तत्वावर अशा प्रकारे बायोमेट्रिकचे युआयडीशी लिंकेज करुन वापर करण्याचा प्रयोग ट्रायल बेसिसवर सुरु झालेला आहे. तो पूर्ण झाल्यानंतर संपूर्ण राज्यात या प्रयोगाची अंमलबजावणी करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे. हा प्रकल्प पूर्ण होण्यासाठी किमान एक ते दीड वर्ष लागण्याची शक्यता आहे.

-------

........3......

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## पुणे शहरातील अमृतकलश प्रकल्पातील सदनिकाधारकांची केलेली फसवणूक

**(5) *13426 श्री.चंद्रकांत पाटील, श्री.विनोद तावडे, श्री.भगवान साळुंखे, श्री.धनंजय मुंडे**: सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पुणे शहरात "प्रथमेश कन्स्ट्रक्शनने" कर्वेनगर येथील सर्व्हे क्रमांक 9 येथे "अमृतकलश" नावाचा प्रकल्प उभारला असून त्यामध्ये सुमारे नऊ इमारती बांधताना बिल्डर आणि महानगरपालिकेतील अधिकारी यांनी सदनिकाधारकांची फसवणूक केल्याचे दिनांक 31 जानेवारी, 2011 रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या प्रकरणाबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषीवर काय कारवाई करण्यात आली आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1), (2) व (3) पुणे महानगरपालिका हद्दीतील मौजे कर्वेनगर स.क्र. 9 (भाग) व 10 (भाग) या मिळकतीवर अमृतकलश नावाचा निवासी 8 इमारतींचा प्रकल्प असून, त्यापैकी दुरुस्त बांधकाम परवानगी दि.24.3.2005 अन्वये मंजूर नकाशा नुसार "इमारत-जी" पार्किंग+सहा मजले मंजूर होती. त्यानुसार जागेवर बांधकाम पूर्ण झालेले असतांना तद्नंतर दिनांक 20.1.2007 अन्वये दुरुस्त बांधकाम परवानगी मंजूर करुन घेताना संबंधितांनी जागेवर इमारत-जी चे पार्किंग + सहा मजले बांधकाम पूर्ण असतांना सदरची इमारत-जी फक्त पार्किंग स्लॅब पर्यंत दर्शवून या इमारतीचे चटईक्षेत्र कमी दर्शवून पूर्वीची फक्त पार्किंग स्लॅब पर्यंतच मंजूर असलेली इमारत-आय ही पार्किग + सहा मजले दर्शवून संबंधित वास्तूविशारदांनी नकाशे महानगरपालिकेकडून मंजूर करुन घेतल्याचे निदर्शनास आले आहे.

सदरची मंजूरी नियमबाह्य पध्दतीने देण्यात आल्याने प्रकरणाशी संबंधित दोन उप अभियंता व दोन कनिष्ठ अभियंत्यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच संबंधित वास्तूविशारद व विकासक यांना फसवणूक केल्याच्या कारणास्तव कायमस्वरुपी काळ्या यादीत का टाकू नये ? याबाबत कारणे दाखवा नोटीस देण्यात आली आहे.

श्री. चंद्रकांत पाटील : महोदय, बिल्डर, सरकारी अधिकारी आणि राज्यकर्ते मिळून देश विकायला निघाले याचे अतिशय चांगले उदाहरण पुण्यात पुन्हा एकदा घडले आहे. पुण्यातील

....4....

ता. प्र. क्र. 13426......... श्री. चंद्रकांत पाटील.........

प्रथमेश कन्स्ट्रक्शन्सने "अमृतकलश" नावाने एक प्रकल्प उभा केला. या प्रकल्पात आठ इमारती उभ्या केल्या. त्यातील पहिली इमारत बांधताना बाजूचे ग्राऊंड पार्किंग म्हणून दाखविले. नंतर दुसरी इमारत उभी करताना पहिली इमारत पाडली असे दाखवून ती जागा पार्किंग म्हणून दाखविली. अशा प्रकारे पार्किंग शिल्लक नसताना हा सर्व प्रकल्प पूर्ण झाला आहे. पण यामध्ये प्रत्यक्षात मोठा गैरव्यवहार झालेला आहे. या ठिकाणी उत्तरात दिलेले आहे की या प्रकरणाची चौकशी केल्यानंतर दोन अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. मला वाटते की, आठ इमारतीचे बांधकाम होत असताना काहीशे लोकांची फसवणूक झालेली आहे. म्हणून केवळ निलंबित करुन चालणार नाही तर यासंबंधी कायद्यात जी तरतूद आहे त्यानुसार बिल्डर, आर्किटेक्ट आणि सरकारी अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणार काय ?

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.: 13426 .....**

श्री. भास्कर जाधव : आदरणीय सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकात पाटील यांनी या प्रश्नाच्या संदर्भात अमृतकलश प्रकल्पांतर्गत 8 इमारती बांधलेल्या आहेत अशी माहिती दिलेली आहे. परंतु या ठिकाणी 8 इमारती बांधण्यात आलेल्या नाहीत.

सन्माननीय सदस्यांनी शेवटचा जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, या ठिकाणी सिस्टीमलाच चॅलेंज दिलेले आहे अशी वस्तुस्थिती आहे. या प्रकरणात दोन अधिका-यांना निलंबित करण्यात आले नसून 3 अधिका-यांना निलंबित करण्यात आलेले आहे. चवथा अधिकारी दुस-या प्रकरणात निलंबित झाला होता परंतु त्याचे निलंबन कायम ठेवण्यात आले असून या प्रकरणात एकंदर 4 अधिका-यांना निलंबित करण्यात आलेले आहे.

या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी मालकावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येणार आहे काय असा प्रश्न विचारलेला असून त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, पुणे महानगरपालिकेच्या डीसीआर मध्ये नेमकी तरतूद काय आहे ती तपासून बघावी लागेल व ती तरतूद **तपासून** बघितल्यानंतर त्यामध्ये जर मालकावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याच्या संदर्भात तरतूद असेल तर तशा प्रकारे संबंधित मालकावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याच्या संदर्भात शासन विचार करु शकेल. परंतु तूर्त या ठिकाणचा जो आर्किटेक्ट आहे त्याला काळया यादीत टाकण्याच्या संदर्भात व त्याच्याकडून आठवडयातून तीन वेळेस एक्सप्लेनेशन मागविण्याची कार्यवाही सुरु झालेली आहे.

श्री. अनिल भोसले : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्यांनी आपल्या प्रश्नामध्ये "राज्यकर्ते" या शब्दाचा उल्लेख केलेला असल्यामुळे हा शब्द कामकाजातून वगळण्यात यावा. खरे म्हणजे हे प्रकरण आताच्या आयुक्तांनी बाहेर काढलेले आहे. या प्रकरणाच्या संदर्भात पुणे महानगरपालिकेच्या जनरल बॉडीला दंडात्मक कारवाई करण्यासाठी किती दंड लावण्याचा निर्णय घेतलेला आहे. जनरल बॉडीने अशा प्रकारचे धाडस पहिल्यांदाच केलेले आहे. पुणें महानगरपालिकेचे काही नगरसेवक दंड कमी आकारण्याच्या संदर्भात 5 एप्रिल, 2011 रोजी निर्णय घेणार आहे. त्यामुळे यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, पुणे महानगरपालिकेच्या आयुक्तांनी सदर बांधकाम बेकायदेशीर ठरवलेले आहे. आतापर्यंत आयुक्तांची सही न घेता केवळ परिपत्रकाचा आधार घेऊन कायदेशीर बांधकामे केली जातात हे खरे आहे काय, या ठिकाणी जे प्रकरण उपस्थित करण्यात आलेले आहे ते फार

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.: 13426 .....**

श्री. अनिल भोसले...

किरकोळ आहे. या प्रकरणात पुणे महानगरपालिकेच्या छोटया अधिका-यांवर कारवाई करण्यात आलेली आहे, अशी माहिती माननीय राज्य मंत्र्यांनी दिलेली आहे. त्यामुळे दंडात्मक कारवाईच्या बाबतीत शासन कोणता निर्णय घेणार आहे, तसेच दंड कमी करण्याच्या संदर्भात जनरल बॉडीने निर्णय घेतला तर त्यासंदर्भात राज्य सरकार कारवाई करणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य नवीन असल्यामुळे त्यांचा प्रश्न मला व्यवस्थित समजला नाही. परंतु त्यांना असे विचारावयाचे असेल की, यासंदर्भात संबंधिताने महानगरपालिकेची 5.53 कोटी रुपयांची फसवणूक केलेली आहे. या प्रश्नाच्या संदर्भात मी सभागृहाला विस्ताराने माहिती देऊ इच्छितो की, पुणे शहरात प्रथमेश कन्स्ट्रक्शनने कर्वे नगरमध्ये एकंदर 8 इमारती बांधण्यासाठी परवानगी घेतली होती. यातील "G" इमारत पार्किंग प्लस सहा माळे अशा प्रकारची रेसीडेंशियल इमारत बांधली. या इमारतीसाठी विकासकाने सन 2005 मध्ये परवानगी मागितली होती व 2007 मध्ये त्यांनी असे सांगितले की, मी आतापर्यंत केवळ पार्कींग पर्यंतचेच बांधकाम केलेले आहे त्यामुळे G+I इमारतीला पार्कींग प्लस रेसिडेंशियल असे बांधकाम करण्याची परवानगी द्यावी. त्या प्रमाणे अशा प्रकारची परवानगी विकासकाला मिळाली. सदर परवानगी कमिशनरच्या लेव्हलला घेण्यात आली नव्हती. कारण डीसीआर मध्ये कमिशनर ठराविक इमारतींना ठराविक कारणासाठीच परवानगी देत असतात. शाळा, हॉस्पिटल, रेस्टॉरंट यांना जर वाढीव एफएसआय द्यावयाचा असेल तर यासंदर्भात कमिशनर परवानगी देत असतात. सदर विकासकाने पहिल्या इमारतीचे बांधकाम पूर्ण केले परंतु ही इमारत बांधली नाही असे सांगितले व दुस-या इमारतीला परवानगी घेतली. या नवीन इमारतीमध्ये 48 गाळे अधिकचे गाळे बांधले व 2590 चौरस फुटाचे अधिकचे बांधकाम या इमारतीमध्ये करण्यात आले. अशा प्रकारे विकासकाने फसवणूक केली आहे. या विकासकाने पहिली इमारत तशीच बांधली तसेच दुसरी इमारत सुध्दा तशाच प्रकारे बांधली. दुस-या इमारतीसाठी विकासकाने ओसी घेतली होती परंतु पहिल्या इमारतीसाठी ओसी घेतली नसल्यामुळे हे प्रकरण उघडकीस आले. त्यामुळेच संबंधिताकडून 5.53 कोटी रुपये दंडाची रक्कम वसूल करण्यात आलेली आहे. सदर आर्किटेक्टला काळया यादीत का टाकू नये

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.: 13426 .....**

श्री. भास्कर जाधव...

यासाठी नोटीस देण्यात आली आहे. सदर ठेकेदाराला काळया यादीत टाकले होते. परंतु हे प्रकरण हायकोर्टात गेल्यामुळे हायकोर्टाने आर्किटेक्टची बाजू सुध्दा ऐकून घ्यावी अशा प्रकारचे निदेश दिल्यामुळे संबंधित आर्किटेक्टला 3 आठवडयात बाजू मांडण्याची नोटीस दिलेली आहे. आर्किटेक्टची बाजू ऐकून घेतल्यानंतर संबंधितावर कारवाई करण्यात येणार आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13426...श्री.भास्कर जाधव...

त्या सबंधीची नोटीस देखील प्रसिध्द करण्यात आली असून 48 टेनन्टसना रेग्युलराईज केल्यानंतरही दंडाची रक्कम परत देण्यात येऊ नये अशा प्रकारची भूमिका शासन घेईल.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, पुणे शहरामध्ये पुणे महानगरपालिकेच्या कारभारात नगर विकासाचे काम उणे पध्दतीने कशा प्रकार चालले आहे हे या उदाहरणावरुन दिसून येते. त्या ठिकाणी मूळची अनुजा इमारत होती त्या इमारतीमध्ये राहणा-या लोकांना कंम्पलीशन सर्टिफिकेट देण्या ऐवजी अजिता नावाची जी बेकायदेशीर इमारत होती त्यामध्ये राहणा-या लोकांना अगोदर कंम्पलीशन सर्टिफिकेट देण्यात आले होते.

श्री.अनिल भोसले : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्य नवीन असल्यामुळे प्रश्नोत्तराच्या तासामध्ये हरकतीचा मुद्दा उपस्थित करता येत नाही हे त्यांना माहीत नसावे. या प्रश्नाच्या संदर्भात मी त्यांना उप प्रश्न विचारण्याची संधी दिली होती. त्याचबरोबर पुण्यातील अन्य एक दोन सन्माननीय सदस्यांना सुध्दा मी नंतर प्रश्न विचारण्याची संधी देईन.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा आहे की, श्री.जगदीश देशपांडे नावाचा वास्तू विशारद आहे आणि त्याचा साथीदार श्री.रिसवाडकर नावाचा एक बिल्डर आहे. श्री जगदीश देशपांडे यांच्या विरुध्द परवाना रद्द करण्याची कारवाई 2002 मध्ये श्री.पी.सी.बेंजामिन यांनी सुरु केली होती काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, मूळच्या अनुजा इमारतीमधील लोकाना कंम्पलीशन सर्टिफिकेट देण्यासाठी शासनाने कोणते संरक्षण दिले आहे.? माझा तिसरा प्रश्न असा आहे की, माझ्या माहितीप्रमाणे एसआरए घोटाळयामध्ये सुध्दा याच वास्तुविशारदाने जास्तीत जास्त घोटाळे केल्याच्या तक्रारी लोकांनी केल्या आहेत तेव्हा या तक्रारी तपासून पाहून त्यांना ब्लॅकलिस्ट मध्ये टाकून त्यांच्या विरुध्द गुन्हेगारी स्वरुपाची कारवाई करण्याच्या दृष्टीने शासन पावले उचलणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन 2002 साली संबंधिताविरुध्द कोणती कारवाई सुरु करण्यात आली होती याची माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. परंतु या संदर्भात 48 सदनिकाधारक आहेत, त्या इमारतीच्या बाजूला दोन सर्व्हे नंबर होते त्या सर्व्हे नंबरमधील प्रॉपर्टी

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13426...

श्री.भास्कर जाधव...

या विकासकाने खरेदी केलेली आहे. ती प्रॉपर्टी महानगरपालिकेच्या नावावर करण्याचे काम आता सुरु झालेले आहे. परंतु ते अंतिम टप्यात आलेले नाही वा ते पूर्णत्वास गेलेले नाही. या ठिकाणी डी.पी. रोड गेलेला असून त्यासाठी लागणारा एफएसआय लोड करण्याची प्रोव्हिजन करण्यात आलेली आहे. दुसरी गोष्ट अशी आहे की, या ठिकाणी बांधकामासाठी जी कमी जागा पडते त्यासाठी बाजारातून टीडीआर आणावा व तो टीडीआर यावर लोड केला जावा हा टीडीआर लोड केल्यानंतर 48 फ्लॅटधारकांचे 2 हजार 597.4 चौरस फुटाचे वाढीव बांधकाम दिसून येते त्या 48 फ्लॅटधारकाला संरक्षित केले जाईल अशा प्रकारची व्यवस्था शासन काळजीपूर्वक करीत असून त्यालाच पुणे पॅटर्न म्हटले जाते.

श्रीमती दीप्ती चवधरी : सभापती महोदय, अमृत कलश सोसायटीचाच हा प्रश्न नाही तर पुण्यामध्ये अनेक ठिकाणी टीडीआर मिळेल या भरवशावर अनेक बिल्डर्सनी पुण्यामध्ये बांधकामे केलेली असून लोक त्या इमारतीमध्ये राहवयास आलेले आहेत .या लोकांची फसवणूक झालेली आहे. माझा प्रश्न एवढाच आहे की, यामध्ये या लोकांचा काहीही दोष नाही. हा प्रश्न केवळ या एका इमारतीपुरताच नसून मी जनरल स्वरुपाचा प्रश्न विचारत आहे की, अनेक ठिकाणी नागरिकांची फसवणूक बिल्डरांकडून केली गेली आहे तेव्हा या लोकांना शासन संरक्षण देणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी हा प्रश्न जनरलाईज केलेला आहे मी त्यांना सांगू इच्छितो की प्रत्येक प्रकरण तपासून पाहूनच त्यासबंधीचा निर्णय घेण्यात येईल सरसकट निर्णय घेणे योग्य होणार नाही.

श्री.मोहन जोशी : पुणे शहरामध्ये महानगरपालिकेचे अधिकारी आणि बिल्डर्स यांची एक साखळी निर्माण झालेली आहे व त्यातून अशा प्रकारची बांधकामे केली जातात. माननीय मंत्र्यांनी मघाशी उत्तर देतांना असे सांगितले की यामध्ये फार मोठा घोटाळा काही नाही. मी त्यांना सांगू इच्छितो की पुणे शहर वाढत चालले असताना अधिकारी आणि बिल्डर हे या शहराची लूटमार करीत आहेत. संबंधितावर शासनाकडून जी काही कारवाई करावयास पाहिजे होती ती केली जात नाही. अशा प्रकारे पुण्यामध्ये आय.टी.साठी दोन एफ.एस.आय. देण्याची घोषणा पुणे महानगरपालिकेने केली होती.

नंतर श्री.सरफरे ...

अप्रकाशित / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13426...

श्री. मोहन जोशी...

आय.टी. च्या नावावर पुणे शहरातील एफएसआयचा वापर करुन 400 इमारती उभ्या करण्यात आल्या आहेत त्यांच्यावर आपण काय कारवाई करणार आहात, त्यासाठी आपण चौकशी समिती नेमून चौकशी करणार काय? दुसरा प्रश्न असा की, या वास्तू विशारदांनी आणि बिल्डर्सनी आतापर्यंत अनेक वेळा पुणे महानगरपालिकेला फसविले आहे. त्यांना फक्त कारणे दाखवा नोटिस देण्यात आली आहे. त्यांना आपण काळया यादीमध्ये टाकून त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करणार काय?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी पुन्हा एकदा माननीय सदस्यांचे लक्ष वेधतो की, या बिल्डरने प्रत्यक्षपणे एका कृतीने सिस्टीमलाच चॅलेज दिले आहे असे मला वाटते, अशा प्रकारचे भाष्य मी मघाशी केले . त्यामुळे काहीच नाही अशा प्रकारचे भाष्य मी केले नाही. माननीय सदस्यांनी त्या बिल्डर्सवर फौजदारी गुन्हा दाखल करणार काय असा प्रश्न विचारला आहे? मघाशी उत्तर देतांना मी म्हटले होते की, डीसीआरमध्ये काय तरतूद आहे हे तपासून पहावे लागेल. आर्किटेक्टवर कारवाई करुन त्याला काळया यादीमध्ये टाकण्या संबंधीची तरतूद डीसीआरमध्ये असल्यामुळे आपण तशी कारवाई करतो. या उप्परही विकासकाविरुध्द सुध्दा फौजदारी गुन्हा दाखल करता येतो की नाही याबाबत कायदेशीर बाब तपासून पाहिली जाईल व डीसीआरमध्ये काहीही तरतूद असली आणि कायदेशीर बाबीमध्ये ही बाब बसत असेल तर त्या संदर्भात सुध्दा शासनाला विचार करण्यास हरकत नाही.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, या ठिकाणी मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराची पुनरुक्ती केली आहे. आपण अधिकाऱ्यांवर कारवाई केली आहे. माझ्या माहिती प्रमाणे डीसीआर म्हणजे डेव्हलपमेंट कंट्रोल रेग्युलेशन आहे. या बाबत कारवाई करण्यासाठी आपल्याकडे एमआरटीपी ॲक्ट आहे, त्या ॲक्टमध्ये आपल्याला फौजदारी कारवाई करण्याबाबत तरतूद आहे काय? अशाप्रकारची कारवाई करण्याकरिता ॲक्टचा आधार घ्यावा लागतो, त्या ॲक्टचा आधार घेऊन आपण फौजदारी कारवाई करणार काय? दुसरा प्रश्न असा की, संपूर्ण महाराष्ट्राचे शहरीकरण सुरु आहे, ते होत असतांना कायद्यातील पळवाटांचा आधार घेऊन अनिधिकृत बांधकामे करुन शहरे बकाल करण्याचे काम सुरु आहे त्याला पायबंद घालण्यासाठी कायद्यातील पळवाट

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/

ता.प्र.क्र. 13426...

श्री.प्रकाश बिनसाळे....

सील करुन एक सक्षम अशाप्रकारचा कायदा करुन या प्रकारांना शिस्त लावण्याचे काम करणार काय?

श्री भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी या ठिकाणी एमआरटीपी ॲक्टचा उल्लेख केला. या कायद्यातील तरतुदीमध्ये फौजदारी गुन्हा दाखल करण्याची तरतूद आहे. मघाशी म्हटल्याप्रमाणे ही बाब कायदेशीर रित्या तपासून पाहून शक्य असेल तर निश्चितपणे फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**एमपीएससी उमेदवारांची नेटवर्क सेंटर्सकडून होत असलेली लुट**

**(६) * १३१६५ श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.राजन तेली , श्री.सुभाष चव्हाण , श्री.चरणसिंग सप्रा , डॉ.सुधीर तांबे , श्री.हुसेन दलवाई , श्री.विजय सावंत , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.एम.एम.शेख , श्रीमती दिप्ती चवधरी , श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेसाठी परीक्षार्थींना माहे ऑक्टोबर, २०१० पासून ऑनलाईनवर अर्ज भरण्यासाठी सर्व्हिसचार्ज म्हणून फक्त २४ रूपये असताना प्रत्यक्षात परीक्षार्थींकडून नेटवर्क सेंटर्स चालक १२५ रूपये वसूल करीत असल्याचे माहे डिसेंबर, २०१० मध्ये वा त्यादरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार परीक्षार्थ्यांची लूट करणारे नेटवर्क सेंटर्स चालक व लोकसेवा आयोग यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. फौजिया खान, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, एमपीएससी मार्फत ऑन लाईनच्या माध्यमातून सुशिक्षित बेरोजगारांची मोठया प्रमाणात लूट केली जात आहे. छापील उत्तरामध्ये "प्रश्न उद्‌भवत नाही" असे म्हटले आहे. परंतु माझ्या माहितीप्रमाणे रजिस्ट्रेशनसाठी २४ रुपये, बायोडाटा फिडींगसाठी २४ रुपये, मेल चार्जेससाठी ३० रुपये, चलन भरण्यासाठी १० रुपये, ई-मेलसाठी १० रुपये असे मिळून ११८ रुपये होतात. असे असतांना त्यांच्याकडून १२५ रुपये घेतले जातात अशा प्रकारची तक्रार वारंवार केली गेली आहे. हे काम मे. वॉस्ट इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला देण्यात आले आहे. या ठिकाणी रजिस्ट्रेशनसाठी फक्त २४ रुपये घ्यावयाचे असतांना वरचे जे पैसे त्या कंपनीकडून घेतले जात आहेत, या करिता त्या कंपनीविरुध्द आपण कारवाई करणार काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, महाराष्ट्र लोक सेवा आयोगाने ऑन लाईन पध्दतीने अर्ज मागविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानंतर मे. वॉस्ट इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला हे काम देण्यात आले आहे. पूर्वी अर्जासाठी १०० रुपये फी घेतली जात होती, आता ती फी राहणार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/

ता.प्र.क्र. १३१६५...

प्रा. फौजिया खान...

नसून उमेदवारांनी नि:शुल्क अर्ज भरावयाचा आहे. या करिता सदर कंपनीने २५० तालुक्यामध्ये सायबर कॅफेमध्ये अशाप्रकारची सुविधा निर्माण करुन दिली आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KTG/ MMP/ पूर्वी श्री.सरफरे . . .. 10:55

ता.प्र.क्र.13165 . . ..

प्रा.फौजिया खान . . . .

त्यांनी हे अर्ज भरण्यासाठी नेट कॅफेमध्ये दर ठरवून दिलेले आहेत. सदरहू नेट कॅफे ज्या सर्व्हीसेस देतील त्यासाठी 24 रुपये इतके शुल्क आकारण्यात येईल. या शिवाय जास्त रक्कम आकारण्यात येऊ नये असे शासनाने त्यांच्याकडून कबूल करुन घेतलेले आहे.अशा वेळी नेट कॅफेमध्ये अशा सुविधा देण्यात येत आहेत की, विद्यार्थ्यांची वैयक्तिक माहिती, त्यांच्या छायाचित्राचे स्कॅनिंग, त्याच्या सहीचे स्कॅनिंग, त्यांनी बँकेमध्ये पैसे भरल्यानंतर ट्रान्झॅक्शन आय.डी.पाठविणे इ. साठी 24 रुपये शुल्क आहे. जर विद्यार्थ्यांनी इंटरनेट कॅफेमध्ये दुसरी सुविधा वापरली तर त्यासाठी ते जास्त शुल्क घेऊ शकतात. पण विद्यार्थ्यांसाठी ही केवळ सुविधा आहे, ते बंधनकारक नाही. ज्यांना घरामध्ये बसून माहिती भरावयाची आहे, ते घरातून भरु शकतात. ज्यांना दुसऱ्या सायबर कॅफेमध्ये जावयाचे असेल तर ते तेथेही जाऊ शकतात. मघाशी म्हटल्याप्रमाणे ही केवळ सुविधा आहे आणि यामध्ये लूट करण्याचा काही प्रश्न उद्‌भवत नाही.

----

. . . .एल-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबईतील कांदिवली-चारकोप उपनगरातील सेक्टर क्रमांक 1 मधील जलवाहिनीतून होणारी पाणी गळती**

**(7) *14109 श्री.हेमंत टकले, ॲड. उषाताई दराडे,श्री.रमेश शेंडगे, श्री.विक्रम काळे, श्री.प्रकाश बिनसाळे** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईतील कांदिवली-चारकोप सेक्टर नं.1 येथे माहे डिसेंबर, 2010 मध्ये वा त्या दरम्यान जलवाहिनीतून एक महिना सतत पाणी गळती होत असतानासुध्दा सदर पाणी गळती रोखण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर जलवाहिनीतून होणारी पाणी गळती रोखण्याबाबत विलंब करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1) प्रश्नाधीन गळती दुरूस्ती करण्यास विविध कारणास्त काही कालावधी लागला हे खरे आहे. तथापि जलवाहिनीमधील सदर गळती दि.15.1.2011 रोजी दुरूस्त करण्यात आली आहे.

(2) व (3) प्रश्न उद्भवत नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, मुंबई सारख्या मोठया शहरामध्ये अनेक भागात पाण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे, तेथे पाणी पुरवठा व्यवस्थित होत नाही. परंतु याबाबतीत सांगावयाचे तर बऱ्याच ठिकाणी पाण्याची गळती होत असल्याने पाणीपुरवठा व्यवस्थित होत नाही असे दिसून आलेले आहे. पाण्याची गळती थांबविण्यासाठी नेहमी विलंब होत राहिला आणि आता वाढत जाणारा उन्हाळा लक्षात घेता त्यासाठी तातडीने काही उपाययोजना करुन प्रतिबंधात्मक कारवाई करण्याच्या बाबतीत शासनाकडून मुंबई महानगरपालिकेला काही सूचना देण्यात येणार आहेत काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, पाणी गळती थांबविण्यासाठी उपाययोजना करणे आणि प्रतिबंधात्मक कारवाई करणे याबाबत अगोदर सूचना दिलेल्या आहेत आणि आताही देता येतील. पण याला थोडा विलंब का झाला ? याचे कारण असे आहे की, आपले रस्ते हे सिमेंट कॉंक्रीटचे असून, त्याच्या बाजूला पेवरब्लॉक असतात. या पेवरब्लॉकच्या खालून काही केबल, पाईप लाईन असतात. परंतु मुंबईतील कांदिवली-चारकोप या उपनगरातील सेक्टर क्रमांक 1 मधील पाईप हा सिमेंट कॉंक्रीटच्या रोडखाली राहिला होता. त्यामुळे तो दुरुस्त करण्यासाठी वेळ लागला. याची दखल घेऊन, ज्या-ज्या ठिकाणी अशा प्रकारचे पाईप आहेत, त्याठिकाणी पर्यायी पाईप लाईन टाकून यापुढे अशा प्रकारे पाईप नादुरुस्त होणार नाहीत याची काळजी घेण्यात आलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही





ता.प्र.क्र.14109 . . ..

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, मला माननीय मंत्री महोदयांना याच प्रश्नाच्या अनुषंगाने एक जनरल स्पेसिफीक प्रश्न विचारावयाचा आहे. मुंबई शहरातील पाण्याच्या पाईप लाईन्स्, ड्रेनेजच्या पाईप लाईन्स् सुध्दा जुन्या म्हणजे 100 वर्षापासूनच्या आहेत. आपण मुंबई शहरामध्ये मोठ्या प्रमाणावर कॉंक्रीटीकरणाचा कार्यक्रम हाती घेत आहोत आणि अनेक पाईप लाईन्स् कॉंक्रीट रस्त्याच्या खाली आहेत ही वस्तुस्थिती आहे. त्याचे शिफ्टींग झालेले नाही. अशा वेळी रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करीत असताना योजनाबध्द रितीने सर्व ड्रेनेज लाईन्स्, सिव्हरेज लाईन्स्, पाण्याच्या लाईन्स् आहेत त्याचे शिफ्टींग करणार आहात काय ?

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी प्रश्न विचारावा.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, यासंदर्भात शासन मुंबई महानगरपालिकेला वेगळा कार्यक्रम घेण्यासाठी भाग पाडणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, या पाईप लाईन जुन्या असून त्यांची आयुष्य मर्यादा संपलेली आहे. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेने टप्प्याटप्प्याने या सर्व पाईप लाईन बदलण्याच्या बाबतीत कार्यक्रम हाती घेतलेला आहे. आपण गेल्या वर्षीचे म्हणजे 2010-2011 मधील मुंबई महानगरपालिकेचे बजेट पाहिले तर त्यामध्ये 1089 कोटी रुपयांची तरतूद या कामासाठी ठेवण्यात आलेली आहे आणि यंदा देखील अधिक तरतूद ठेवण्याबाबत सूचना करण्यात आली आहे.

----

. . . .एल-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**मद्यपान करुन वाहन चालविणाऱ्यांचा परवाना रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव**

(8) ***12864 श्री.सुभाष चव्हाण, श्री.राजन तेली, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.दिवाकर रावते , डॉ.दिपक सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे,श्री.किसनचंद तनवाणी,श्री.परशुराम उपरकर,श्री.चरणसिंग सप्रा, श्री.सुभाष भोईर,श्री.हेमंत टकले,श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती दिप्ती चवधरी,डॉ.सुधीर तांबे, श्री.हुसेन दलवाई, श्री.जयप्रकाश छाजेड** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) राज्यात मद्यपान करुन गाडी चालविण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे या मद्यपान करुन वाहन चालविणाऱ्यांचा परवाना रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव मा.गृहमंत्री यांनी केंद्र शासनाकडे पाठविण्याचा निर्णय माहे जानेवारी, 2011 मध्ये वा त्या दरम्यान घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर प्रस्ताव केंद्र शासनाकडे लवकरात लवकर पाठविण्याबाबत व त्याच्यावर त्वरित निर्णय घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) अद्याप कोणताच निर्णय घेण्यात आला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव देवकर, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1) मद्यपान करुन वाहन चालविणाऱ्यांचा परवाना रद्द करण्याबाबत मा.मंत्री (गृह) यांनी दिनांक 31.01.2011 रोजी घोषणा केली आहे.
(2) व (3) त्यानुषंगाने प्रस्ताव तपासण्यात येत आहे.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, तारांकित प्रश्न क्रमांक 12864 . . ..

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरात मला आपल्या परवानगीने पुढील सुधारणा करावयाची आहे.

याठिकाणी पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये "मद्यपान करुन वाहन चालविणाऱ्यांचा परवाना रद्द करण्याबाबत मा.मंत्री (गृह) यांनी दिनांक 31-01-2011 याऐवजी "दिनांक 15-01-2011 रोजी घोषणा केली आहे." असे वाचावे.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, दिनांक 15-01-2011 रोजी घोषणा केल्यानंतर आजतागायत अशी किती प्रकरणे आढळून आलेली आहेत ? त्यावर शासनाने काय कार्यवाही केलेली आहे ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये मागच्या वर्षी जवळपास 8354 प्रकरणे झालेली आहेत. त्यामधून 3 कोटी 14 लाख 87 हजार 950 रुपयांचा दंड वसूल केलेला आहे.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ KTG/ प्रथम सौ. रणदिवे.... 11:00

ता.प्र.क्र. 12864.......

श्री. गुलाबराव देवकर.....

जानेवारी,2011 ते मार्च, 2011 पर्यंत 1452 प्रकरणे झालेली आहेत त्या माध्यमातून 75 लाख 34 हजार रुपयांचा दंड मुंबई शहरातून वसूल केलेला आहे. मागच्या वर्षामध्ये सन 2010 मध्ये जवळपास 38,451 केसेस संपूर्ण राज्यामध्ये झालेल्या आहेत. त्याचा दंड जवळपास 6 कोटी 26 लाख रुपये वसूल करण्यात आलेला आहे.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, प्रश्नामध्ये असे म्हटले आहे की,"मद्यपान करुन वाहन चालविणाऱ्यांचा परवाना रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्यात आलेला आहे." सभापती महोदय, मद्यपान करुन वाहन चालविणे हा फार गंभीर विषय आहे. त्यामुळे अनेक अपघात होतात. तेव्हा केवळ परवाना रद्द करण्या ऐवजी शिक्षेची तरतूद करण्याचा विचार करण्यात येणार आहे काय?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, या संदर्भातील कायद्यामध्ये शिक्षेच्या तरतुदीचा उल्लेख ऑलरेडी करण्यात आलेला आहे. जो कोणी मोटार वाहन चालवित असेल आणि तो दारु पिऊन वाहन चालवित असेल तर श्वासाची तपासणी करणाऱ्याने केलेल्या चाचणीत त्याच्या 100 मिली लिटर रक्तामध्ये जर 30 मिलीग्रॅम पेक्षा अधिक अल्कोहोल असल्याचे आढळून आले असेल किंवा तो औषधीद्रव्याच्या इतक्या अंमलाखाली असेल की, त्याला वाहनावर योग्य तो ताबा ठेवणे शक्य होणार नाही, अशा वाहन चालकाला पहिल्या अपराधाबाबत सहा महिन्या पर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची तुरुंगवासाची किंवा दोन हजार रुपया पर्यंतच्या दंडाची शिक्षा असू शकेल किंवा या दोन्ही शिक्षा होऊ शकतील. तसेच पूर्वीचा अपराध केल्या पासून तीन वर्षाच्या आत पुन्हा तसाच अपराध करण्यात आला तर कोणत्याही दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधा बद्दल दोन वर्षा पर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची तुरुंगवासाची किंवा तीन हजार रुपयापर्यंत असू शकेल इतक्या दंडाची किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतील. अशा पध्दतीने शिक्षा करण्याची तरतदू आज कायद्यामध्ये आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी दारु कशी प्यावी, या संदर्भात मार्गदर्शन केलेले आहे. 100 मिली लिटर रक्तामध्ये 30 मिलग्रॅम पेक्षा अधिक अल्कोहोल आढळून आले तर तो शिक्षेस पात्र आहे. पण किती पेग प्यायल्यानंतर 30 मिलीग्रॅम पेक्षा अधिक अल्कोहोल आढळून येते. म्हणजे अमुक एवढी दारु घेतली तर 30 मिलीग्रॅमपेक्षा अधिक अल्कोहोलची लिमिट पुढे जात नाही, याबाबतीत या सभागृहाला मार्गदर्शन करण्यात यावे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 12864.......

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, यासंदर्भात कायद्यामध्ये तरतूद केलेली असून त्या तरतुदीप्रमाणे शिक्षा करण्यात येते.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे. आज सभागृहामध्ये केवळ अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा होईल. सर्व सन्माननीय सदस्यांना अर्थसंकल्पावरील चर्चेत भाग घेण्याची संधी उपलब्ध व्हावी म्हणून आज नियम 93 अन्वये सूचना, विशेष उल्लेख, लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येणार नाहीत. तसेच आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चा देखील घेण्यात येणार नाहीत, याची सन्माननीय सदस्यांनी नोंद घ्यावी.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. हसन मुश्रीफ ( कामगार मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन 2009-2010 चा एकोणचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

---

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "कोल्हापूर जिल्हा माथाडी आणि असंरक्षित कामगार मंडळ, कोल्हापूर यांचा सन 2006-2007 चा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**मु. शी.** : सन 2011-2012 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

( चर्चा पुढे चालू )

**सभापती** : अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेचा आजचा दुसरा दिवस आहे. चर्चेत भाग घेऊ इच्छिणाऱ्या सदस्यांची भाषणे आजच पूर्ण करावयाची आहेत. चर्चेसाठी आज जो एकूण वेळ उपलब्ध होईल त्यापैकी निम्मा वेळ सत्ताधारी पक्षातील सदस्यांकरिता आणि निम्मा वेळ विरोधी पक्षाचे सदस्य तसेच अपक्ष सदस्यांकरिता देण्यात येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांचे उत्तर आजच होणार आहे का ?

**सभापती** : माननीय मंत्री महोदयांचे उत्तर उद्या होईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आज आपल्याकडे 3 तासाचा वेळ उपलब्ध आहे. या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी ज्या सदस्यांनी नावे आलेली आहेत त्यांची संख्या पाहता या वेळेत सर्व सन्माननीय सदस्यांची भाषणे पूर्ण होणे शक्य नाही. त्यामुळे आज जे सन्माननीय सदस्य शिल्लक राहतील त्यांना उद्या माननीय मंत्री महोदयांच्या उत्तराच्या आधी एखादा तास बोलू द्यावे.

**सभापती** : माझा निर्णय असा आहे की, आज 3 तासामध्ये सर्व सन्माननीय सदस्यांची भाषणे संपवावयाची आहेत. उद्या फक्त माननीय मंत्री महोदयांचे उत्तर कामकाज पत्रिकेत दाखविण्यात येईल. आता आपल्याला चर्चेसाठी तीन तासाचा वेळ उपलब्ध आहे. त्यातील निम्मा वेळ सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांना आणि निम्मा वेळ विरोधी पक्षाच्या सदस्यांना देण्यात येईल. या चर्चेत भाग घेण्यासाठी माझ्याकडे मोठ्या प्रमाणावर सदस्यांची नावे आलेली आहेत. आज उपलब्ध असलेल्या वेळेत एवढ्या सन्माननीय सदस्यांची भाषणे पूर्ण होऊ शकणार नाहीत. त्यामुळे माझी गट नेत्यांना विनंती आहे की, दीड तासामध्ये किती सदस्यांची भाषणे होतील याचा विचार करुन त्या दृष्टीने सन्माननीय सदस्यांची नावे देण्याबाबत फेरविचार करावा.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, विधानसभा सभागृहाचा आणि या सभागृहाचा काही संबंध नाही हे आपल्याला माहीत आहे तरी सुध्दा माझ्या माहितीनुसार विधानसभा सभागृहामध्ये उद्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा ठेवलेली आहे आणि त्यामध्ये माननीय मंत्री महोदयांच्या उत्तराच्या अगोदर सन्माननीय सदस्यांची भाषणे होणार आहेत. त्यामुळे आपल्या सभागृहात सुध्दा उद्या काही सन्माननीय सदस्यांना भाषणे करु दिली तर काही अडचण येणार नाही असे मला वाटते. तशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : माझ्या माहितीप्रमाणे आज विधानसभेच्या सभागृहात अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा होणार नाही. तेथे आजच्याऐवजी उद्या चर्चा होणार आहे. आज आपण अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांची भाषणे पूर्ण करण्याचे ठरविलेले आहे. त्यामुळे उद्या सन्माननीय सदस्यांची भाषणे न होता केवळ मंत्री महोदयांचे उत्तर होईल अशा प्रकारचा कार्यक्रम ठरविलेला आहे.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2011-12 च्या सर्वसाधारण चर्चेत भाग घेण्यासाठी आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल प्रथम मी आपले आभार मानतो.

सभापती महोदय, ज्यावेळी राज्य सरकार अर्थसंकल्प सादर करते त्यावेळी त्याच्या माध्यमातून राज्याला कोणत्या दिशेने घेऊन जाणार आहे, कशा पध्दतीने राज्याची प्रगती करणार आहे, कोणत्या क्षेत्रांवर फोकस राहणार आहे याची दिशा त्यामध्ये असते. कोणत्याही राज्याला प्रगतीच्या वाटेवर जायचे असेल तर पायाभूत सुविधा, मूलभूत सुविधा यावर लक्ष केंद्रीत करणे गरजेचे असते. राज्याच्या अर्थव्यवस्थेला बळकट करण्याचे काम अर्थसंकल्पाच्या माध्यमातून होते. त्यात जे घटक आहेत, त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी अर्थसंकल्पाचा उपयोग केला जातो.

सभापती महोदय, मी शासनाचे अभिनंदन करतो. कारण पाटबंधारेच्या सुविधा शासनाने केलेल्या आहेत त्या संदर्भात खूप आकडेवारी देता येईल. परंतु त्यातून फारसे साध्य होत नाही. हे आकडे पुस्तकात असल्यामुळे मी त्याचा उल्लेख करणार नाही. पाटबंधारे विभागाची समस्या असेल, त्यासाठी राज्य सरकारने मोठ्या प्रमाणावर अर्थसंकल्पातून पैसा उपलब्ध करुन दिलेला आहे. रोड इन्फ्रास्ट्रक्चरच्या माध्यमातून वेगवेगळ्या योजना अर्थसंकल्पातून घेतलेल्या आहेत. विजेचा प्रश्न असेल त्यासाठी 3500 हजार कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात केलेली आहे. खाजगीकरणाच्या सहभागातून विजेचा प्रश्न सोडविण्यासाठी सरकारने मोठया प्रमाणात पावले उचलली आहेत. हे सर्व करीत असताना राज्याला प्रगतीच्या वाटेवर घेऊन जाण्याचा प्रयत्न राज्य सरकार करीत असताना काही गोष्टींची खंत मनामध्ये राहणार आहे. आज आपण एकविसाव्या शतकामध्ये आहोत. एकविसाव्या शतकाच्या युगामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची गरज मोठ्या प्रमाणात मान्य करीत असतो. आज सकाळच्या सत्रामध्ये सिम्युलेटरच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञान शासनाच्या वेगवेगळ्या उपक्रमात कशा पध्दतीने वापरता येइल यावर मोघम स्वरुपात चर्चा केली आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाबरोबरच पर्यावरणाचा विचार पुढे आलेला आहे. संपूर्ण जगाचा विचार केला तर पर्यावरणासंबंधी चिंता व्यक्त करण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. मग त्सुनामी असेल, भूकंप असेल, अवेळी पडणारा पाऊस असेल किंवा अतिवृष्टी असेल. हे पर्यावरणामधील

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/

श्री.प्रकाश बिनसाळे.....

बदल झाल्याचे परिणाम आहेत. त्यामुळे माझ्यासारख्या माणसाला निश्चित असे वाटत असते की, शासनाच्या वतीने ठोस कार्यक्रम सुरु केले पाहिजेत. त्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी, लोकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी शिबिरे आयोजित केली पाहिजेत. त्यासाठी आर्थिक तरतूद मोठ्या प्रमाणात केली पाहिजे. परंतु या अर्थसंकल्पात विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण यासाठी केवळ 28.50 कोटी इतकी तुटपुंजी तरतूद केल्याचे दिसून येते. मला वाटते की, राज्य सरकारने पर्यावरण या विषयाकडे गंभीरपणे पाहण्याची आवश्यकता आहे. जर पृथ्वीतलच राहणार नसेल, जर पर्यावरणाचा ऱ्हास होऊन त्याचे परिणाम मानव जातीला भोगावे लागणार असतील, त्यामुळे मानव जातच शिल्लक राहणार नसेल तर कोणत्याही अर्थसंकल्पाला अर्थ उरणार नाही. म्हणून पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी राज्य सरकारने कोठे तरी लक्ष देणे आवश्यक आहे. राज्य सरकार या प्रश्नाकडे लक्ष देत आहे, विचार करीत आहे असे लोकांना वाटले तरच शासन लोकांचे प्रबोधन करु शकेल. लोकांना प्रवृत्त करता येईल. आपण पर्यावरणाचे रक्षण केले पाहिजे, प्लास्टिकचा वापर करु नये यासाठी शासनाने स्वत:पासून सुरुवात केली पाहिजे. हे काम केले पाहिजे. पण ते होत असल्याचे मला दिसून येत नाही.

सभापती महोदय, गुप्त वार्ता शाखा या नवीन हेडसाठी शासनाने तरतूद केलेली आहे. केवळ मुंबई शहरामध्ये नाही तर महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात विविध पध्दतीने विदेशी शक्ती आघात करीत आहेत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे...;

विविध घातपाताचे प्रकार होत आहेत. जातीय दंगली घडविण्याचे प्रकार होत आहेत. हे प्रकार होत असताना त्याची माहिती सरकारला नसते. ही माहिती वेळीच प्राप्त व्हावी म्हणून गुप्तवार्ता विभाग सक्षम आणि बळकट करणे, त्याचे आधुनिकीकरण करणे, त्या विभागाला आावश्यक असणारे मनुष्यबळ उपलब्ध करुन देणे, लागणारी अद्ययावत यंत्रणा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे जेणेकरुन ज्या काही अनिष्ट गोष्टी पुढे घडणार असतील त्याची ॲडव्हान्स माहिती राज्य सरकारला मिळू शकेल आणि त्या गोष्टींना पायबंद घालणे, त्या गोष्टी घडू नयेत यासाठी दक्षता घेणे राज्य सरकारला सोपे जाईल. परंतु या अर्थसंकल्पामध्ये गुप्तवार्ता विभागाला अत्यंत कमी तरतूद करण्यात आलेली आहे. ही तरतूद वाढविण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, माझ्या सारख्या मुंबई शहरामध्ये जन्मलेल्या आणि मुंबई शहरात लहानाचा मोठा झालेल्या आणि कोकणाच्या मातीशी ज्याची नाळ जुळलेली आहे अशा माणसाला मुंबई-गोवा महामार्गाचा या अर्थसंकल्पामध्ये कुठे तरी उल्लेख व्हावा असे वाटते. परंतु तसा उल्लेख या अर्थसंकल्पामध्ये नाही. या अर्थसंकल्पामध्ये रस्त्यांच्या चौपदरीकरणाचा, सागरी महामार्गाचा, पुलांचा आणि रस्त्यांचा उल्लेख असून त्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधीची तरतूद केलेली आहे. कोकणातील पर्यायी सागरी मार्गाच्या काही निवडक पुलांची कामे शिल्लक आहेत. ही पुलांची कामे पूर्ण करुन हा सागरी मार्ग पुढील 5 वर्षामध्ये पूर्ण करण्याचे उद्दिष्ट डोळया समोर ठेवले तर केवळ कोकणाचाच विकास होईल असे नाही तर या सागरी महामार्गाच्या माध्यमातून राज्यात पर्यटनाच्या माध्यमातून एक नवीन अर्थव्यवस्था निर्माण होईल. देशातील गोवा, केरळ या राज्यांमध्ये तसेच विदेशातील मॉरिशस, हाँगकाँग, सिंगापूर सारख्या शहरामध्ये पर्यटनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर महसूल मिळतो. तशा प्रकारे जास्तीत जास्त महसूल राज्य शासनाला हा सागरी महामार्ग पूर्ण झाल्यावर मिळू शकेल. शासनाने सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केलेला आहे. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड या कोकणातील जिल्ह्यांना 720 कि.मी.चा विशाल समुद्र किनारा लाभलेला आहे. कोकण हा निसर्ग सौंदर्याने नटलेला आहे. या ठिकाणी पर्यटनासाठी आवश्यक असणा-या पायाभूत सुविधा निर्माण केल्या तर पर्यटन उद्योगाला चालना मिळू शकेल. त्यामुळे रोजगाराच्या संधी निर्माण होतील आणि राज्याची अर्थ व्यवस्था बळकट होईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे...

सभापती महोदय, आता पर्यन्त ज्याचा याठिकाणी उल्लेख झालेला नाही अशा मुद्याला स्पर्श करणे हे मी माझे कर्तव्य समजतो. जेव्हा आपण विविध योजना आखतो त्या वेळी आपल्याला निधीची कमतरता भासत असते. असे का होते ? वसूल न झालेला महसूल हे त्या मागील एक कारण आहे. सभापती महोदय, वसूल न झालेल्या महसुलाचा आकडा रु.27319.24 कोटी इतका आहे. मोटार स्पिरिट, वंगण यावरील रु. 20773 कोटीची वसुली झालेली नाही. ही वसुली करण्यासाठी राज्य शासनाने ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. केन्द्रीय विक्रीकराचे रु.4710 कोटी वसूल झालेले नाहीत. तसेच प्रवासी कराची रु. 107 कोटीची, जमीन महसुलाची रु. 161 कोटी, गौण खनिजाची रु. 307 कोटीची वसुली झालेली नाही. मुद्रांक शुल्क आणि नोंदणी फी विभागाचे मी या निमित्ताने अभिनंदन करतो कारण त्यांच्या विभागाकडे कोणत्याही प्रकारची वसुली बाकी नाही. इतर विभागाकडून देखील अशा प्रकारे वसुली झाली पाहिजे. त्यासाठी काही उपाययोजना केल्या पाहिजेत. 27 हजार कोटी रुपयाची कर वसुली बाकी आहे. व्याज माफी देऊन ही कर वसुली केली तर हा निधी राज्याच्या विकासासाठी वापरता येईल.

सभापती महोदय, या सादर केलेल्या अर्थसंकल्पाबाबत मी शासनाचे अभिनंदन करीत असताना असे सांगू इच्छितो की, शासनाने ग्रामीण भागाकडे जास्तीत जास्त लक्ष देणे आवश्यक आहे. आज शहरीकरण 60 ते 70 टक्क्यापर्यन्त पोहोचले आहे. शहरीकरणामध्ये वाढ होत असताना ही शहरे सुनियोजित कशी होतील, मलनिस्सारण, पिण्याचे पाणी अशा पायाभूत सुविधांनी परिपूर्ण असलेली शहरे कशी होतील याकडे शासनाने लक्ष देऊन त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला तर आपले राज्य हे देशात पहिल्या क्रमांकावर राहील.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ 11:20

श्री. प्रकाश बिनसाळे....

मी शासनाचे या निमित्ताने अभिनंदन करतो की, अतिशय चांगला अर्थसंकल्प सभागृहात मांडण्यात आलेला आहे. या अर्थसंकल्पात ज्या काही त्रुटी राहिलेल्या आहेत, त्याची भरपाई माननीय वित्त मंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणात दिली तर महाराष्ट्रातील जनतेला निश्चितपणे फार मोठा दिलासा मिळेल एवढेच या निमित्ताने बोलतो आणि आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आभार व्यक्त करतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

-------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, आज विरोधी पक्षाचे सदस्य सदनात कमी असल्यामुळे मला वेळ देण्याच्या बाबतीत आपण नेहमीप्रमाणे उदार दृष्टीकोन ठेवाल अशी मी अपेक्षा ठेवते. महाराष्ट्रात तसेच देशात अनेक घोटाळे झालेले आहेत. श्री. हसन अली यांचा हवाला घोटाळा 36 हजार कोटी रुपयांचा आहे. 2 जी स्पेक्ट्रम घोटाळा 27 हजार कोटी रुपयांचा आहे. आजच सुप्रीम कोर्टाने सरकारला विचारलेले आहे की, या सगळया काळया पैशांचा स्त्रोत कोठून आहे ? आपण एका बाजूला बजेट बघितले तर ते अतिशय तुटपुंजे आहे. बजेट कोठे कोठे तुटपुंजे आहे, या बाबतीतील अनेक उदाहरणे मी सभागृहासमोर मांडणार आहे. अब्जावधी रुपयांचा काळा पैसा बाजारात येतो याचा शोध घेण्याची नितांत आवश्यकता आहे. आज क्रिकेट मॅच आहे. या मॅचच्या अनुषंगाने काही हजार कोटी रुपयांचा सट्टा लागलेला आहे. याचा अर्थ एक संपूर्ण पर्यायी अर्थव्यवस्था काम करीत आहे. या गोष्टीस रोखण्याच्या संदर्भामध्ये शासनाकडून परिणामकारक उपाययोजना करणे आवश्यक आहे. मी या ठिकाणी एक उदाहरण देऊ इच्छिते. लवासा प्रकल्पाला बेकायदेशीर उत्खननासाठी शासनाने 100 कोटी रुपयांचा दंड नुकताच केला. लवासा प्रकल्पाच्या विरोधात जनतेने अंदोलन केले नसते, विरोधी पक्षाने सभागृहात प्रश्न विचारले नसते तर 100 कोटी रुपयांचा महसूल निश्चितपणे बुडाला असता, ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, या वेळचा शिलकीचा अर्थसंकल्प आहे असा दावा राज्य शासनाकडून केला जात आहे. मला या बाबतीत प्रश्न विचारावयाचा आहे की, शासनाने व्हॅट लागू केला, त्यावेळी शासनाकडून सांगितले गेले होते की, आम्ही जकात रद्द करु. राज्यात ज्या महानगरपालिका आहेत, त्यात विशेषत: "क" आणि "ड" महानगरपालिका आहेत. या महानगरपालिकांना जकात नको आहे. परंतु या संदर्भात गेल्या तीन, चार वर्षात शासनाची धरसोड वृत्ती दिसून आलेली आहे. शासनाकडून एकदा सांगितले जाते की, जकात रद्द करणार आहोत. दुसऱ्यांदा सांगितले जाते की, जकात कर रद्द केला जाणार नाही. तुम्ही तुमचा निर्णय घेऊ शकता. शासन व्हॅटमधील परतावा महानगरपालिकांना देणार होते आणि तो परतावा दिला नाही आणि आपण आपले उत्पन्न शिलकीचे आहे असे दाखविले व केंद्रामध्ये अर्थ विषयक तरतुदी, शिस्त आणि नियम याची अंमलबजावणी होणार आहे आणि ती झाली नाही म्हणून जनतेचा पैसा एका बाजुने व्हॅटने घ्यावयाचा हे कितपत योग्य आहे ? ही गोष्ट योग्य नाही. ही बाब व्यापाऱ्यांवर आणि जनतेवर अन्याय करणारी आहे याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छिते.





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे..

सभापती महोदय, गेल्या दहा वर्षाच्या काळात आपण एका बाजूला असे म्हणतो आहोत की, या राज्यात मोठया प्रमाणात औद्योगिक प्रकल्प आले. यात 16240 औद्योगिक प्रकल्प आहेत, त्यातील 6797 एवढेच औद्योगिक प्रकल्प कार्यान्वीत झाले ही बाब महाराष्ट्राची आर्थिक पाहणीमध्ये नमूद करण्यात आलेली आहे. दुसरी गंभीर गोष्ट अशी आहे की, एवढे प्रकल्प मंजूर झाल्यावर कोकणात आणि नाशिक मध्ये रोजगारात वाढ झाली. परंतु पुणे आणि मुंबईमध्ये रोजगारात घट झाली आहे. प्रकल्प वाढल्यानंतर रोजगार वाढतो असा शासनाकडून दावा केला जातो. परंतु एवढया मोठया औद्योगिक प्रकल्पांना मान्यता मिळूनही त्याची अंमलबजावणी का होत नाही. रोजगारात घट दिसत असेल तर ही गोष्ट निश्चितपणाने चिंताजनक आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, मी तिसऱ्या मुद्याकडे शासनाचे लक्ष वेधू इच्छिते. आज 38.01 जनता दारिद्रय रेखेखाली आहे. शासनाच्या आकडयानुसार गुन्हेगारीच्या प्रमाणाचा देखील मी या निमित्ताने उल्लेख करीत आहे. गुन्हेगारीचे प्रमाण महाराष्ट्रात 7.04 टक्के तर बिहार राज्यात 3.04 टक्के एवढे आहे. महाराट्रात बलात्काराचे गुन्हयांचे प्रमाण 6.09 टक्के आहे, तर बिहारमध्ये 4.03 टक्के एवढे आहे. विशेष म्हणजे यापैकी सात ते आठ आरोपींना शिक्षा होते.

**सभापती** : आपली भाषणाची वेळ संपत आलेली आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मला बोलण्यासाठी अजून थोडा वेळ उपलब्ध करुन द्यावा. मला महिला व बालकल्याण विभागाच्या बाबतीत अजून बोलावयाचे आहे, त्यामुळे मला दहा मिनिटांचा वेळ कृपया वाढवून द्यावा.

**सभापती** : सभागृहातील सर्व सदस्यांना बोलण्याची संधी मिळावी हा दृष्टीकोन समोर ठेवून आपण आपले भाषण करावे.

डॉ. नीलम गोऱ्हे :प्रत्येक सन्माननीय सदस्याला बोलण्यासाठी किती वेळ द्यावा याबाबतचे सर्वस्वी अधिकार आपल्याला आहेत. परंतु आमच्या अधिकाराचे आपण रक्षण करावे अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : पीठासीन अधिकारी वेळेच्या बाबतीत नेहमीच लक्ष घालतात.

4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मला भाषण करण्यासाठी अजून दहा मिनिटांचा वेळ द्यावा अशी विनंती आहे. पूर्वीचे माननीय अर्थ मंत्री श्री.जयंत पाटील यांनी आऊट कम बजेटचा उल्लेख केला होता. आऊट कम बजेटचे पुढे काय झाले याबाबतचे शासनाने कधीच निवेदन केलेले नाही. आमची नवीन माननीय अर्थ मंत्र्यांकडून अपेक्षा आहे की, मागे आऊट कम बजेटची घोषणा झ ाली त्यातून काय निष्पण्ण झाले या बाबतीत माहिती द्यावी.

यानंतर श्री. भोगले...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

दुसरा भाग असा की, श्री.विलासराव देशमुख हे राज्याचे मुख्यमंत्री असताना सरकारने जेंडर रिस्पॉन्स बजेट सादर करु असे जाहीर केले होते. केंद्र सरकारने देखील तसे जाहीर केले होते. माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी यांनी जेंडर रिस्पॉन्स बजेट म्हणजे महिलांसाठी स्वतंत्र बजेट असते असे सांगितले आहे. महिलांसाठी स्वतंत्र बजेट नसते हे मी सांगू इच्छिते.

सभापती महोदय, प्रसार माध्यमे आणि करमणूक विभागावर 5 टक्के कर बसविण्यात आला आहे. परंतु जी चॅनेल्स राष्ट्रीय स्वरुपाची आहेत त्यांची कार्यालये दिल्लीमध्ये असल्यामुळे कर भरण्यासंबंधी पळवाटा काढून दिल्ली येथे सिरियल्सची निर्मिती केल्याचे दाखविण्यात येईल आणि करामध्ये सवलत मिळविली जाईल. परंतु मराठी करमणूक क्षेत्राला मात्र करवाढ द्यावीच लागणार आहे. उलट हिंदी चित्रपट सृष्टीबद्दल सरकारचे प्रेम सर्वश्रूत आहे. कॉपीराईट कर शून्यावर आणून बॉलीवूडला सूट दिली गेली आहे.

सभापती महोदय, रोजगारासाठी निधी दिला. परंतु दिवसेंदिवस निधी देण्याबाबत उतरती कळा येऊ लागली आहे. महिला बालकल्याण विभागाबाबत महिलांचे संरक्षण आणि आरोग्यासंबंधी खूप चर्चा झाली. सरकारने जाहीर केले की, जिजामाता महिला बाल संगोपन योजना आणि कामधेनू योजना राबविण्यात येत आहे. या दोन्ही योजना सरकारने बंद केल्या आहेत. सामाजिक आधार देणा-या योजनेबाबत महिला व बालकल्याण विभागाच्या पुस्तिकेमध्ये कुठेही तरतूद केलेली दिसून येत नाही. विशेष म्हणजे वस्तू पुरवठा, सामुहिक पुरवठा या बाबीवरील तरतूद कमी झालेली आहे.

सभापती महोदय, देवदासी पुनर्वसन योजनेवरील तरतूद शून्य दिसते आहे. देवदासी भगिनींनी आपल्याला खंत वाटावी अशा पध्दतीचा मुंडन मोर्चा काढला होता. त्यांनी अगदी टोकाला जाऊन आत्मदहनाची तयारी दाखविली आहे. त्यांच्यासाठी शासनाने कोणतीही तरतूद केलेली नाही. महिला आयोगाच्या बाबतीत तरतूद पाहिली तर अनुदान एक पट आणि वेतनासाठी केलेली तरतूद तीन पट आहे. राज्य महिला आयोगाची ही परिस्थिती आहे. महिला समुपदेशन ही केंद्राची नवीन योजना अर्थमंत्र्यांनी जाहीर केली. पुस्तिकेमध्ये स्पष्ट दिसून येते की, 2009 पासून योजना सुरु झालेली आहे. प्रत्येक वेळी योजना पूर्वी अंमलात होतीच, परंतु ती नव्याने सुरु झाली असे सांगून जनतेची दिशाभूल का केली जाते? माता भगिनींची अशा प्रकारे फसवणूक करणे हा विश्वासघात आहे, त्याबद्दल सरकारने विचार केला पाहिजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

सभापती महोदय, अर्थसंकल्पातील मुद्दा क्रमांक 84 नुसार मराठी भाषेच्या विकासासाठी तरतूद केली गेली आहे. सामान्य प्रशासन विभागाचे अंदाजपत्रक पाहिले तर सर्व रकाने रिक्त आहेत. प्रशासनाचा खर्च वाढला असला तरी संगणकावरील खर्च मात्र कमी झाला आहे. मराठी भाषेचा अभ्यास करण्याबाबत केंद्राने सातत्याने सुचविले की, युनिकोडसाठी तरतूद करावी. दूरध्वनी, मोबाईलवर युनिकोडचा वापर करता येईल या दृष्टीने पावले उचललेली नाहीत.

सभापती महोदय, निवासी आयुक्तांचे कार्यालय महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथे आहे. महाराष्ट्र सदनच्या खर्चावर निगराणी ठेवण्याचे काम सरकार करीत आहे की नाही? तेथील एकूण कामकाज पाहिले तर किरकोळ स्वरुपाचे दिसून येते. गोव्यामध्ये जाऊन पाहिले तर तेथील महाराष्ट्र भाषा परिचय केंद्र बंद पडल्यासारखी स्थिती दिसून येते. तीच परिस्थिती महाराष्ट्र सदनातील महाराष्ट्र भाषा परिचय केंद्राबाबत आहे. त्याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, अर्थसंकल्पामध्ये वेगवेगळया किल्ल्याच्या संदर्भात तरतूद केली आहे. त्याबाबत मी स्वागत करते. या किल्ल्यांचे नूतनीकरण करीत असताना ते इतिहासाला साजेसे होईल अशा पध्दतीने झाले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा मेघडंबरीसह रायगडावर बसविण्याबाबतचे काम पुरातत्व विभागाकडून काढून घेतले पाहिजे. ऑईल पेंट मारणे आणि भिंतीला पडलेली छिद्रे बुजविणे म्हणजे नूतनीकरण केले असे होता कामा नये. इतिहासाशी सुसंगत असे नूतनीकरणाचे काम असले पाहिजे.

सभापती महोदय, सरदार सरोवर प्रकल्पाबाबत मोठया प्रमाणात महाराष्ट्रात आंदोलन उभे राहिले. प्रकल्पाच्या विरोधात लोक असताना सरदार सरोवर प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन कितपत झाले या संदर्भातील आकडेवारी पाहिली तर अतिशय किरकोळ स्वरुपाची तरतूद सरदार सरोवर प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी केलेली दिसून येत आहे. आपण जपानमधील भूकंपाबाबत खूप मोठी चर्चा केली. प्रत्यक्षात आपत्ती व्यवस्थापनासाठी केंद्र सरकारकडून 75 टक्के अर्थसहाय्य केले जात असताना राज्य शासनाने अतिशय तुटपुंजी तरतूद केली आहे.

सभापती महोदय, पुणे जिल्हा आणि पुणे शहराबाबत बोलत असताना पुण्यातील वाहतूक व्यवस्थेचा माननीय अर्थमंत्र्यांना मुंबईला आल्यापासून विसर पडला की काय अशी शंका वाटते. पुण्यातील मेट्रो प्रकल्पाबाबत माननीय मुख्यमंत्र्यांसमोर त्यांनी जाहीर केले होते की, मेट्रो प्रकल्पाबाबत तरतूद केली जाईल. पुणे शहरातील वाहतूक व्यवस्थेबाबत किती तरतूद केली आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हे स्पष्ट होत नाही. आज अपघात व प्रदुषणामध्ये पुणे शहर वरच्या क्रमांकावर आहे. नंतर एस.1..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MMP/ पूर्वी श्री. भोगले........... 11:30

डॉ. नीलम गोऱ्हे .........

जिल्हा मुख्यालय आणि विभागीय आयुक्तालये यांच्या नूतनीकरणाचा उल्लेख केला आहे. आपण सर्वच पुणे येथील विभागीय आयुक्तालयात जात असतो. मंत्री महोदय सुध्दा जात असतात ते कदाचित आयुक्तांसाठी असलेले स्वच्छता गृह वापरत असतील पण सामान्य अधिकारी आणि महिला यांच्यासाठी कोणतीही व्यवस्था नाही. पुण्यातील सेंट्रल बिल्डिंग आणि विभागीय आयुक्त कार्यालयातील स्वच्छता गृह पाहिले तर आपण एक मिनिट सुध्दा तेथे थांबू शकत नाहीत, इतकी गलिच्छ आहेत. तसेच त्यांना असलेले दरवाजे खिळखिळे झालेले आहेत, खिडक्या तुटलेल्या आहेत यासंदर्भात शासनाने निश्चितपणे संवेदनशील भूमिका ठेवली पाहिजे.

महोदय, विधान भवनासाठी 5 कोटीची तरतूद केल्याचे म्हटले आहे, ही गोष्ट चांगली आहे. पण मंत्रालयापासून विधान भवनापर्यंत भुयारी मार्ग तयार केला जाणार असल्याचे आम्ही वर्तमान पत्रातून वाचले होते त्याबाबत पुढे काय झाले हे समजले नाही, त्याचाही खुलासा होणे आवश्यक आहे.

यानंतर शेवटचा मुद्दा म्हणजे भाडे तत्वावरील घरे हस्तांतरित करताना बाजार मूल्याने करार करुन पैसे द्यावयाचे आहेत असे म्हटले आहे. मला या अनुषंगाने अशी विनंती करावयाची आहे की, दहा-दहा, पंधरा-पंधरा वर्षांपासून काही लोक भाड्याच्या घरात राहतात. त्यांनी भाडे करार केलेले असतात. तसेच दर तीन वर्षांनी मालक सुध्दा घराचे भाडे वाढवितात. अशा लोकांनी आता बाजार मूल्याने का पैसे द्यायचे हे मला समजले नाही, याचाही विचार शासनाने करावा अशी मी सूचना करते.

महोदय, विधानसभेत अर्थसंकल्प मांडला जात होता तेव्हा घोषणाबाजी झाली होती. त्यामुळे माननीय अर्थमंत्री नाराज झाले होते. आता तो प्रश्न मिटला असला तरी जनतेला मागील वर्षी दिलेल्या आश्वासनांच्या अंमलबजावणीचे काय झाले याची स्पष्टता नसल्यामुळे तसेच अर्थसंकल्पाचे वर्णन करताना काही सदस्य म्हणाले की, "आवळा देऊन भोपळा काढला" पण मी तर असे म्हणेन की या अर्थसंकल्पात आवळा तर नाहीच नाही पण भोपळा सुध्दा नाही, केवळ कोरडा अर्थसंकल्प आहे, असे सांगून माझे भाषण पूर्ण करते.

--------

...2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : महोदय, गेली तीन चार वर्षे मी अर्थसंकल्पावर विचार मांडत असताना मागणी करीत आलो की, शासनाने आपला स्टाफिंग पॅटर्न बदलला पाहिजे. कारण आज राज्याच्या तिजोरीतून कर्मचाऱ्यांच्या पगारावर 53 टक्के खर्च होत आहे. त्याबाबत शासनाकडून प्रत्येक वेळेला उत्तर देताना सांगितले जाते की, स्टाफिंग पॅटर्नसंबंधीचे धोरण शासन अवलंबिणार आहे. आता संगणकीकरण मोठ्या प्रमाणात करण्यात आले पण त्याचा विचार करता प्रत्यक्षात कामाचे मोजमाप मात्र कमी झालेले आहे, यासंबंधी अर्थसंकल्पात कसलाच उल्लेख दिसत नाही. आपण वेगवेगळ्या सामाजिक संस्थांवर काम करीत आहात त्याप्रमाणे मी सुध्दा एका जिल्हा बँकेचा अध्यक्ष आहे. आमच्या बँकेत एकूण 1400 कर्मचारी कार्यरत होते. संपूर्ण बँकेत संगणकीकरण केल्यानंतर मात्र आम्ही स्टाफिंग पॅटर्नमध्ये बदल केला व संपूर्ण बँकेत आता फक्त 200 कर्मचारीच कार्यरत आहेत. गेल्या पाच वर्षांपासून आमच्या रायगड जिल्हा सहकारी बँकेत शिपाई सुध्दा नाही. नाबार्डला अभिप्रेत असलेल्या स्टाफिंग पॅटर्नपेक्षाही 40 टक्क्यांनी आम्ही बदल केला व संपूर्ण देश पातळीवर रायगड स्टाफिंग पॅटर्न म्हणून उदयास आलेला आहे. यासाठी केवळ सभागृहात टाळ्या वाजवून चालणार नाही तर प्रत्यक्षात त्याची अमलबजावणी राज्यात झाली पाहिजे, अशी माझी सूचना आहे. आपण सर्वच जण विविध कामाच्या निमित्ताने मंत्रालयात जात असतो, त्याप्रमाणे मी देखील अपॉईंटमेंट घेऊन ठराविक मंत्र्यांकडे जात असतो. तेव्हा आपण पाहतोच की मंत्रालयात कामासाठी येणारे कर्मचारी व अधिकारी सकाळी कामावर आल्यानंतर लॉबीत ब्रेक-फास्ट करीत उभे असतात.

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील ....

दुपारी 1.00 वाजता गेलो तर शिपाई सांगतो की, साहेब आता जेवणासाठी गेलेले आहेत. मंत्रालयाच्या आजूबाजूची जी हॉटेल्स आहेत ती मंत्रालयाच्या कर्मचा-यांनी दुपारी तुडुंब भरलेली असतात. त्यामुळे रोज कोणी किती काम केले याची माहिती ठेवण्याची आवश्यकता आहे व त्यासाठी पॅटर्न बदलण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे यासंदर्भात शासन विचार करणार आहे की, नाही हा खरा महत्वाचा प्रश्न आहे.

सभापती महोदय, माझ्या बँकेत जेव्हा मॅन्यूअली काम केले जात होते तेव्हा प्रत्येकाने 350 व्हाऊचर्स तयार केले पाहिजे असे बंधन घालण्यात आले होते. परंतु सरकारी कार्यालयामध्ये कोणी किती काम केले याची माहिती ठेवली जात नाही. आपण सर्वजण नोकरशाही पुढे हतबल झालेलो आहोत. नोकरशाही आपल्याला बदल करु देत नाही ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, दर वर्षाच्या अर्थसंकल्पावर मी पॅटर्नच्या संदर्भातील उल्लेख करीत असतो. परंतु शासन यासंदर्भात गांभीर्याने विचार करीत नाही त्यामुळे आता यासंदर्भात विचार करण्याची वेळ आलेली आहे व यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सदस्यांची एक समिती नेमून पॅटर्न बदलवला पाहिजे एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, मंत्रालयाला कार्पोरेटचे स्वरुप देण्यात येईल अशा घोषणा केल्या जातात परंतु प्रत्यक्षात काहीही केले जात नाही. माननीय पतंगराव कदम जर मुख्यमंत्री झाले तर ते आपल्या विद्यापीठा प्रमाणे सर्व काही करु शकतील. परंतु त्यांना मुख्यमंत्री पदाची संधीच मिळत नाही. यावर्षी तरी त्यांना मुख्यमंत्र्यांची खुर्ची मिळेल अशी अपेक्षा मी दर वर्षी व्यक्त करीत असतो परंतु तसे मात्र काही होत नाही. माझ्या सर्व शुभेच्छा दर वर्षी प्रमाणे वाया जात असतात.

सभापती महोदय, शासकीय वाहनांच्या पॅटर्नमध्ये सुध्दा बदल करण्याची आवश्यकता आहे. किती कि.मी. वाहन चालले त्या प्रमाणे त्याचे आयुष्य ठरवले गेले पाहिजे. वाहन जर एक लाख कि.मी. चालले तर त्या वाहनाचा वापर बंद केला पाहिजे. असे जर झाले नाही तर वाहनाच्या किमतीपेक्षा मेन्टेनंन्सचा खर्च जास्त होत असतो त्यामुळे एक लाख कि.मी. पेक्षा जास्त वाहन चालले असेल तर ते वापरणे बंद केले पाहिजे. शासकीय कर्मचा-याने रोज किती काम केले

..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील ....

यासाठी पॅटर्न ठरवला तसेच वाहन किती कि.मी.नंतर बाद करावयाचे याचा पॅटर्न ठरवला गेला तर शासनाचा खर्च 53 टक्क्यावरुन 40 टक्क्यापर्यंत निश्चितपणे कमी होऊ शकेल एवढे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. या ठिकाणी मी जे काही सांगत आहे ते माझ्या स्वानुभवाने सांगत आहे. शासनाचा खर्च निश्चितपणे कमी होऊ शकतो हे मी खात्रीने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, आतापर्यंत शेतक-यांना 4 टक्के व्याज दराने कर्ज उपलब्ध करुन दिले जात होते परंतु या अर्थसंकल्पात 50 हजार रुपयांपर्यंतचे कर्ज शून्य टक्के व्याज दराने व 3 लाख रुपयांपर्यंतचे कर्ज 2 टक्के व्याज दराने उपलब्ध करुन दिले जाणार आहे. परंतु मी या ठिकाणी खात्रीने सांगू इच्छितो की, शेतक-यांना या योजनेचा काही एक फायदा होणार नाही. जोपर्यंत शेतक-याने उत्पादित केलेल्या मालासाठी स्टोरेजची व्यवस्था होत नाही तोपर्यंत शेतक-यांना फायदा होणार नाही. परंतु शेतक-यांच्या कोल्ड स्टोरेजच्या संदर्भात या अर्थसंकल्पात काहीही तरतूद करण्यात आलेली नाही. आज फेडरेशनचा लाखो टन तांदूळ रस्त्यावर मोकळा पडलेला आहे. जोपर्यंत तांदुळासाठी गोडाउनची व्यवस्था होणार नाही तोपर्यंत याचा काही एक उपयोग होणार नाही. गोडाउन बांधण्यासाठी केंद्र सरकार 50 टक्के सबसिडी देत असते. परंतु केंद्र शासनाच्या सबसिडीची मर्यादा केवळ 40 लाखापर्यंतचीच आहे. 40 लाखाच्या वर सबसिडी घेतली जाऊ शकत नाही. ज्यावेळेस ही योजना तयार झाली होती त्यावेळेस 150 चौरस फूट गोडाउनचा खर्च होता आता तो 500 रुपये चौरस फूट असा झालेला असून हा रेट नाबार्डचा आहे. पायलींग असेल तर 600 रुपये व नॉन पायलींग असेल तर 500 रुपये चौरस फूट असा दर ठेवण्यात आलेला आहे. त्यामुळे उत्पादित केलेला माल साठवणूकीच्या संदर्भातील यंत्रणा शासनाने उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भात जे नॉर्म्स आहेत ते बदलण्याच्या संदर्भात केंद्र शासनाशी चर्चा करुन नॉर्म्स बदलले गेले पाहिजे अशी मी या निमित्ताने सूचना करु इच्छितो.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील ..

सभापती महोदय, हा विचार माझ्या मनामध्ये का आला ? सहकारी तत्वावर मी एक डिपार्टमेन्टल स्टोअर्स चालवतो त्या स्टोअर्सच्या माध्यमातून 80 कोटी रुपयांची उलाढाल होत असते. तूरडाळ आणि चणाडाळीचा ज्यावेळी हंगाम असतो त्यावेळी या डाळी आम्ही खरेदी केल्या आणि वाशी येथील गोडऊनमध्ये ठेवल्या होत्या. हंगामामध्ये डाळी खरेदी केल्यानंतर एका किलो मागे सात रुपयांचा फरक पडतो. यावर्षी आम्ही डाळी खरेदी करुन ठेवल्या होत्या आणि आम्हाला 25 लाख रुपयांचा नफा झालेला आहे.तेव्हा अर्थसंकल्पामध्ये याचा विचार झालेला दिसत नाही.शेतक-यांनी उत्पादन केलेल्या मालाचा फायदा त्यालासुध्दा होत नाही आणि ग्राहकालासुध्दा होत नाही. मधल्या दलालांना याचा फायदा होत असतो. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिलीपराव देशमुख यांच्याकडे मी गेलो होतो आणि त्यांनी मला शेतक-याकडून थेट डाळी खरेदी करुन दिल्या. या सर्व डाळी खरेदी करुन मी गोडाऊनमध्ये ठेवल्या त्यामुळे या व्यवहारात नफा झाला होता. शेतक-यांना 100 टक्के अनुदानावर जोपर्यंत गोडावून उपलब्ध करुन देत नाही तोपर्यंत शेत मालाला योग्य भाव मिळणार नाही ही वस्तुस्थिती आहे. तेव्हा गोडावून बांधण्याकरता या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात आलेली दिसत नाही असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, केन्द्र सरकारचा जास्तीत जास्त निधी राज्यासाठी आपण कसा आणू शकतो याचा अभ्यास या अर्थसंकल्पात केल्याचे दिसून येत नाही.जी जिल्हयाची ठिकाणे आहेत ती राष्ट्रीय महामार्गापासून चौपदरी रस्त्याने जोडण्यासाठी केन्द्र सरकार कडून 100 टक्के अनुदान देण्याची योजना आहे. अलिबाग हे रायगडचे मुख्यालय आहे परंतु चौपदरी रस्ता मात्र खोपोलीपासून सुरु होत आहे. मुंबई - गोवा हा रस्ता चौपदरी केव्हा करण्यात येणार आहे हे मला माहीत नाही. जिल्हयाचे ठिकाण राष्ट्रीय महामार्गापासून चौपदरी रस्त्याने जोडण्यासाठी प्रस्ताव केला तर त्यासाठी केन्द्र सरकारकडून 100 टक्के अनुदान दिले जाईल. परंतु राज्य सरकारकडून प्रस्ताव जात नाहीत.

सभापती महोदय, राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि सध्याचे केन्द्रीय ग्राम विकास मंत्री श्री विलासराव देशमुख आमच्या बॅकेच्या कार्यक्रमासाठी परवा अलिबागला आले होते. सुदैवाने ते तीन चार तास अगोदर आले असल्यामुळे माझ्या बरोबर चर्चा करण्यासाठी त्यांना पुरेसा वेळ मिळाला होता. त्यावेळी त्यांनी मला असे सांगितले की, केन्द्र सरकारच्या ग्रामीण

2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील ..

विकासाचा निधी सर्वात जास्त गुजराथ राज्य नेते आणि त्यानंतर बिहार राज्य नेत असते. आपल्या राज्याकडून मात्र प्रस्ताव पाठविले जात नाहीत. केन्द्र सरकाराच्या योजनासाठी 20 टक्के मॅचिग ग्रॅन्ट द्यावी लागते त्याकरता तरतूद करुन ख-या अर्थाने जास्तीत जास्त निधी आपल्या राज्याकडे कसा येईल या दृष्टीने राज्य सरकारने प्रयत्न केला पाहिजे. या अर्थसंकल्पामध्ये विविध योजनांसाठी 20 टक्के मॅचिग ग्रॅन्टची तरतूद करुन जास्तीत जास्त निधी आपल्या राज्यामध्ये कसा येईल या दृष्टीकोनातून प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. म्हणून मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, यानंतर शेवटचा एक मुद्दा मांडून मी माझे भाषण संपविणार आहे.जिल्हा नियोजन समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. कै.राजीव गांधी यांनी 73 वी घटना दुरुस्ती करुन ख-या अर्थाने विकेन्द्रीकरण करुन ग्रामीण भागामधील स्थानिक स्वराज्य संस्थाना वेगळे अधिकार दिले होते इतकेच नव्हे तर या संस्थांच्या मुदती देखील निश्चित केल्या होत्या. या मुदती वाढविण्यासंबंधी कोणतीही तरतूद ठेवलेली नाही. मुदत संपल्यानंतर ग्रामपंचायती पासून जिल्हा परिषदेपर्यत सक्तीने आता निवडणुका घ्याव्या लागतात. जिल्हा नियोजन समिती गठीत करण्यात आल्या आहेत. 73 व्या घटना दुरुस्तीमुळे जिल्हा नियोजन समिती वर कोणालाही पाठविता येते . तसेच त्या समितीवर जे निवडून येणारे सदस्य आहेत त्या सदस्यांची संख्या कमी जास्त करता येत नाही परंतु या समितीचे अधिकार डावलून राज्यामध्ये कारभार सुरु आहे. जिल्हा नियोजन समितीला राज्यामध्ये कोणताही अधिकारच ठेवलेला नाही. जिल्हयाचे पालक मंत्री आणि जिल्हाधिकारीच या समित्याचा कारभार चालवतात. सन्माननीय मंत्री डॉ पंतगराव कदम कोणत्या जिल्हयाचे पालक मंत्री आहेत हे मला माहीत नाही.

डॉ.पतंगराव कदम : मी सांगली जिल्हयाचा पालक मंत्री आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.सरफरे

श्री. जयंत प्र. पाटील : ते ज्या जिल्ह्याचे पालक मंत्री होतात त्या जिल्ह्यामध्ये कधीच गोंधळ होत नाही. तेथील जिल्हा नियोजन समितीची बैठक खेळीमेळीच्या वातावरणात पार पडते. आम्ही तुमच्याकडे कधीही पैसे मागितले नाही तरी सुध्दा लोकांनी आम्हाला 50 वर्षे निवडून दिले आहे. मला या ठिकाणी मंत्री महोदयांना असे विचारावयाचे आहे की, 5 तारखेला जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा नियोजन समितीचे अधिकार डावलून 12 कोटींची तरतूद इतरत्र फिरविली. 5 तारखेला जिल्हाधिकाऱ्यांनी या डिपार्टमेंटचे पैसे त्या डिपार्टमेंटकडे फिरवा अशा प्रकारची एक नोट टाकली. जिल्हा नियोजन समितीला विचारात न घेता पालक मंत्र्यांनी सांगितल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी व पालक मंत्र्यांनी स्वत:च्या हस्ताक्षरामध्ये जी कामे सुचविली त्या कामांना जिल्हा नियोजन समितीच्या अधिकाऱ्यांनी 7 तारखेला ताबडतोब मंजूरी देऊन टाकली. त्या संबंधीची सर्व कागदपत्रे मी या सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास तयार आहे. हे 12 कोटी रुपये कुणाचे आहेत? जिल्हा नियोजन समितीच्या ज्या कक्ष अधिकाऱ्यांनी ज्या हुशारीने हे काम केले आहे त्यांच्यावर पहिल्यांदा कारवाई झाली पाहिजे. जिल्हा नियोजन समितीला डावलून जर आपल्याला परस्पर कारभार करावयाचा असेल तर जिल्हा नियोजन समितीची गरज काय, या अर्थसंकल्पाची गरज काय?

सभापती महोदय, या अर्थसंकल्पाच्या चर्चेमध्ये माननीय विरोधी पक्षनेत्यांचे भाषण झाले पाहिजे, सरकारने त्यांचे भाषण ऐकले पाहिजे त्यानंतरच हा अर्थसंकल्प मंजूर होऊ शकतो असा संकेत आहे. म्हणूनच तुमची काल तडजोड झाली. मी गेले दोन दिवस सभागृहामध्ये नव्हतो. सभापती महोदय, स्वर्गीय राजीव गांधी यांनी प्रशासनामध्ये जे अधिकार केंद्रीत झाले होते त्याचे विक्रेद्रीकरण केले, त्यांना हे पाहून काय वाटेल? आपल्याकडे कोणतेही अधिकार नसतांना हे जिल्हाधिकारी ज्या पध्दतीने वागले, त्या संदर्भात आज सकाळी मी माननीय मुख्यमंत्र्यांना पहिलेच लेखी पत्र दिले आहे त्याचे उत्तर माननीय मुख्यमंत्री मला देतील असे वाटते . जिल्हा नियोजन समितीला असलेले अधिकार वापरण्याचा सपाटा जिल्हाधिकारी लावत असतील तर ते बरोबर होणार नाही. हे बजेट 60, 70 किंवा 100 कोटींचे असले तरी ते वापरण्याचे तुम्हाला अधिकार नाहीत. ज्या ठिकाणी तुमची थंबींग मेजॉरिटी आहे त्या ठिकाणी तुम्ही हे अधिकार वापरु शकता. नामदार श्री. हसन मुश्रीफ साहेब आपण अनेक संस्थांमध्ये काम करीत आहात, परंतु या ठिकाणी मेजॉरिटी नसतांना जर तुम्ही कोणताही प्रस्ताव बाजूला टाकण्याचे काम करणार असाल, त्यामध्ये ज्या अधिकाऱ्यांनी एक ते तीन दिवसात सर्व कामांना मंजूरी देण्याचे काम केले आहे त्याची



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/

श्री. जयंत प्र. पाटील....

देखील नोंद घेतली पाहिजे. गेल्या वर्षभरामध्ये जी कामे झालेली नाहीत त्या आदिवासींच्या कामाकरिता असलेले पैसे दुसऱ्या ठिकाणी फिरविण्याचे काम सुरु आहे.

सभापती महोदय, मी परवाच्या दिवशी भाषण करीत असतांना उल्लेख केला होता त्यावेळी माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित दादा पवार साहेब म्हणाले की, माननीय सदस्य श्री. जयंत पाटील साहेब आपल्या बाबतीत असे होणार नाही. पूर्वीचे मंत्री हे राज्याचा विचार करुन काम करीत होते. पूर्वी जिल्ह्याचा विचार होत होता, त्यानंतर आता मतदारसंघाचा विचार होतो. मी त्यांना सांगितले की, मंत्र्यांनी मतदारसंघामध्ये किती वेळा जायचे याचे काही तरी निकष ठरविले गेले पाहिजेत. त्यावेळी सन्माननीय अजितदादा पवार साहेबांनी मला सांगितले की, तुमचे म्हणणे बरोबर आहे. आजचे मंत्री महिन्यातून एक वेळ जात नाहीत तर आठवडयामधून तीन-तीन वेळा जातात. हे प्रकार सर्वत्र सुरु आहेत. माननीय मंत्री श्री. राजेंद्र दर्डा साहेब काय करतात हे मला माहीत नाही, परंतु ही पध्दत योग्य नाही. म्हणून मी मघाशी म्हटल्याप्रमाणे पूर्वीचे मंत्री हे राज्याचा विचार करीत होते. या करिता आम्ही माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम साहेबांकडे वेगळया आदर्शाने पहातो. राज्याचा सर्वांगीण विकास कसा होईल हे मंत्री महोदयांनी पहाण्याचे काम आहे. परंतु माझ्याजवळ असलेल्या यादीमध्ये पालक मंत्र्यांच्या मतदार संघांमधील 12 कोटींची सर्व कामे मंजूर करण्यात आली आहेत.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रामनाथ मोते)**

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

हे थांबले पाहिजे, ही लोकशाही नाही. या पध्दतीने कामे करणे बरोबर होणार नाही. सभापती महोदय, आम्ही याठिकाणी कशासाठी बोलावयाचे? असा प्रश्न आहे. याठिकाणी ज्या तरतूदी करण्यात आल्या आहेत, त्यामध्ये आम्हाला अधिकार नाही. आम्ही सुध्दा शासनाचे पार्ट ॲण्ड पार्शल आहोत. आम्ही विरोधी पक्षामध्ये असलो तरी आम्हाला सुध्दा काही अधिकार आहेत आणि ते जर डावलले जाणार असतील तर मग मी या निर्णयाच्या विरोधात कोर्टामध्ये जाण्याचा निर्णय घेतलेला आहे. मी माननीय उप मुख्यमंत्री काय उत्तर देतात याची वाट पहात आहे आणि त्यानुसार कोर्टामध्ये जाऊन याबाबत दाद मागणार आहे. जिल्हा नियोजन समितीला काय अधिकार आहे आणि माननीय पालक मंत्री तसेच कलेक्टर यांना काय अधिकार आहे? पूर्वी एक्झीक्युटीव्ह इंजिनिअरला 2 टक्के दिल्यानंतर कामे मंजूर होत होती. पण आता ट्रेझरी ऑफीसरला देखील पैसे द्यावे लागतात. आता प्लॅनिंग ऑफीसरच्या बाबतीत नव्याने पध्दत सुरु झालेली आहे. मी माननीय मंत्री महोदयांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो. मला प्लॅनिंग ऑफीसरने असे सांगितले की, हे काम आमदार फंडामध्ये बसत नाही. मग मी संबंधितांना फोन करुन सांगितले की, आमदार फंडामध्ये कोणती कामे बसतात आणि कोणती कामे बसत नाहीत हे आमदार म्हणून मला चांगले माहिती आहे.मी कोणतेही बेकायदेशीर काम करावयास सांगणार नाही. परंतु संबंधितांना दोन टक्के दिले, तीन टक्के दिल्यानंतर सगळी कामे बरोबर बसतात. सभापती महोदय, मग मंत्रालया मध्ये 5 टक्के, 3 टक्के, 2 टक्के असेच 20 टक्के जातात, अगदी आमदार फंडातील सुध्दा. तुमच्या-माझ्यासारख्या आमदारांकडील नाही. माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम येथे आहेत. सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली वगैरे गरीब आमदार आहेत.सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांना माहिती आहे की, कुठे किती आणि काय द्यावयाचे आणि कसे द्यावयाचे. मला त्यांचे दु:ख माहिती आहे.

ॲड.उषाताई दराडे : सभापती महोदय, हा उल्लेख रेकॉर्डवरुन काढून टाकावा.

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते)** : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी आपले भाषण संपवावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझे म्हणणे ऐकून घ्यावे. मी शेवटचाच मुद्दा मांडत आहे.मी सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे यांना सांगू इच्छितो की,सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण हे माझे चांगले मित्र आहेत. आमदार फंडाच्या बाबतीत काय दु:ख आहे याबाबत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ते बोलले आहेत. त्यांनी माझ्या भाषणाला, विचारांना सपोर्ट केला म्हणून मी बोलत आहे.माझ्याकडे बरेच मुद्दे आहेत.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण संपवावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी आता जास्त बोलत नाही. मी शेवटच्या मुद्यावरच बोलत आहे. कारण तीन तासामध्ये आपल्याला ही चर्चा संपवावयाची आहे. सभापती महोदयांनी मला येथे बोलण्याची संधी दिलेली आहे. माननीय मंत्री महोदयांनी याबाबत आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये काहीतरी उल्लेख करावयास पाहिजे. हा न्याय आहे. लोकशाहीमध्ये इकडे-तिकडे होत असते याबद्दल प्रश्न नाही. परंतु निश्चितपणे याबाबतीत ठोस निर्णय घेऊन मी जे चार मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्यावर शासन विचार करेल अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

----

. . . .डब्ल्यू-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

30-03-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) W-3

APR/ MMP/ 11:50

**पृ.शी.**: व्याघ्र प्रगणना 2010

**मु.शी.**: व्याघ्र प्रगणना 2010 बाबत माननीय वन मंत्र्यांचे निवेदन

डॉ.पतंगराव कदम (वन मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वन मंत्र्यांचे निवेदन

डॉ.पतंगराव कदम (वन मंत्री) : सभापती महोदय, भारतीय वन्यजीव संस्था यांनी देशातील वाघांच्या प्रगणनेच्या 1 ला पॅरा. याबाबत मी सर्व डिटेल माहिती देत नाही. पण देशामध्ये जी परिस्थिती आहे त्यामध्ये1906 साली वाघांची संख्या 1411 होती, आता ते 1657 झालेले आहेत. 2010 साली 1706 होती ती आता 1875झालेली आहे. एकंदर देशातील जी निरनिराळी राज्ये आहेत त्यामध्ये उत्तराखंड, महाराष्ट्र, आसाम आणि तामिळनाडू, कर्नाटक याठिकाणी वाघांच्या संख्येत वाढ झालेली आहे. तसेच बिहार, उत्तर प्रदेश, छत्तीसगढ, झारखंड, राजस्थान, ओरिसा, मिझोराम, उत्तर-पश्चिम बंगाल व केरळ येथे ही संख्या स्थिर असून मध्य प्रदेश आणि आंध्रप्रदेश

मध्ये कमी आहे. आता महाराष्ट्रामध्ये वाढ झालेली आहे. त्यानुसार ताडोबा-अंधारी-चंद्रपूर येथे 53 संख्या होती, ती 69 झालेली आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी नव्या सुधारित पध्दतीने प्रगणना करुन वाघांची आकडेवारी दिलेली आहे. ही आकडेवारी कशा पध्दतीने काढण्यात आलेली आहे? पगमार्कद्वारे मोजणी करुन,फिजिकली मोजणी करुन का कॉलर लावून मोजणी करण्यात आलेली आहे हे सांगितले पाहिजे.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, ही मोजणी राज्य शासनाने केली नसून, केंद्र सरकारने शास्त्रशुध्द पध्दतीने मोजणी केलेली आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, वाघांची मोजणी कशी केली ते याठिकाणी सांगितले पाहिजे.

( अनेक सदस्य एकाच वेळी बोलत असतात )

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, भारतीय वन्यजीव संस्था यांनी देशातील वाघांच्या प्रगणनेत नुकत्याच करुन घेतलेल्या चिकित्सक अभ्यासाच्या अहवालानुसार वाघांची एकूण संख्या केंद्रीय वन मंत्रालयांकडून जाहीर करण्यात आलेली आहे. पगमार्क पध्दतीने, नकाशे लावून, कॅमेरे लावून तसेच इतर अनेक प्रकारे मोजणी करुन अहवाल दिलेला आहे.

( अनेक सदस्य एकाच वेळी बोलत असतात )

**तालिका सभापती** ( श्री. रामनाथ मोते ) : सन्माननीय सदस्यांना निवेदनावर चर्चा करता येणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी अर्थसंकल्पावरील भाषणास सुरुवात करावी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, वाघांचा विषय हा महत्वाचा आणि राष्ट्रीय विषय आहे. असे असताना या ठिकाणी यासंबंधीची योग्य माहिती देण्यात येत नाही. तीन-चार दिवसांपूर्वी उपस्थित करण्यात आलेला हा विषय आहे. ही सगळी माहिती केंद्र शासनाची आहे, अमुक आहे, तमुक आहे, असे सांगण्यात येत आहे. सन्मानीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी ताडोबा अभयारण्याच्या बाबतीत केलेले भाषण अत्यंत गंभीर स्वरुपाचे होते. मला या ठिकाणी एवढेच सांगावयाचे आहे की, मंत्री महोदय या सदनात जेव्हा निवेदन करतात तेव्हा त्यांनी योग्य माहिती दिली पाहजे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, भारतीय वन्यजीव संस्था यांनी आयोजित केलेल्या प्रशिक्षणाच्या आधारे बीट स्तरावर ट्रांझॅक्ट टाकून क्षेत्रीय माहिती संकलीत आणि संगणकीकृत केलेली आहे. उपग्रहाद्वारे प्राप्त माहितीच्या आधारे वाघाच्या अधिवासाचे विश्लेषण केलेले आहे. काही निवडक क्षेत्रात कॅमेरा ट्रॅप स्थापित करुन वाघांचे फोटो घेणे ही कार्यवाही वन्यजीव संस्थानच्या अधिकाऱ्यांमार्फत करण्यात आली होती. त्याचप्रमाणे जवळच्या क्षेत्रामध्ये वाघाच्या अधिवासाबाबतची माहिती अंदाजीत करण्यात आली होती. मात्र हे अंदाज करताना वाघांच्या खुणा ( Tiger Signs ), भक्ष संख्या, अधिवासाची स्थिती आणि मानवी हस्तक्षेप ह्या बाबी सुध्दा विचारात घेण्यात आल्या होत्या.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, वाघांच्या संदर्भात या सभागृहात निवेदन करण्याचे काय प्रयोजन आहे, हे आम्हाला समजले पाहिजे. माननीय मंत्री महोदय उत्तराखंड राज्यात शून्य टक्के वाढ आहे आणि आमच्याकडे 66 टक्के वाढ आहे असे सांगत आहेत. यामध्ये "आयजीच्या जीवावर बायजी उदार आणि सासूच्या जीवावर जावई सुभेदार" या पध्दतीने त्यांनी सांगितले. म्हणजे त्यांनी मोजले, त्यांनी सांगितले की, या ठिकाणी वाघांची 66 टक्के वाढ आहे. म्हणजे मजा वाघांची आणि माननीय मंत्री महोदय 66 टक्क्यांची वाढ आहे असे सांगत आहेत. ते आम्हाला काही कळले नाही.

डॉ. पतंगराव कदम : केंद्राने देशाची परिस्थिती आणि राज्याची परिस्थिती याची तुलना करुन हे सांगितलेले आहे.

श्री. दिवाकर रावते : आपल्याकडे वाघांची 66 टक्के वाढ होण्यासाठी महाराष्ट्र शासनाने काय प्रयत्न केले ?

**उप सभापती** : माननीय मंत्री महोदय, डॉ. पतंगराव कदम यांनी एक छोटे उत्तर देऊन टाकावे की, खरे वाघ या ठिकाणी बसलेले आहेत त्यामुळे मी या ठिकाणी निवेदन केले.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KTG/

**पृ. शी.** : अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**मु. शी.** : सन 2011-2012 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

( चर्चा पुढे चालू )

**उप सभापती** : अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत आता सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली भाषण करतील.

श्री. राजन तेली ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2011-2012 च्या अर्थसंकल्पावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. 2011 हे वर्ष राज्य विधिमंडळाचे अमृत महोत्सवी वर्ष असून या निमित्ताने पहिल्यांदा 58 कोटी 21 लाख रुपयांच्या शिल्लकीचा अर्थसंकल्प मांडल्याबद्दल मी माननीय वित्त मंत्री श्री. अजित पवार साहेब तसेच माननीय राज्यमंत्री श्री. राजेंद्र मुळक साहेब यांना मी मनापासून धन्यवाद देतो.

सभापती महोदय, राज्य अर्थसंकल्पाचे एकूण आकारमान 1 लाख 54 हजार 124 कोटी रुपये आहे. राज्य योजनेचे आकारमान 41 हजार 500 कोटी रुपये आहे. आज महसुली जमेपैकी 64.39 टक्के खर्च हा केवळ वेतन, निवृत्तिवेतन आणि व्याज या सारख्या विकासेतर बाबींवर होत आहे. मी मुद्दाम सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांना धन्यवाद देतो. त्यांनी या ठिकाणी चांगल्या विषयावर मांडणी केली की, आपण वेतनावर खर्च केलेले पैसे, निवृत्तिवेतनावर खर्च केलेले पैसे याचा कधी तरी आपण आढावा घेतला पाहिजे. बरीच कार्यालये अशी आहेत की, त्यांना काहीही काम नाही तसेच त्यांना बजेट सुध्दा नसते. उदा. मेरीटाईम बोर्ड, खारलँड, पशुसंवर्धन, दुग्धविकास या खात्यांना ग्रामीण भागात ज्या प्रमाणात काम द्यावयास पाहिजे, जे बजेट द्यावयास पाहिजे त्या प्रमाणात त्यांना कोणत्याही प्रकारचे बजेट नसते. म्हणून माझी अशी विनंती आहे की, त्यांचा सर्व्हे करुन अशी जी खाती आहेत ती एकत्र करता येतील काय ते पहावे. जिल्हा परिषदेचा कृषी विभाग आहे, स्टेटचा कृषी विभाग आहे. त्या ठिकाणी जेवढे कर्मचारी कमी करता येतील तेवढे कमी करुन त्यांना चांगल्या प्रकारचे काम देऊन या सगळ्या खर्चात कशा प्रकारे कपात करता येईल या संदर्भात शासनाने प्रयत्न करावा अशी मी या निमित्ताने विनंती करतो. आज कृषी पणन विकास कार्यक्रमाच्या अंतर्गत 33 जिल्ह्यांमध्ये जागतिक बँक सहाय्यित महाराष्ट्र स्पर्धाक्षम

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KTG

श्री. राजन तेली ....

कृषी विकास प्रकल्प राबविण्यात येत आहे. त्या करिता जवळजवळ 45 कोटी रुपये दिलेले आहेत. हा प्रकल्प चांगला आहे पण यासाठी दिलेला निधी फारच कमी आहे. आज कोकणामध्ये फळफळावळांवर प्रोसेसिंग करण्यासाठी खऱ्या अर्थाने चांगल्या प्रकारे पैसे दिले तर राज्याच्या तिजोरीत भर पडू शकते एवढी ताकद कोकणातील फळफळावळांमध्ये आहे. परंतु दुर्दैवाने या अर्थसंकल्पात त्या बाबतीत कोठेही उल्लेख दिसत नाही. राज्यासाठी या ठिकाणी जी तरतूद केलेली आहे ती फारच कमी आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये काढणी पश्चात व्यवस्थापन यामध्ये राज्य शासनाने वाशी, नवी मुंबई येथे 18 कोटी रुपये किंमतीच्या आंबा वि-किरण प्रकल्पास तसेच रुपये 3 कोटी 50 लक्ष किमतीच्या लघू काजू प्रक्रिया व साठवणूक प्रकल्पास मान्यता दिलेली आहे. मी शासनाला मनापासून धन्यवाद देतो. पण त्याच बरोबर कोकणासाठी वेगळे धोरण ठरवून प्रोसेसिंगसाठी त्या ठिकाणी वेगळे काही तरी करावे आणि खऱ्या अर्थाने कोकणातील सर्वसामान्य शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर वाढेल या दृष्टीने शासनाने प्रयत्न करावा अशी मी विनंती करतो. तांदूळ, गहू, डाळी, पीठ, हळद, घरगुती गॅस, मनुका आणि विशेषकरुन काजू अशा ज्या जीवनावश्यक वस्तू आहेत त्या करमुक्त केलेल्या आहेत त्या बद्दल मी शासनाला मनापासून धन्यवाद देतो. आज 50 हजार रुपयांपर्यंतचे कर्ज शून्य टक्के व्याजाने आणि 3 लाख रुपयांपर्यंतचे कर्ज 2 टक्के दराने देण्याबाबत उल्लेख केलेला आहे. माझी शासनाला विनंती आहे की, मच्छीमारी व्यवसायाला शेती म्हणून संबोधण्यात यावे. त्यांच्याकडे आपण दुर्लक्ष करतो. राज्यातून आपण जवळजवळ 2 हजार कोटीची निर्यात करतो. परंतु गेल्या पंधरा वर्षात त्यामध्ये वाढ करण्याच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचे प्रयत्न केलेले नाहीत. मच्छिमारांना कोणत्याही प्रकारचा दिलासा दिलेला नाही. त्यांना मुबलक केरोसीन मिळावे, गॅस्केट मिळावेत, जाळी मिळावी, नवीन तंत्रज्ञान मिळावे आणि विशेष करुन कोल्ड स्टोअरेजची सोय मिळावी या बाबत त्यांची मागणी असते. परंतु त्या ठिकाणी मत्स्य विकास झाला पाहिजे या दृष्टीकोनातून शासनाकडून तरतूद होताना दिसत नाही. त्या संदर्भात तरतूद सुध्दा केलेली नाही. शासनाने फक्त 45 कोटी रुपये ठेवलेले आहेत. केंद्र शासनाच्या योजनेत मॅचिंग ग्रँट देण्यासाठी तरतूद केलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ पूर्वी श्री.बरवड 12:05

श्री.राजन तेली....

गेली 5 वर्षे सातत्याने मी हा मुद्दा मांडत आहे. 5 वर्षात विशेषत: मच्छीमार लोकांचे जे प्रकल्प होते ते राज्याच्या तत्कालीन अर्थ व नियोजन सचिवांनी अडवून ठेवले होते. माझी शासनाला अशी विनंती आहे की, मच्छीमार लोकांचे प्रकल्प मंजूर करण्याचे अधिकार पूर्वीप्रमाणे आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांना द्यावेत. तसेच मच्छीमारांना चांगले पॅकज देऊन दिलासा कसा देता येईल यासाठी शासनाने पावले टाकावीत अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, रत्नागिरी येथील गद्रे आहेत. ते मासेमारीतून 350-400 कोटींचा टर्नओव्हर करतात. रत्नागिरी येथून माशांची निर्यात करतात. गद्रे यांना गुजरात सरकारने जागा व पाणी देण्याचे कबूल केले आहे, ते सरकार जर छोट्या छोट्या गोष्टी पहात आहे. गद्रे यांना बोलवून तेथे प्रकल्प राबविण्यासाठी आकर्षित करीत आहे. मग राज्यातील 720 कि.मी.च्या परिसरातील मच्छीमारांना न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून, मच्छीमारी विकसित करण्याच्या दृष्टीकोनातून शासन कोणते प्रयत्न करीत आहे, असा प्रश्न मी शासनाला विचारु इच्छितो.

सभापती महोदय, पाटबंधारे विकास क्षेत्रातील प्रगतीबाबत बोलावयाचे झाल्यास सन 2011-12 या वर्षाकरिता जलसंपदा विभागासाठी 7 हजार 393 कोटीपैकी 6 हजार 300 कोटी इतकी तरतूद केली आहे. 2011-12 मध्ये 300 पेक्षा जास्त प्रकल्प पूर्ण करुन 1 लक्ष 75 हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली येईल असे सांगितलेले आहे. सन 2011-12 मध्ये 150 प्रकल्प करुन 2 लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली आणण्याचे प्रयोजन करण्यात आले आहे. त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो.

सभापती महोदय, नवव्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरपर्यंत राज्याचे एकूण 23 हजार 622 कोटी रुपये सिंचनावर खर्च झाले तरी राज्याची सिंचन क्षमता 17.5 ते 19 टक्क्यापर्यंतच गेली आहे. देश पातळीवर हे प्रमाण 42 टक्के आहे. पंजाब राज्यात 67 टक्के, हरियाणात 85 टक्के, उत्तर प्रदेशमध्ये 40 टक्के, कर्नाटकमध्ये 32 टक्के, राजस्थानमध्ये 35 टक्के आणि गुजरात राज्यात 45 टक्के इतके सिंचनाचे प्रमाण आहे. कोकणातील प्रकल्प 20-22 वर्षांपासून प्रलंबित आहेत. 90 प्रकल्पांपैकी 77 प्रकल्प अपूर्ण आहेत. या प्रकल्पांची सुरुवातीची एकूण किंमत 957

2....

श्री.राजन तेली....

कोटी 44 लाख इतकी होती. आजपर्यंत या प्रकल्पांवर 4 हजार 209 कोटी 78 लाख रुपये खर्च इ ाालेले आहेत. हे प्रकल्प पूर्ण करावयाचे असतील तर त्यासाठी 6 हजार 12 कोटी 76 लाख इतक्या रकमेची आवश्यकता आहे. सध्या या प्रकल्पांची एकूण किंमत 10 हजार 222 कोटी 54 लाख इ ाालेली आहे. म्हणजे मूळ किंमतीच्या 967 टक्क्यांनी वाढ झालेली आहे. या बाबत शासन विचार करणार आहे का असा माझा प्रश्न आहे. कोकणातील या प्रकल्पांना शासनाने जास्तीत जास्त मदत करावी अशा प्रकारची विनंती मी या माध्यमातून करतो.

सभापती महोदय, कोकणातील सगळयात महत्वाचा विषय पर्यटन हा आहे. 20 जानेवारी, 1975 रोजी पर्यटन महामंडळाची स्थापना झाली होती. हे महामंडळ स्थापन करुन 36 वर्षे झाली आहेत. या कालावधीत या महामंडळाचा शासनाने कधी आढावा घेतला आहे काय ? पर्यटन महामंडळाच्या प्रस्तावनेत असे नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र पर्यटन विकासाला भरपूर वाव असून यामध्ये 720 कि.मी.इतका स्वच्छ समुद्र किनारा, 350 गड किल्ले, 5 राष्ट्रीय उद्याने, 35 अभयारण्ये, 4 जागतिक वारसा लाभलेली स्थळे, अजंठा-वेरुळ-घारापुरी लेण्या, अष्टविनायक, 5 ज्योतिर्लिंगे, शिर्डी व पंढरपूर देवस्थान अशी पर्यटन स्थळे आहेत. पण या पर्यटन स्थळांसाठी या महामंडळाने काहीही केले नाही असा माझा आरोप आहे.

दिनांक 29 ऑगस्ट, 2009 रोजी कोकण विकास कालबध्द कार्यक्रम जाहीर झाला. त्यावेळी मंत्रिमंडळाने कोकणातील पर्यटन विकासासाठी केरळच्या धर्तीवर सीआरझेडमधून विशेष सवलती प्राप्त करण्यासाठी शासन प्रयत्न करील. सिंधुदुर्ग पर्यटन विकास महामंडळ पुनर्जीवित केले जाईल. सागरी क्षेत्र पर्यटन विकास महामंडळ ही महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या अधिनस्त उप कंपनी स्थापन करुन त्यामार्फत कोकणातील पर्यटन विकासाला चालना देण्यात येईल. कोकण विभागातील पर्यटन विकास कृती आराखडा तयार करुन कोकण विभागातील पर्यटकांना सुविधा उपलब्ध करुन दिली जाईल, प्रत्येक जिल्ह्यातील महत्वाची समुद्र स्थळे, धार्मिक स्थळे व पर्यटन स्थळांना सुविधा देण्यात येईल असे त्यात अंतर्भूत होते. दुर्दैवाने यातील काहीही झालेले नाही असे मला या ठिकाणी नमूद करावेसे वाटते.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली....

सभापती महोदय, पर्यटन विभागासाठी 88 कोटी रुपये दिले होते. त्यापैकी 60 कोटी रुपये एकट्या नाशिक जिल्ह्यासाठी दिले आहेत, त्या बाबतची ऑर्डर माझ्याकडे आहे. नाशिक जिल्ह्याला देऊ नका असे माझे म्हणणे नाही. पण संपूर्ण देशामध्ये सिंधुदुर्ग हा एकमेव पर्यटन जिल्हा म्हणून घोषित झालेला आहे. या 88 कोटींपैकी या जिल्ह्यातील धामापूरच्या पर्यटन स्थळासाठी 10 लाख रुपये दिलेले आहेत. हा अपवाद वगळता एकही पैसा या जिल्ह्यातील पर्यटन विकासाच्या कामांसाठी दिलेला नाही. म्हणून शासन कोकणाला खऱ्या अर्थाने न्याय देणार आहे का असा मी प्रश्न विचारतो.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 12:10

श्री. राजन तेली...

माझी या निमित्ताने शासनाला विनंती आहे की, या सर्व विभागांना जास्तीत जास्त निधी देऊन कोकणाला ख-या अर्थाने न्याय द्यावा. वेळ कमी असल्यामुळे मी शासनाकडे दोन-तीन मागण्या करणार आहे. एक म्हणजे कोकणासाठी कोकण विकास महामंडळाची स्थापना करावी. मी माननीय मुख्यमंत्र्यांना मनापासून धन्यवाद देऊ इच्छितो, कारण ते जेव्हा आमच्या कोकणच्या दौ-यावर आले होते त्यावेळी त्यांनी आपल्या भाषणामध्ये या गोष्टीचा आवर्जून उल्लेख केला होता. त्यांनी सांगितले होते की कोकण विकास महामंडळ होणे गरजेचे आहे. कोकणावर अन्याय होत असल्याचे त्यांनी कबूल केलेले आहे. कोकण विकास महामंडळ होण्याच्या दृष्टीने माननीय मुख्यमंत्र्यांनी प्रयत्न सुरु केलेले आहेत. त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. या कोकण विकास महामंडळाची स्थापना लवकरात लवकर करावी अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, माझी दुसरी सूचना अशी आहे की, कोकणामध्ये पर्यटन आणि फळप्रक्रिया उद्योगाला चालना मिळण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये दरवर्षी 500 कोटीची तरतूद करावी. वाटल्यास ही रक्कम नंतर शासनाने परत घ्यावी. कोकणासाठी दरवर्षी 500 कोटीची तरतूद केली तर त्यामुळे कोकणाचा विकास होईलच परंतु राज्याची आर्थिक स्थिती देखील बळकट होण्यास मदत होईल. तेव्हा कोकणासाठी दरवर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये शासनाने 500 कोटीची तरतूद करावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, माझी आणखी एक सूचना अशी आहे की, कोकणाच्या संदर्भात एक विभागनिहाय अभ्यास गट तयार करावा. अधिकारी जी काही माहिती देतात तीच राज्य शासना मार्फत पुढे येते. विभागनिहाय कोणकोणत्या अडचणी आहेत, कोणकोणत्या उद्योगांना चालना मिळू शकते, कोणत्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याची आवश्यकता आहे इत्यादी गोष्टींचा अभ्यास होणे आवश्यक आहे. कोकणामध्ये फळ प्रक्रिया उद्योगाला, मत्स्य व्यवसायाला, पर्यटन व्यवसायाला चालना मिळाली तर त्यामुळे राज्याची आर्थिक परिस्थिती बळकट होण्यास मदत होईल. सभापती महोदय, मला हेही येथे आवर्जून नमूद करावयाचे आहे की, कोकणाचा विभागनिहाय अभ्यास करुन निधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. हा निधी उपलब्ध करुन दिला नाही तर ज्याप्रमाणे वेगळया विदर्भाची मागणी करण्यात आली होती तशा प्रकारची वेगळया कोकणाची मागणी पुढे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली....

आली तर त्याबाबतीत कोणाला नवल वाटायला नको. या विधानपरिषदेमध्ये कोकणातील लोकप्रतिनिधींची संख्या 75 आहे. तेव्हा कोकणाला ख-या अर्थाने न्याय देण्याचा प्रयत्न हे शासन करील अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

---

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 12:10

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेसाठी तीन दिवस द्यावेत म्हणून मी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला होता. आज विनियोजन विधेयक येणार असल्यामुळे अर्थसंकल्पावरील चर्चा आज संपणार आहे. कामकाज सल्लागार समितीमध्ये आम्ही अर्थसंकल्पावर तीन दिवस चर्चा घ्यावी अशी मागणी केली होती. नंतर मी पीठासीन अधिका-यांना 31 मार्च पर्यन्त ही चर्चा घेण्याची विनंती केली होती. त्यावेळी विनियोजन विधेयक 31 मार्च पूर्वी म्हणजे 31 तारखेच्या आधी यावे लागते असे सांगण्यात आले होते. विनियोजन विधेयक जर उद्या येणार असेल तर ही चर्चा उद्या देखील ठेवावी जेणेकरुन आणखीन काही सन्माननीय सदस्यांना चर्चेमध्ये भाग घेता येऊ शकेल.

**उप सभापती** : या बाबतीत काल संध्याकाळी सांगितले होते...

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्यांना जे अधिकार मिळालेले आहेत त्यानुसार उद्यापर्यन्त ही चर्चा होऊ द्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. राजेंद्र मुळक : अर्थसंकल्पावरील चर्चेला मी उद्या गुरुवार, दिनांक 31 मार्च रोजी उत्तर देणार आहे. तेव्हा काही सन्माननीय सदस्य उद्या देखील बोलू शकतील.

**उप सभापती** : ठीक आहे.

....नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले ) : सन्माननीय उप सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील चचेत सहभागी होताना वेळेचे बंधन लक्षात घेऊन कमीत कमी वेळेत मला जे मुद्दे मांडता येणे शक्य आहे, ते मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे. मला सर्वप्रथम सांगितले पाहिजे की, सुवर्ण महोत्सवाची सांगता होत असताना आणि एका नव्या पर्वाची सुरुवात होत असताना एका अतिशय महत्वाच्या टप्प्यावर हा अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे. या अर्थसंकल्पातील तरतुदींचा नीटपणे अभ्यास केला तर एवढेच म्हणावेसे वाटते् की, या अर्थसंकल्पाला इतिहासाची जाण आहे, वास्तवतेचे भान आहे आणि भविष्याची शान आहे.

सभापती महोदय, माननीय अर्थ मंत्री अथवा माननीय अर्थ राज्यमंत्री या सभागृहांमध्ये अर्थसंकल्प सादर करीत असतात. घटनेचे जसे प्रिॲम्बल असते, तसे एकूणच या अर्थसंकल्पाची दिशा काय असणार आहे याचा पहिल्या वाक्यातच उपयोग केलेला असतो. राज्यात कृषी व उद्योग क्षेत्राची उन्नती व्हावी व त्या माध्यमातून तरुणांना रोजगार उपलब्ध व्हावा, तसेच राज्याच्या सर्व भागांचा व समाजातील सर्व घटकांचा, विशेषत: दुर्बल घटकांच्या विकासात वाटा असावा हा दृष्टीकोन हा अर्थसंकल्प तयार करताना समोर ठेवला आहे असे आपणास निश्चितपणे दिसून येत आहे. या अर्थसंकल्पाचे वैशिष्ट म्हणजे कृषी क्षेत्राशी संबंधीत अशा सर्व विषयांसाठी योग्य अशा तरतुदी या अर्थसंकल्पात मांडण्यात आलेल्या आहेत. एवढया तरतुदी असून सुध्दा मला वाटते की, आता राज्याने एक गंभीर विचार करण्याची वेळ आलेली आहे. एकूण शेतीखाली येऊ शकणारे क्षेत्र किती, राज्याची सिंचन क्षमता वाढण्याची कमाल मर्यादा किती आणि एकूण या शेतीवर अवलंबून असलेले शेतकरी व त्यांच्या कुटुंबीयांची संख्या किती ? असा एकात्मिक विचार केल्यानंतर जी गोष्ट आपणास वारंवार जाणवते. पहिल्या पिढी कडून दुसऱ्या पिढीकडे जेव्हा वाटचाल सुरु होते. तेव्हा घरामध्ये दोन भावंड असतील जमिनीचे दोन वाटे होतात. त्या जमिनीचे पुढे चार वाटे होतात, त्यानंतर आठ वाटे होतात. पर्यायाने प्रत्येकाची जमीन ही कमी कमी होत जाते. या गोष्टी लक्षात घेतल्यानंतर आपण कितीही प्रामाणिकपणे प्रयत्न केले तरी शेतीवर अवलंबून राहणाऱ्या लोकांची आर्थिक उन्नती करावयाची असेल तर केवळ शेती हा त्या कुटुंबासाठीचा ध्यास यापुढच्या काळात ठेवून चालणार नाही. यासंदर्भात स्पष्टपणे भूमिका घेण्याची वेळ आता आलेली आहे असे मला वाटते. यावर एकच अतिशय चांगला उपाय आहे. शेतीला जोडधंदा देण्याची आवश्यकता

2...

श्री. हेमंत टकले....

आहे. मला वाटते या अर्थसंकल्पामध्ये कुक्कुटपालन या जोडधंद्यांचा उल्लेख निश्चितपणे झालेला आहे. शेतकऱ्यांना कुक्कुटपालन या जोडधंद्यांवर अवलंबून रहावयास सांगितले तर तो जोडधंदा त्यांना पुरेसा होईल असे मला वाटत नाही. म्हणून शेतकऱ्यांना शेती बरोबर अधिकची जोड कशी मिळेल, अशा जोडधंद्यांची आखणी करुन, त्यांना त्या जोडधंद्यापासून अधिक मदत मिळू शकते काय, त्यांची आर्थिक उन्नती होऊ शकते काय, या बाबतचा विचार करण्याची वेळ निश्चितपणे येऊन ठेपलेली आहे.

या अर्थसंकल्पात शासनाने अनेक योजना मांडलेल्या आहेत. यात कृषी विभागास केंद्रस्थानी मानलेले आहे. या सगळया योजनांची अंमलबजावणी अतिशय गतीने होणार आहे, यात कृषी विभागाचे काय योगदान असणार आहे ? राज्यातील शेतकऱ्यांना योग्य प्रकारचे मार्गदर्शन, शेतकऱ्यांसाठी कार्यशाळा अशा पध्दतीची जबाबदारी जर राज्यातील कृषी विद्यापीठांवर दिली...

यानंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले......

आणि जे पर्यावरण बदल होत आहेत त्या अनुषंगाने शेतीमध्ये करावे लागणारे बदल लक्षात घेऊन त्यांची योग्य प्रकारे मांडणी करता आली तर त्या संशोधनाचा उपयोग त्या त्या विभागातील कृषी विद्यापीठांमार्फत शेतकऱ्यांना होऊ शकेल. यासाठी काही पदांची निर्मिती करुन या कृषी विद्यापीठांच्या माध्यमातून संशोधनासाठी निधी उपलब्ध करुन देता येईल का? याचाही विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, मी नुकताच माझ्या गावी कुसुमाग्रजांच्या नावाने एका कवीच्या सत्कार समारंभाला जाऊन आलो. हे कवी उज्जैन येथील आहेत. त्यांनी आजच्या वास्तवाबद्दल असे सांगितले की, आज सर्वसाधारण माणसांना पाणी विकत घेऊन पिण्याची सवय झाली आहे. भविष्यात अशी वेळ येऊ शकते की, आपल्याला हवा देखील विकत घेऊन श्वास घ्यावा लागेल. आपण जर पर्यावरणाकडे लक्ष देणार असू आणि संतुलित पर्यावरणाचा कार्यक्रम योग्य प्रकारे राबविणार असू तर आपल्याला स्वच्छ पाणी व शुध्द हवा उपलब्ध होईल. राज्य शासनाने 'पर्यावरण संतुलित ग्रामविकास' ही एक महत्वाकांक्षी योजना राबविण्यासाठी अर्थसंकल्पात 200 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ज्याप्रमाणे ग्रामविकास क्षेत्राकरिता तरतूद केली आहे त्याच पध्दतीने खेडेगाव म्हणता येणार नाही, परंतु निमशहरी स्तर अशी ज्यांची मांडणी झाली आहे त्या शहरांसाठी 'पर्यावरण संतुलित नगरविकास' अशी योजना राबविता येईल काय? याचा शासनाने विचार करावा.

सभापती महोदय, अर्थसंकल्पाबद्दल दोन्ही सदनामध्ये, सदनाबाहेर, वृत्तपत्रांमध्ये आणि वाहिन्यांवर बरीच चर्चा झाली आहे. शासनकर्ते संपूर्ण राज्याचा विचार करीत असतात, त्यामुळेच एका-एका योजनेसाठी भरीव तरतूद केल्याचे आपल्याला दिसून येते. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान योजनेसाठी 213 कोटी रुपये तरतूद केली आहे. पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर, मराठवाड्यातील जालना, विदर्भातील अमरावती जिल्हयांसाठी विशेष 100 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या तरतुदींचा नीट अभ्यास केला तर आपल्या असे लक्षात येईल की, प्रत्येक विभागामध्ये राज्य शासनाच्या या योजना पोहोचतील यादृष्टीने या योजनांची आखणी करण्यात आली आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले......

सभापती महोदय, ई-जिल्हा प्रकल्प राबविण्याचा शासनाने निर्धार केला आहे. या योजनेसाठी 40 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या योजनेवरील 40 कोटी रुपयांची तरतूद अत्यल्प आहे. या तरतुदीमध्ये निश्चितपणे भर घालता येईल. ई-जिल्हा प्रकल्प राबविण्यासाठी पुणे, नागपूर, लातूर, नांदेड व सिंधुदुर्ग या जिल्हयांची निवड करण्यात आली आहे. अशा प्रकारचा समतोल राखणे हे राज्यकर्त्यांचे काम असते. ते त्यांनी अतिशय चांगल्याप्रकारे केलेले आहे.

सभापती महोदय, शासनाने एका प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. सध्याच्या लोकसंख्या आणि त्यातील स्त्री-पुरुष संख्येमध्ये निर्माण झालेले असंतुलन विचारात घेता भविष्यात फार मोठया सामाजिक समस्येला सामोरे जावे लागणार आहे. ही अतिशय भयावह अवस्था निर्माण होत आहे. आपण काही गोष्टी प्राधान्याने घ्यायचे निश्चित करतो. राज्याचे उद्दीष्ट निश्चित करताना प्रथमत: ज्या जिल्हयांमध्ये लोकसंख्येतील स्त्री-पुरुषांच्या संख्येत प्रमाणाबाहेर असंतुलन वाढले आहे त्या जिल्हयांमध्ये परिणामकारक योजना राबवून जे जे करणे आवश्यक आहे ते करुन हे असंतुलन दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. या समस्येला पुढच्या काळात प्राधान्य दिले पाहिजे असे मला वाटते.

नंतर 2डी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले.......

महोदय, अर्थसंकल्पात दिलेली सर्वच विभागांची आकडेवारी येथे वेळेअभावी देणे शक्य होणार नाही कारण विषय अनेक आहेत. पण या निमित्ताने मी एवढे मात्र सांगू इच्छितो की, आपल्या राज्यात जी जलसंपत्ती आहे तिचा वापर योग्य प्रकारे करावयाचा असेल, पाण्याचा थेंब वाया जाऊ द्यावयाचा नसेल तर एखादी अभिनव योजना किंवा उपक्रम हाती घेण्याची गरज आहे. माझ्याकडे अशाच एका संस्थेने तयार केलेला व प्रत्यक्षात अंमलात आणलेला अभिनव उपक्रम आहे. त्या उपक्रमाचे नाव "जल साक्षरता अभियान" असे आहे. त्यामध्ये पाण्यासंबंधीची साक्षरता, ज्ञान व विविध उद्दिष्ट्ये आणि त्यानुसार करावयाची कार्यवाही अशा सर्व बाबी असून लोक सहभाग फार महत्वाचा आहे. हा उपक्रम एका संस्थेने, आपल्या अनेक शाळांनी मिळून एक आदर्श प्रकल्प तयार केला व राबविलेला आहे. या प्रकल्पासाठी एक हजार विद्यार्थ्यांनी एक वर्ष काम केले आणि वर्षाकाठी फक्त 1.45 लाख रुपये इतकाच खर्च आला. शासनाने देखील अशा प्रकारची एखादी प्रोत्साहनपर योजना करण्याचे ठरविले तर त्याचा निश्चितच राज्यातील जलसाठ्याची काळजी घेण्यासाठी उपयोग होऊ शकतो.

महोदय, शासनाने महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये 50 टक्के आरक्षण देण्याचे सुतोवाच केले. त्यामुळे महिलांचा सहभाग वाढेल असे म्हणतात. परंतु आपण या महिलांच्या बाबतीत त्यांच्या बालवयापासून ज्या ज्या आवश्यक गोष्टी असतात त्याकडे दुर्लक्ष झाले तर तयार होणाऱ्या भावी पिढीमध्ये फार मोठी तफावत निर्माण होऊ शकते, हे विसरुन चालणार नाही. शालेय शिक्षणासाठी भरीव आर्थिक तरतूद तसेच त्या निमित्ताने शाळांमध्ये स्वच्छता गृहांचा प्रश्न भेडसावतो याची अनेक वेळा सभागृहात चर्चा झाली आहे. कारण स्वच्छता गृहे नसतील तर त्याचे पर्यवसान डिसेंट्री, डायरिया व जंतुंचा प्रादुर्भाव अशा प्रकारचे रोग उदभवण्यात होतो. यातून मार्ग काढावयाचा असेल तर लोक सहभागाची बांधिलकी असण्याची आवश्यकता असते. त्यासाठी एखादा जल आणि स्वच्छता गृहांचा उपक्रम शासनाने हाती घ्यावा, असे मला वाटते.

सभापती महोदय, राज्यात दिवसेदिवस मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण होऊन शहरे वाढत आहेत त्यामुळे सार्वजनिक स्वच्छता हा एक जटिल प्रश्न होऊन बसला आहे. आपल्या देशात यासंबंधीचा कायदा असला तरी तो पाळला जात नाही. काळाच्या ओघात प्लास्टिक आणि

...2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ........

ई-कचरा मोठ्या प्रमाणात निर्माण होतो पण त्याचे निर्मुलन करण्याची व्यवस्था नसते. रस्त्यात जागोजागी आपल्याला प्लास्टिकच्या पिशव्या फेकल्याचे दिसते, विविध प्रकारची औषधांची आवरणे फेकून दिलेली दिसतात. यासंदर्भात खरे तर लोक जागृती आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लोकांचे प्रशिक्षण करण्याची गरज आहे. हे समाजाभिमूख असे काम समजून अशी मोहीम राबविण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा तयार करावी व त्यात काम करण्यासाठी इच्छुक असलेल्या सामाजिक संस्थांना सहभागी करुन घेतले तर अशा बाबींकडे विशेष लक्ष देता येईल.

महोदय, किशोरवयीन मुलांचे आरोग्य हा प्रश्न आरोग्य विभागासमोर महत्वाचा व आव्हानात्मक स्वरुपाचा निर्माण झालेला आहे. मागील वेळेस सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी प्रश्नोत्तराच्या तासात आदिवासी भागात आरोग्याच्या दृष्टीने सॅनिटरी नॅपकिन्सच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केला होता. या गोष्टी आरोग्यासाठी अतिशय आवश्यक आहेत व त्यात स्वयंसेवी संस्थांना सामावून घेता येईल काय, यादृष्टीने काही नवीन योजना आणता आली तर त्याचाही चांगला उपयोग होऊ शकतो.

महोदय, या अर्थसंकल्पात बाल कामगारांचे निर्मुलन करण्यासंबंधीचाही एक विषय अंतर्भुत आहे. पण त्यासाठी फक्त 16 कोटी एवढी तुटपुंजी तरतूद करण्यात आली आहे, त्यात भरीव वाढ होणे आवश्यक आहे. कारण बालके ही राष्ट्राची संपत्ती आहे व त्यांच्यावर चांगले संस्कार झाले पाहिजेत. त्यांना अधोगतीकडे जाण्यापासून वाचवू शकलो तर त्यांच्यासाठी शिक्षण, अन्न, वस्त्र व निवारा योग्य प्रकारे मिळाला पाहिजे म्हणून ही तरतूद वाढवून मिळाली पाहिजे, असे मला वाटते.

महोदय, मराठी भाषा हा विषय खरे म्हणजे समोर बसलेल्या काही सन्माननीय सदस्यांचा आवडीचा विषय आहे. मला वाटते की मराठी भाषा आणि मराठी संस्कृती असा एकत्रित विचार करण्याची गरज आता निर्माण झालेली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

आणि जोपर्यंत मराठी भाषेचा व मराठी संस्कृतीचा आपण एकत्रितपणे विचार करणार नाही तोपर्यंत तिचा विकास होणार नाही. मराठी भाषेला राजभाषा व लोकभाषा म्हणून काय स्थान आहे, लोकांपर्यंत मराठी भाषा कशी जाणार आहे, आपण खरोखर मराठी भाषेचा वापर करणार आहोत की, नाही याचाही विचार करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, सांस्कृतिक विभागातर्फे महाराष्ट्राचे लाडके दैवत, आवडते व्यक्तिमत्व म्हणजे पु.ल.देशपांडे यांच्या नावाने पु.ल.देशपांडे कला अकादमी स्थापन करण्यात आलेली आहे. ही कला अकादमी संस्कृतीचे जतन व संवर्धन करणार आहे. हे सर्व होत असतांना पु.ल.देशपांडे कला अकादमीला 1991 पासून पूर्णवेळ संचालक देखील मिळालेला नाही ही दुर्भाग्याची बाब आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. त्यामुळे मराठी भाषा व मराठी संस्कृतीबद्दल आपण किती जागरुक आहोत हे मला या निमित्ताने निदर्शनास आणून द्यावयाचे होते.

सभापती महोदय, या ठिकाणी ब-याच सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे की, शासन मोठ मोठया तरतुदी करते परंतु प्रत्यक्षात हातात काहीच पडत नाही. खरे म्हणजे दप्तर दिरंगाई मुळेच तरतुदी करुनही हातात काहीच पडत नाही असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. दप्तर दिरंगाईवर अंकुश ठेवला तरच लोकांपर्यंत निधी पोहचू शकेल.

सभापती महोदय, खालच्या सभागृहात अर्थसंकल्प सादर करतांना काही प्रकार घडला, अर्थसंकल्प संतुलित नाही अशा गोष्टींचा उल्लेख ब-याच सन्माननीय सदस्यांनी केलेला आहे. परंतु आपण लक्षात ठेवले पाहिजे की, लोकांनी दिलेल्या सत्तेचा उपयोग जनतेसाठी व्हावा यासाठी शासनकर्ते म्हणून आमचे प्रतिनिधी त्या ठिकाणी बसलेले आहेत. आमच्या प्रतिनिधींचे भान कधीही सुटणार नाही किंवा कोणत्याही विभागावर कोणताही प्रकारे अन्याय होणार नाही याबद्दल नियोजन केले जाईल असा जनतेला सुध्दा विश्वास आहे.

सभापती महोदय, कोणीही मार्च एंडच्या वेळेस बी अँड सी खात्यात जाऊ नये, मंत्रालयात जाऊ नये तसेच कोणत्याही खात्यामध्ये जाऊ नये. याचे कारण असे आहे की, 31 मार्चची धावपळ व 31 मार्चपर्यंत खर्ची न पडलेली रक्कम खर्च करण्यासाठी लागलेली शर्यत या दोन गोष्टी स्थायीभाव



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

बनत चालल्या आहेत. नवीन वर्ष 1 एप्रिलला सुरु होते व 31 मार्चला संपत असते. मार्चच्या शेवटच्या आठवडयात पुढील वर्षाचा अर्थसंकल्प सभागृहात सादर करुन मंजूर केला जात असतो व त्यानुसार कामांना सुरुवात होत असते. त्यामुळे दर तीन महिन्यांनी कोणकोणत्या विभागाने कोणत्या योजना राबविल्या व त्यासाठी किती पैसा खर्च केलेला आहे, किती योजना राबविल्या गेल्या नाहीत यासंदर्भातील आढावा घेण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे यासंदर्भातील घेतलेला आढावा दोन्ही सभागृहाच्या अधिवेशनात दर तीन महिन्यांनी मांडला जावा व त्यावर चर्चा केली जावी अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पात महाराष्ट्रातील माणसाचा चेहरा समोर ठेवून अर्थसंकल्प मांडला गेला आहे. माननीय वित्त मंत्र्यांनी ज्या काही तरतुदी अर्थसंकल्पात केलेल्या आहेत त्याकडे जर आपण बघितले तर

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले ...

जे लहान लहान विषय आहेत त्यासाठी सुध्दा या अर्थसंकल्पामध्ये भरीव तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास , अष्ट विनायक मंदिर विकास,नाटय परिषदेसारखी संस्था,कोल्हापूरची चित्रनगरी,किल्ले जतन करण्याची मोहीम, किना-यावरील पर्यटन वाढ व सुरक्षा व्यवस्था,व्याघ्र प्रकल्प, प्राणी संग्रहालय ,गेट वे ऑफ इंडिया येथील जेटीचे बांधकाम या सारख्या बारीक सारीक गोष्टी साठी सुध्दा या अर्थसंकल्पा मध्ये भरीव तरतूद करण्यात आली आहे.अशा प्रकारे बारीक सारीक बाबीमध्ये लक्ष देऊन राज्याच्या भविष्याचा जेव्हा विचार करतो तेव्हा या अर्थसंकल्पातील तरतुदी निश्चितपणे राज्याला प्रगतीपथावर नेणा-या आहेत हे आपल्याला जाणवते म्हणूनच या अर्थसंकल्पाव्दारे हे मराठी पाऊल भक्कमपणे पुढे पडेल आणि भविष्यात महाराष्ट्राला उच्च शिखरावर नेईल याचा मला विश्वास वाटतो. काही सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणाचा शेवट कविता किंवा शेर सांगून केला होता. मी देखील या ठिकाणी माझ्या भाषणाचा शेवट एक अभंग सांगून करीत आहे. समोरच्या बाकावर बसलेल्या सन्माननीय सदस्यांनी त्याचा चांगला अर्थ घ्यावा अशी माझी त्यांना विनंती आहे. हा अभंग असा आहे.

अंबीर, गुलाल उधळीत रंग /
नाथा घरी नाचे माझा सखा पांडुरंग //

एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** औचित्याचे मुद्दे

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री जयंत प्र.पाटील यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.ज्येष्ठ समाज सेवक श्री. अण्णा हजारे यांच्या पी.ए.ना ठाणे येथे काल धक्काबुक्की झालेली आहे.त्यांनी सन्माननीय गृह मंत्र्यांना फोन केला होता. शांततेने आंदोलन करणारे आणि गांधीवादी विचाराचे अशी श्री अण्णा हजारे यांची प्रतिमा आहे. ज्या अधिका-यानी त्यांच्या पी.ए.ना. धक्काबुक्की केलेली आहे आणि त्यांचा अवमान केलेला आहे त्या अधिका-याविरुध्द कारवाई करण्यात यावी अशी मी या औचित्याच्या मुद्याव्दारे मागणी करीत आहे.

**उप सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी या बाबीची नोंद घ्यावी.

श्री.संजय देवतळे : नोंद घेण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : त्या अधिका-याच्या विरुध्द कारवाई करण्यात आली पाहिजे.

**उप सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी या बाबीची नोंद घेतलेली आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.नीलम गोऱ्हे :सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. आज मोहाली येथे भारत पाकिस्तान यांच्या मधील क्रिकेटच्या सामन्याकडे लक्षावधी लोकांचे लक्ष लागले असून मल्टी प्लेक्सना हे सामने दाखविण्याची परवानगी देण्यात आली आहे.परंतु पुणे शहरामध्ये रस्त्यावरील रहदारीला अडथळा न आणता मोठे स्क्रीन लावून हा सामना दाखविण्याची काही जणांना मोफत सोय करावयाची असेल तर त्यासाठी पुणे शहरातील पोलिसांनी बंदी आणली आहे. ज्या कार्यकर्त्यांनी अशा प्रकारे दूरदर्शन संच ठेवण्याची व्यवस्था केलेली आहे त्यांच्या विरुध्द केसेस दाखल केल्या जात आहेत. .अडथळा.... बसून बोलल्यामुळे बावळटा सारखे काहीही बोलले तरी चालते असे काही जणांना वाटते ..काही लोक घरा पासून लांब राहतात . प्रत्येक मध्यमवर्गीयाच्या घरात टी.व्ही.आहे हे जरी खरे असले तरी मल्टीप्लेक्सना सामना दाखविण्याची परवानगी देण्यात आलेली आहे परंतु पुणे शहरामध्ये जर टी.व्ही. लावून मोफतमध्ये सामना पाहण्याची कोणी व्यवस्था करीत असेल तर हजारो रसिकांना त्याचा लाभ घेता येईल. गृह विभागाने त्यांना परवानगी द्यावी यासाठी मी औचित्याच्या मुद्याव्दारे शासनाचे लक्ष वेधू इच्छिते आणि पुणे शहरामधील पोलिसांना त्या बाबतीत सूचना देण्यात याव्यात अशी विनंती करते.

श्री.संजय देवतळे : नोंद घेण्यात येईल..

-------

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

**मु.शी.**: सन 2011-2012 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

( चर्चा पुढें चालू )

प्रा. दिलीपराव सोनवणे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी या सभागृहामध्ये सन 2011-12 चा अर्थसंकल्प मांडला त्याबद्दल मी त्यांचे मनापासून स्वागत करतो आणि समर्थन करतो.

सभापती महोदय, हा अर्थसंकल्प सर्वसामान्य माणसाला दिलासा देणारा आहे. शेतकऱ्यांसाठी भरीव तरतूद करणाऱ्या, शेतकऱ्यांना न्याय देणाऱ्या या अर्थसंकल्पाचा केंद्रबिंदू आम आदमी आहे. कोणत्याही नवीन कराचा बोजा नसलेल्या 58 कोटींचा शिलकी अंदाज ठेवणारा हा अर्थसंकल्प आहे, या अर्थसंकल्पामध्ये शेतकरी आणि सर्व सामान्य माणसाला डोळयासमोर ठेवून शेवटच्या माणसापर्यंत निधी पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. ऐपत असलेल्यांकडून कर घेणारा व तो गरिबांना देणारा असा हा अर्थसंकल्प आहे. खूप जादा कर वाढ नसलेला परंतु ज्यांची कर देण्याची ऐपत आहे त्यांच्यावर कर वाढवून त्यामधून मिळणारे उत्पन्न गरीबांसाठी खर्च करणारा हा अर्थसंकल्प आहे. सभापती महोदय, विद्यार्थी, शेतकरी, कामगार, बेरोजगार, लहान व्यापारी, दलित, मागासवर्गीय, ज्येष्ठ नागरिक व महिला या सर्वांसाठी पूरक असलेला हा अर्थसंकल्प माननीय नामदार श्री. अजितदादा पवार साहेबांनी मांडल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, शेतीसाठी सर्वाधिक तरतूद असलेला हा अर्थसंकल्प आहे. शेतकऱ्यांसाठी पीक कर्ज व इतर योजनांचा समावेश असलेला हा अर्थसंकल्प आहे. शेतकऱ्यांच्या कर्जावरील व्याज दरामध्ये सूट देणारा हा अर्थसंकल्प असून 50 हजार रुपयापर्यंत बिनव्याजी कर्ज पुरवठा आणि 3 लाखापर्यंत 2 टक्के दराने व्याज आकारणी या करिता या अर्थसंकल्पीय वर्षामध्ये 84 कोटी 28 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. खरीप हंगामासाठी खतांचा राखीव साठा असला पाहिजे त्याकरिता 51 कोटी 50 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्याचबरोबर थक हमीची देखील तरतूद करण्यात आली आहे. कृषी पंपाना वीज अनुदानापोटी 2500 कोटींची तरतूद करण्यात आल्यामुळे 31 लाख शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. त्यामुळे मागेल त्याला वीज अशा प्रकारचा शेतकऱ्यांसाठी स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला आहे. एप्रिल 2011 पासून मागेल त्याला



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. दिलीपराव सोनवणे....

कृषी पंपाला वीज देण्यात येणार असून त्यासाठी 80 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे 5444 कृषी पंपाचा अनुशेष भरुन निघेल याची मला खात्री आहे. शेतकऱ्यांना मदत करणारी अशी एक आदर्श "कृषी संजीवनी योजना 2011" या अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट असून शेतकऱ्यांना मदत करणारी जीवनदायी योजना, प्रत्येक शेतकऱ्याच्या थकित बिलामध्ये 50 टक्क्यापेक्षा जास्त सूट देणारी 2989 कोटींची महत्वाकांक्षी योजना आहे. याबद्दल मी माननीय अर्थमंत्र्यांचे अभिनंदन करतो. शेतकऱ्यांसाठी असलेल्या राष्ट्रीय कृषी पीक विमा योजनेसाठी 83 कोटींची भरीव तरतूद करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे 415 कोटींची राष्ट्रीय कृषी विकास योजना आहे, त्याचप्रमाणे  काढणी पश्चात व्यवस्थापनासाठी देखील तरतूद करण्यात आली आहे. अशाप्रकारच्या अनेक तरतुदी या अर्थसंकल्पामध्ये करण्यात आल्या असल्यामुळे शेतकऱ्यांचे अश्रू पुसण्याचा प्रयत्न करणारा हा अर्थसंकल्प आहे. या करिता मी या अर्थसंकल्पाचे स्वागत करीत आहे.

सभापती महोदय, आरोग्य सेवेच्या बाबतीत सांगितले पाहिजे की, ग्रामीण भागातील सर्वसामान्य गरीब  लोकांना आरोग्याची सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी आरोग्य सेवेचे मजबूतीकरण आणि विस्तारीकरण करणे गरजेचे असल्यामुळे हे ओळखून माननीय अर्थमंत्र्यांनी आरोग्य सेवा इमारतीच्या बांधकामासाठी 231.95 कोटींची तरतूद केली आहे. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानासाठी 166 कोटींची तरतूद केली आहे, ग्रामीण भागातील दवाखान्यामध्ये एक्स-रे मशीन असावे, ईसीजी मशीन असावे ही उपकरणे बसविण्यासाठी 48 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील महत्वाच्या सार्वजनिक रुग्णालयांमध्ये आधुनिकीकरण करण्यासाठी आणि त्यांचे बळकटीकरण करण्यासाठी अर्थसंकल्पामधून थेट तरतूद करण्यात आल्यामुळे मी माननीय अर्थमंत्र्यांचे मनापासून आभार मानतो.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पावरील चर्चेच्या निमित्ताने कृषी विद्यापीठांमध्ये प्रशिक्षण, मार्गदर्शन व प्रात्यक्षिके देण्याची गरज प्रतिपादन करतो. त्याचप्रमाणे पशुधन वाचविण्यासाठी आणि त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी पशु वैद्यकीय दवाखान्यांच्या सोयी उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. त्याकरिता बांधकाम करणे, त्यांचे आधुनिकीकरण करणे आणि बळकटीकरण करणे हा कार्यक्रम शासनाने हाती घेतला असून त्यासाठी 27 कोटी 27 लाखाची तरतूद करण्यात आली आहे. त्याबद्दल मी माननीय अर्थमंत्री आणि अर्थ राज्यमंत्र्यांचे मनापासून आभार मानतो.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. दिलीपराव सोनवणे....

सभापती महोदय, शिक्षणाच्या संदर्भात बोलत असतांना विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागृती निर्माण करण्यासाठी पर्यावरण सेवा योजनेचा महत्वपूर्ण निर्णय घेऊन त्यासाठी 16 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणासाठी "बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009" लागू करण्यासंदर्भातील कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. सर्व शिक्षा अभियानासाठी 780 कोटी रुपयांची, राष्ट्रीय शिक्षा अभियानासाठी 500 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KTG/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 12:45

श्री.दिलीपराव सोनवणे . . . .

अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांकरता मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्तीसाठी 48 कोटी रुपये आणि त्यात मुलींसाठी 30 टक्के निधी राखीव ठेवण्यात आलेला आहे ही अभिमानाची गोष्ट असल्याचे मी याठिकाणी नमूद करु इच्छितो. तसेच या चर्चेच्या निमित्ताने शिक्षणाच्या संबंधात ज्या अडचणी आहेत, त्याचा देखील विचार करणे आवश्यक आहे. शिक्षण विभागामध्ये संचालकांपासून अधिकारी आणि कर्मचारी यांच्या रिक्त असलेल्या जागा भरणे देखील आवश्यक आहे. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील प्लॅनमधील माध्यमिक शाळांमधील शिक्षकांच्या वेतनासाठी तरतूद केलेली नाही, ती झाली पाहिजे.बिगर आदिवासी क्षेत्रातील 63 विनाअनुदानित शाळांसाठी तसेच मूल्यांकन झालेल्या शाळांना देखील अनुदान मिळाले पाहिजे अशी मी या निमित्ताने सूचना करतो. शिक्षण क्षेत्रातील प्रश्न, शिक्षकांचे प्रश्न, शिक्षण सेवकांचे प्रश्न,संस्था चालकांचे प्रश्न तसेच शाळांमधील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न,स्वच्छतागृहे इ.साठी आवश्यक ती तरतूद व्हावयास पाहिजे अशी मी येथे सूचना करतो. तसेच मुख्याध्यापकांची अनेक पदे रिक्त आहेत, ती भरण्याच्या बाबतीत शासनाच्या माध्यमातून विचार व्हावयास पाहिजे.

सभापती महोदय, सिंचनाच्या बाबतीत सांगावयाचे तर महाराष्ट्र राष्ट्रीय सरासरीपेक्षा निश्चितपणे मागे असल्याने त्यासाठी भरीव तरतूद करणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे माननीय वित्तमंत्र्यांनी याचा अचूक वेध घेऊन त्यासाठी दहा हजार कोटी म्हणजेच अर्थसंकल्पाच्या 25 टक्के इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. राज्यातील सिंचनाचा प्रश्न सोडविण्यासाठी अर्थसंकल्पात 6300 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.मग यामध्ये अंतिम टप्प्यातील प्रकल्प असतील किंवा पाणीसाठा करण्यासाठी प्रकल्प असतील याबद्दल मी माननीय वित्तमंत्र्यांना धन्यवाद देतो. परंतु खानदेशामध्ये बॅरेजेस्‌ची कामे पूर्ण झाली आहेत. तेथील पाणी लिफ्टव्दारे सिंचनासाठी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे आणि त्यासाठी तरतूद करणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे पाटचाऱ्यांची अपूर्ण कामे, आवश्यक परंतु राहिलेली कामे, तसेच पाडळसा ता.अमळनेर येथील धरणाच्या कामासाठी व पुनर्वसनासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्यात यावा अशी विनंती करतो. त्याचप्रमाणे नदीजोड प्रकल्प हा अतिशय महत्वाकांक्षी प्रकल्प असून, खानदेश विभागासाठी पाणलोट क्षेत्र विकासाच्या बाबतीत जास्तीतजास्त तरतूद देण्यात यावी अशी अपेक्षा या चर्चेच्या निमित्ताने व्यक्त करतो.

सभापती महोदय, राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम हा प्रभावीपणे राबविण्याची आवश्यकता



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनवणे . . . .

आहे. तसेच या अर्थसंकल्पामध्ये गावांमध्ये आणि वाड्यांमध्ये पाणी पुरवठा करण्यासाठी या वित्तीय वर्षामध्ये राज्य आणि जिल्हा योजनांच्या मार्फत 699.85 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. शहरातील पाणीपुरवठा व मलनि:सारणाच्या कार्यक्रमासाठी देखील राज्यातील निधीचा काही हिस्सा उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यामुळे मी याठिकाणी माननीय वित्त मंत्र्यांचे निश्चितपणे आभार मानतो.

सभापती महोदय, पर्यावरण संतुलन ग्रामविकास अभियान ही अतिशय महत्वपूर्ण आणि महत्वाकांक्षी योजना आहे. गावांचा विकास साधण्यासाठी हे अभियान राबवित असताना ग्राम पंचायतींना थेट निधी देण्याची आणि त्याचा वापर करण्याची संधी देण्यात आलेली आहे. त्याबद्दल मी शासनाचे मनापासून आभार मानतो.

सभापती महोदय, राज्यातील युवा व क्रीडा धोरणासाठी 25 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. मला सांगताना आनंद होत आहे, मात्र मला क्रिकेट या खेळाबद्दल व्देष नाही. पण क्रिकेट शिवाय कुस्ती, कबड्डी, व्हॉलीबॉल, खो खो इ.खेळांसाठी प्रत्येकी 50 लाख रुपयांचे अनुदान देण्यात आलेले आहे. मी शासनाचे निश्चितपणे अभिनंदन करतो. तालुक्याच्या ठिकाणी क्रीडा संकुल उभारण्यासाठी देखील तरतूद करण्यात आलेली आहे आणि त्या माध्यमातून अतिशय महत्वाचा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. जिल्हा आराखड्या संदर्भात सांगावयाचे तर जिल्ह्या मध्ये योजना राबविण्यासाठी आराखड्यात 500 कोटी रुपयांनी वाढ करण्यात आलेली आहे. त्यामुळे प्रत्येक जिल्ह्याच्या योजनेसाठी 48 कोटी रुपयांची भरीव तरतूद करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, ऊर्जाच्या संदर्भात सांगावयाचे तर 12-12-2012 पर्यंत महाराष्ट्र राज्य भारनियमन मुक्त झाला पाहिजे यादृष्टीने चांगला निर्णय घेण्यात आला आहे. राज्यावरील भार नियमनाचे संकट 2012 पर्यंत दूर करणे आवश्यक असल्याने ऊर्जा विभागासाठी भरीव तरतूद करण्यात आलेली आहे. त्याकरता महानिर्मितीच्या माध्यमातून प्रकल्प राबविले जात आहेत.

सभापती महोदय, शेतकऱ्यांसाठी भरघोस मदत देण्यात आली आहे. तसेच जीवनावश्यक वस्तू करमुक्त केल्या आहेत. तसेच सिंचन, ऊर्जा, शिक्षण आणि आरोग्य विभागांसाठी भरपूर निधी देण्यात आलेला आहे. पर्यटनासाठी देखील निधी दिलेला आहे. विशाल उद्योग प्रकल्पांसाठी तरतूद केलेली असून नवीन वस्त्राद्योग धोरण राबवावयाचे आहे.तसेच तीर्थक्षेत्र विकासासाठी विशेष आराखडा तयार करण्यात येणार आहे. तसेच मेट्रो रेल्वे प्रकल्प राबविणे, विमानतळाचा विकास

करणे, मुंबईत मुलभूत सुविधा प्रकल्प राबविणे, राज्यातील किल्ल्यांचा विकास करणे, पोलीस दलाचे आधुनिकीकरण करणे तसेच पोलिसांच्या निवासाची सोय करणे इ.अनेक कल्पक कामांचा या अर्थसंकल्पामध्ये समावेश केलेला आहे.

सभापती महोदय, यावर्षीचा अर्थसंकल्प हा पुढील अनेक वर्षाच्या अर्थसंकल्पाचा पायाच आहे असे मी येथे नमूद करतो. उद्याच्या महाराष्ट्रासाठी निश्चितच ही बाब भूषणावह राहील. गरीब जनतेसाठी, ग्रामीण भागासाठी विशेष तरतूद करण्यात आल्याने त्याचा फायदा निश्चितच होईल म्हणून दादा तुमचा अर्थसंकल्प महान आहे असे मला सांगावयाचे आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीपराव सोनवणे....

दादा तुमचा अर्थसंकल्प महान,
राज्याची जनता करिती तुमचे औक्षण ॥

अर्थसंकल्पावर तुम्ही कां होता निर्विकार,
विनाकरण नका घालू वहिष्कार,
सारी जनता पाहते तुमचा अविष्कार,
आम्ही मात्र पाहतो निर्विकार,
कारण या अर्थसंकल्पात आहे विकासाचाच विचार ॥

गरिबांचा आधार,
करवाढीपासून लांब आहे फार,
त्यात सुसूत्रीकरण अपार,
म्हणून जनतेला आवडला हा अर्थसंकल्प फार ॥

या शासनाने नाही वाढविले कर,
सर्वच ठिकाणी दिसते काटकसर,
यातच होईल राज्याचे कल्याण,
राज्य होईल सुजलाम् सुफलाम् ॥

हाताला काम,
प्रत्येकाला अन्न,
तहानलेल्यांना पाणी,
विद्यार्थ्यांना शिक्षण,
राबवू योजना दणादण,
स्वीकारु या आव्हान सारे आपण,
हेच आपल्या राज्याचे धोरण ॥

नव्या विकासाचे साकार करण्या स्वप्न,
दादा यातच आहेत व्यस्त प्रत्येक क्षण,
राज्यातील जनता करिते तुमचे औक्षण,
दादा तुमचा अर्थसंकल्प आहे महान ॥

जयहिंद, जय महाराष्ट्र.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, या सभागृहामध्ये अर्थ राज्य मंत्री श्री. राजेंद्र मुळक यांनी जो अर्थसंकल्प मांडला आहे, त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय राज्य मंत्री श्री. मुळक यांचे या अर्थसंकल्पावरील चर्चेच्या उत्तराचे भाषण तयार झाले असेल. सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील भाषण, भाग पहिला, मुद्दा क्रमांक 62 मध्ये असे म्हटले आहे की, "मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पामध्ये प्रथमत: टप्पा -1 अंतर्गत रुपये 2 हजार 500 कोटींची विविध कामे हती घेण्यात आली आहेत."

सभापती महोदय, सी-लिंकचे काम पूर्ण होत आलेले आहे. दुसऱ्या टप्प्यातील काम सुरु आहे. एच.एस.ई. कंपनीला 650 कोटी रुपये देण्याचे प्रस्तावित केलेले आहे त्याचे नेमके काय झ ााले? गेल्या अधिवेशनात माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी असे संगितले होते की, हे पैसे देण्यात आलेले नाहीत. तेव्हा हे पैसे देण्याच्या बाबतीत नेमके काय झाले? सी-लिंकचे काम अजूनही सुरु आहे आणि अजूनही त्या ठिकाणी अपघात होतात. स्पीडगण बसविण्यात येणार आहेत असे दोन अधिवेशनापूर्वी सांगण्यात आले होते, त्याचे नेमके काय झाले? आज या सी-लिंकवर अपघात होत आहेत, तेव्हा या बाबतीत विचार करण्यात यावा.

सभापती महोदय, थोडयावेळा पूर्वी या ठिकाणी भाषण करणाऱ्या वक्त्याने ग्रामीण आरोग्यासाठी करण्यात आलेली 24 कोटी रुपयांची तरातूद चांगली आहे असे सांगितले आहे. सभापती महोदय, आपण ज्या भागात रहाता, त्या भागातील ठाणे सिव्हिल हॉस्पिटलमध्ये एका जनरेटरवर संपूर्ण हॉस्पिटल चालत आहे. महावितरणने असे सांगितले आहे की, या हॉस्पिटच्या विद्युत पुरवठयासाठी 1 कोटी 51 लाख रुपयांची आवश्यकता आहे. महावितरण या कंपनीला देण्यासाठी राज्य शासनाकडे 1 कोटी 51 लाख रुपये नसतील तर या 24 कोटी रुपयांच्या तरतुदीतून काय होणार आहे? सभापती महोदय, या राज्यामध्ये 1,816 प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत, 10,579 उप केंद्र आहेत आणि 365 ग्रामीण रुग्णालये आहत. याचा एकंदर हिशेब केला तर साधारणपणे प्रत्येकाच्या वाटयाला 18,808 रुपये येतील.

यानंतर श्री. बरवड....

डॉ. दीपक सावंत ....

आपल्याला जर 24 कोटी रुपये विभागून द्यावयाचे असतील तर 18 हजार 808 रुपयांमध्ये काय येणार ? आज इ.सी.जी. मशिन सुध्दा 35 हजार रुपयांना मिळते. त्यामुळे हा अर्थसंकल्प समतोल आहे असे म्हणणे चुकीचे आहे.

सभापती महोदय, दुसरी महत्वाची गोष्ट मी आपल्यासमोर मांडणार आहे. मी एक जी.आर. आणलेला आहे. मघाशी कोणी तरी पैशाच्या उधळपट्टीबद्दल आणि 31 मार्च पर्यंत हा खर्च कसा होतो या बाबत सांगितले. 31 मार्च, 2010 चा शालेय शिक्षण विभागाचा जी.आर. आहे. शालेय पोषण आहारामध्ये आयर्नयुक्त गोळ्या पुरवण्यासंबंधीचा हा जी.आर. आहे. या संदर्भात डायरेक्टर ऑफ मेडिकल एज्युकेशनचा देखील जी.आर. आहे. या जी.आर.मध्ये जो रेट आहे तो कमी आहे. म्हणून त्यांनी इएसआयसीचा जी.आर. घेतला. त्यांनी इएसआयसीचा जी.आर. घेऊन 2011 मध्ये आजपर्यंत 16 कोटीची ऑर्डर दिलेली आहे. मुलींना देण्यासाठी आयर्न फॉलिक ॲसिडच्या या गोळ्या आहेत. वास्तविक दिवसातून एक गोळी घेणे आवश्यक असते. त्यांनी अशी शक्कल लढवली की, आठवड्यातून एक गोळी म्हणजे ज्याला आपण सस्टेन रिलीज म्हणतो आणि अस्थम्यासाठी जी एस.आर. गोळी घेतो तशा प्रकारच्या गोळ्या देऊन त्यांनी ही सोय केलेली आहे. आता त्यांना 25 मार्च पासून 31 मार्चपर्यंत आणखी 46 कोटीची ऑर्डर गेलेली आहे. शासन याची चौकशी करणार का ? या जी.आर.मध्ये प्रचंड फरक आहे. आजपर्यंत 29 कोटी 52 लाख रुपयांची ऑर्डर गेलेली आहे. माननीय मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, आपण या बाबतीत लक्ष घालावे.

सभापती महोदय, आश्रमशाळेतील 2 लाख 7 हजार 484 विद्यार्थ्यांसाठी टॉप स्प्रिंक हे अशाच प्रकारचे एक छोटे पॉकेट असते. आता त्याचे रुपांतर बाटलीमध्ये केलेले आहे. त्याची 7 कोटीची ऑर्डर दिली गेली. हे टॉप स्प्रिंक अन्नावर स्प्रिंकल करतात. त्यामुळे अन्नामध्ये प्रोटीन वाढते अशा प्रकारचा दावा केला जातो. त्यानंतर एका महिन्यामध्ये परत दुसरी ऑर्डर गेली. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये हे मोठ्या प्रमाणावर वाटले जाते. याचा पुरवठादार कोण आहे याची माहिती घ्यावी. आपल्याच मंत्रिमंडळातील मंत्र्याचा जवळचा नातेवाईक याचा पुरवठादार आहे. त्याच खात्याच्या बाबतीत मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलताना सांगत होतो की, थंडी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

गेल्यानंतर आता फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यामध्ये जे स्वेटर्स पुरविले गेले त्यामध्ये स्वेटर्सचा पुरवठादार देखील तोच आहे. यामध्ये आपण सगळे भाऊ भाऊ ही म्हण वापरावयाची असेल तर ती बरोबर आहे. एकाच माणसाला हे दोन कॉन्ट्रॅक्ट दिले गेले आहेत. याचबरोबर बेंच खरेदी झालेली आहे. हे सगळे जी.आर. माझ्याकडे आहेत. कफ सिरपची खरेदी झालेली आहे. अशा प्रकारे आदिवासी विकास खात्यात कोट्यवधी रुपयांची लूट चाललेली आहे.

सभापती महोदय, दुसरी एक महत्वाची बाब मी सभागृहासमोर आणू इच्छितो. मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल्सच्या कंस्ट्रक्शनसाठी साधारणपणे 67.26 कोटी रुपये दिलेले आहेत. आपण गेल्या तीन वर्षाचे अंदाजपत्रक काढून पहावे. ससून हॉस्पिटलला शासनाने 20-20 कोटी रुपये किती वेळा दिले ते आपण पहावे. हे 20-20 कोटी रुपये कोठे जातात ? या वर्षी सुध्दा 20 कोटी रुपये दिलेले आहेत. गेल्या अधिवेशनामध्ये मी यादी वाचून दाखविली होती. जवळजवळ 187 कोटी रुपये या हॉस्पिटल्सच्या कंस्ट्रक्शनसाठी दिले गेले होते तरी देखील पुन्हा शासनाने ससून हॉस्पिटलला 20 कोटी रुपये दिले. गेल्या वेळच्या 20 कोटी रुपयांचा हिशेब आपण घेतला का ?

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

सभापती महोदय, औरंगाबाद येथील घाटी रुग्णालयासाठी 25 कोटी रुपये दिले आहेत. परवाच तेथे मारामारी झाली हे मंत्री महोदयांना माहीत असेल. तेथील विद्यार्थ्यांना आंघोळीसाठी गरम पाणी मिळत नाही म्हणून त्यांनी मोडतोड केलेली आहे. नांदेडच्या रुग्णालयासाठी 8.33 कोटी रुपये दिले आहेत. कस्तुरबा कॅन्सर रुग्णालयासाठी 9 कोटी, नागपूर वैद्यकीय महाविद्यालयाच्या लायब्ररीसाठी 2 कोटी दिले आहेत.

सभापती महोदय, राज्य शासनामध्ये मोठी डिस्क्रेपन्सी आहे. लायब्ररीयन हे पद वैद्यकीय महाविद्यालयात असते आणि हॉस्पिटलमध्ये सुध्दा असते. हॉस्पिटलमध्ये काम करणाऱ्या लायब्ररीयनला वैद्यकीय महाविद्यालयातील लायब्ररीयनपेक्षा 2 हजार रुपये पगार कमी दिला जातो. दोन्ही ठिकाणची पदे सारखीच आहेत. मग त्यांच्यामध्ये डिस्क्रेपन्सी का ठेवण्यात आली आहे ? राज्यामध्ये 18 लायब्ररीयन्स आहेत, जे गेली 10 वर्षे वेतनातील तफावत अनुभवत आहेत. या संदर्भातील फाईल अर्थ खात्यातून 3 वेळा परत आली आहे. एकदा तत्कालीन अर्थ मंत्री श्री.सुनील तटकरे असताना फाईल परत आली होती. त्यानंतर माननीय उप मुख्यमंत्र्यांनी अर्थ खात्याचा पदभार सांभाळल्यानंतर पुन्हा एकदा अर्थ खात्यात ही फाईल गेली होती. त्यामुळे या मुद्याकडे मंत्री महोदयांनी लक्ष दिले तर बरे होईल.

सभापती महोदय, पर्यावरणाचा विषय कोणत्या तरी सन्माननीय सदस्यांनी मांडला होता. या अर्थसंकल्पात पर्यावरणाचा विचार केलेला नाही. नॉईज पोल्यूशन, सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट, बायो-मेडिकल वेस्ट हे तीन महत्वाचे विषय आहेत. या विषयांकडे शासन मुळीच पहात नाही. सन्माननीय राज्यमंत्री श्री.सचिन अहिर यांनी ई-वेस्टवर चर्चा करीत असताना त्या बाबतचा प्लान्ट उभा केला जाणार आहे, त्यामुळे संगणकामुळे जो ई-वेस्ट आहे त्याबाबत काही तरी उपाययोजना सुचविल्याचे दिसून येईल, असे सांगितले होते. पण दुर्दैवाने यासाठी या अर्थसंकल्पात कोणतीही उपाययोजना दिसून आली नाही.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पात 'पर्यावरण संतुलित ग्रामविकास अभियान' या कार्यक्रमासाठी 200 कोटींची तरतूद प्रस्तावित केलेली आहे. मागे एकदा मंत्री महोदयांनी सांगितले होते की, शासनाचा टेरी या संस्थेबरोबर करार झालेला आहे. ओशनोग्राफीचे लोक

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KTG/

डॉ.दीपक सावंत....

आलेले आहेत, त्यामुळे समुद्रावरील लाटेची उंची किती असेल हे आम्हाला कळणार आहे. त्यामुळे येणाऱ्या पावसाळ्यामध्ये लोकांना आम्हाला सूचना देता येतील. हे सर्व रेकॉर्डवर आहे. या सभागृहातच लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून नॉईज पोल्यूशनचा विषय मांडला होता त्यावेळी किती डेसिबलमुळे पोल्यूशन होते ते सांगण्यात आले होते. त्यावेळी 55 पेक्षा जास्त डेसिबल आवाज असेल तर प्रदूषण होते, साधी गाडी गेली तरी 55-56 डेसिबल इतके नॉईज पोल्यूशन होते असे सांगण्यात आले होते. मग नॉईज पोल्यूशनचे निकष कधी तरी बदलले पाहिजे की नाही ? वाहनांची संख्या किती तरी पटीने वाढली असल्यामुळे प्रदूषणाचे निकष बदलावे लागतील. अनेक बिल्डिंगचे बांधकाम करण्यापूर्वी पायलिंगचे काम केले जाते. त्यामुळे लोकांना त्रास होतो. सभापती महोदय, त्यावेळी आपणच चेअरवर होता. त्यावेळी मंत्री महोदयांनी असे आश्वासन दिले होते की, अशा प्रकारचे नॉईज पोल्यूशन करणाऱ्या बिल्डिंगसंबंधी कारवाई केली जाईल. पण आजही सगळीकडे निर्धोकपणे बांधकाम सुरु आहे. त्यापैकी कोणावरही कारवाई झालेली नाही. या अर्थसंकल्पात याचा कोठे तरी विचार होईल असे वाटले होते.

सभापती महोदय, या सदनाचे माजी सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांनी या सभागृहात सॉलिड वेस्ट मॅनेजमेंटबद्दल अनेकदा आपली मते मांडली होती. परंतु त्यांच्या सूचनांची सुध्दा शासनाने दखल घेतलेली नाही. बायो-वेस्ट मॅनेजमेंटसाठी प्रत्येक हॉस्पिटलमध्ये प्लान्ट उभा केला जाणार होता, पण तेही शासनाने केलेले नाही.

सभापती महोदय, शासनाने स्टॅम्प डयूटीबाबत निर्णय घेतला आहे, त्या विषयाकडे मी येतो. या विषयासंबंधी या अर्थसंकल्पात मोठी तरतूद केलेली आहे. स्टॅम्प डयूटीचा होत असलेला तोटा भरुन काढण्यासाठी शासनाने जे पाऊल उचलले आहे त्यामुळे दक्षिण मुंबईतील 50 हजार प्रॉपर्टीज प्रभावित होणार आहेत, असे आमचे मत आहे. दक्षिण मुंबईतील जवळपास सगळया प्रॉपर्टीज पागडी सिस्टिमच्या आहेत. शासनाने 200 रुपये चौ.फूट याप्रमाणे रेसिडेंशिअल प्रॉपर्टीजसाठी, 2 हजार रुपये कमर्शिअल प्रॉपर्टीजसाठी स्टॅम्प डयूटी सुरु करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. मुंबईत ज्या 16 हजार सेसच्या इमारती आहेत त्यांची अवस्था वाईट आहे. त्या इमारतींसाठी शासनाने कोणतीही तरतूद केलेली नाही.

यानंतर श्री.शिगम....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ 13:05

डॉ.दीपक सावंत...

सभापती महोदय, स्टॅम्प ड्युटीमध्ये वाढ केली तर काय होईल ? स्टॅम्प ड्युटी लागणारे व्यवहार कमी होतील आणि सर्व डिलिंग हे अंडर टेबल होतील. परिणामी राज्याचा महसूल बुडेल, कर चुकवेगिरीला प्रोत्साहन मिळेल. म्हणून या स्टॅम्प डयुटीच्या बाबतीत शासनाने पुनर्विचार करावा अशी माझी विनंती आहे. आज दक्षिण मुंबईतील लोकसंख्या अतिशय कमी झालेली आहे. पूर्वी या भागात दाटीवाटीने लोक राहात होते. जवळ जवळ 80 टक्के लोक भाड्याच्या घरात रहात होते. येथील रेसिडेन्शियल एरिया कमी झालेला आहे याची कल्पना आपल्याला मतदारसंघातील लोकसंख्येवरुन येते. या ठिकाणी राहाणारे लोक तेथे टिकावेत असे वाटत असेल तर स्टॅम्प ड्युटीच्या बाबतीत शासनाने पुनर्विचार करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, औषधांच्या रेट कॉन्ट्रॅक्ट संबंधीचा जी.आर. सार्वजनिक आरोग्य विभागाने काढावा की वैद्यकीय शिक्षण विभागाने काढावा असा प्रश्न दोन विभागामध्ये निर्माण झालेला आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाचे मंत्री महोदय श्री. सुरेश शेट्टी यांनी शेवटी सांगितले की हे रेट कॉन्ट्रॅक्ट आम्हीच करणार. या दोन विभागातील भांडण अजून मिटलेले नाही. 6 औषधांचे दर करार केलेले आहेत. त्या दर करारानुसार कफ सिरप घेतलेले आहे. जवळ जवळ 10 कोटीची ऑर्डर दिलेली आहे. आपल्याला फक्त काही लाखाच्या कफ सिरपची आवश्यकता असते. सार्वजनिक आरोग्य खात्याने अमुक अमुक घटक असलेल्या औषधांची मागणी केली तर त्याप्रमाणे रेट कॉन्ट्रॅक्ट केले जात नाही. आपले प्रोडक्टस् खपविण्यासाठी कंपनी अधिका-यांना गाठते आणि अधिका-यांनी मागणी केल्यानंतर वैद्यकीय विभागा मार्फत रेट कॉन्ट्रॅक्ट दिले जाते. सभापती महोदय, एकाच प्रकारचे सिरप असलेल्या 4 बाटल्या मी आपणाकडे पाठवितो. त्या बाटल्या आपण पहा, म्हणजे कशा प्रकारे पैशाची लूट होते हे आपणास समजेल. आपण औषधासाठी कितीही पैशाची तरतूद केली तरी अधिकारी आणि पुरवठादार यांच्या संगनमतामुळे हे पैसे गरिबांपर्यन्त पोहोचत नाहीत. "कफ एक्पोरण्ट" या बाटलीची किंमत 30 रुपये आहे. या औषधातील एक घटक बदलला की त्या बाटलीची किंमत 40 रुपये होते आणि एक घटक कमी केला की किंमत 27 रुपये होते. अशा प्रकारे ही औषधांची खरेदी होत असते. सध्या वैद्यकीय शिक्षण खात्याचे संचालक चौकशीच्या भोव-यात आहेत. एसीबी कडून त्यांची चौकशी सुरु आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत....

सभापती महोदय, व्हेण्टिलेटरचा पुरवठादार कोण होता याची माहिती मंत्री महोदयांनी घ्यावी. कुणीतरी वीर नावाचा पुरवठादार होता. आपण काही आमदारांचा भूतकाळ पाहिला तर वीर कंपनी कुणाची होती हे आपणास समजले. व्हेण्टिलेटरसाठी कुणाच्या दबावाखाली ऑर्डर दिली गेली, 16 हजार कोटी रुपयाचा भ्रष्टाचार कसा झाला याची देखील मंत्री महोदयांनी माहिती घ्यावी. अधिकारी साधे आणि सरळ नसतात. त्यांना राजकीय पाठिंबा मिळालेला असतो.

सभापती महोदय, शालेय, माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि तंत्रशिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांची संख्या देशामध्ये खूप वाढलेली आहे. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक कर्ज घेऊन शिकण्याची सोय आहे असे एकीकडे सांगितले जाते. परंतु अशा प्रकारे कर्ज विद्यार्थ्यांना खरोखरच मिळते काय ? मी या संदर्भातील आकडेवारी देतो. गेल्या 10 वर्षामध्ये 3,43,630 विद्यार्थी संख्या होती ती आज 5,49,432 इतकी झाली आहे.

....नंतर श्री.गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MMP/ प्रथम श्री. शिगम 13:10

डॉ.दीपक सावंत....

संपूर्ण भारताची गेल्या वर्षात 32 हजार 366 कोटी रुपयांचे शैक्षणिक कर्ज दिले गेले. यात किती विद्यार्थ्यांनी फायदा घेतला. आपण कितीही सांगत असलो तरी विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज सहजा सहजी मिळत नाही. विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज रु. 4 लाखापर्यंत उपलब्ध होते. उच्च शिक्षण शिकविल्या जाणाऱ्या कोणत्या महाविद्यालयाची फी 4 लाख रुपये आहे याची मला माहिती द्यावी. विद्यार्थ्याने वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतला तर त्यास कमीत कमी 4.50 लाख रुपयांची फी भरावी लागते. विद्यार्थ्यांनी इंजिनिअरींग महाविद्यालयात प्रवेश घेतला तर त्यास कमीत कमी 4.50 लाख रुपयांची फी भरावी लागते. शैक्षणिक कर्ज 4 लाख रुपयांचा वर एक रुपया जास्तीचे झाले तर विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज मंजूर होत नाही., शैक्षणिक कर्जाची मर्यादा थोडी वाढवून उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा अशी मी माननीय अर्थ राज्यमंत्र्यांना विनंती करतो.

सभापती महोदय, माझ्याकडे ॲन्टी रेबीज व्हॅक्सीनचे शेवटचे एक परिपत्रक आहे. ॲन्टी रेबीज व्हॅक्सीन राज्यात खूप मोठया प्रमाणात तुटवडा होता. त्यामुळे ॲन्टी रेबीज व्हॅक्सीन तीस-तीस टक्के तीन कंपन्यांकडून खरेदी करण्याचा आरोग्य विभागाने निर्णय घेतला. परंतु हे व्हॅक्सीन खरेदी करण्याचा आवाका एवढा मोठा होता की, त्यामुळे एका चायनीज कंपनीला इन्ट्रोडयूस केले गेले. ही चायनीज कंपनी कशी आहे ? या चाजनीज कंपनीने सदरचा पुरवठा करण्यासाठी एक एजन्ट नेमला. ज्या पुरवठादारास शासनाने काळया यादीत टाकले होते. त्याचे सॅम्पल पुन्हा पास केले आणि त्यास ऑर्डर देण्यात आली. याबाबतीत शासनाने अतिशय काळजीपूर्वक लक्ष घालावे अशी माझी विनंती आहे. या ठिकाणी बोलण्यासारखे अनेक मुद्दे आहेत. परंतु ते वेळे अभावी मी उपस्थित करु शकत नाही. मी शेवटी एवढेच सांगू इच्छितो की, हा अर्थसंकल्प तळागाळातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचेल की नाही याची मला माहिती नाही. माननीय अर्थ राज्यमंत्र्यांचे तरुण, तडफदार असे नेतृत्व त्यांच्या चेहऱ्यावरुन दिसून येते. अपण पुढच्या वर्षी पुन्हा मंत्री म्हणून याल त्यावेळी हेच प्रश्न तुमच्या समोर उपस्थित करीन की, या अर्थसंकल्पातील किती निधी राज्यातील शेवटच्या घटकापर्यंत गेला. या अर्थसंकल्पामध्ये सामान्य जनतेला देण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत असे काही सन्माननीय सदस्यांनी सभागृहात सांगितले. ज्यांची आरोग्याची काळजी घेतली नाही, पर्यावरणाची काळजी घेतली नाही, ज्यांच्या शिक्षणाची काळजी घेतली नाही,

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

या तीन मूलभूत गरजा असून त्याबाबतीत शासनाने कोणत्याही प्रकारची दखल या अर्थसंकल्पात घेतली नाही. तसेच आदिवासींना या शासनाने वाऱ्यावर सोडले. उद्योगाच्या बाबतीत देखील तशीच परिस्थिती आहे. उद्योगधंद्यांच्या बाबतीत गुजरात राज्याने खूप मोठी प्रगती केलेली आहे. परंतु उद्योगधंद्यात हे राज्या मागे पडले आहे. हा अर्थसंकल्प असमाधानकारक, असंतुलित आणि सर्वसामान्या माणसांना अस्वस्थ करणारा आहे असे सांगतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

----------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ MMP/ प्रथम श्री. शिगम 13:10

श्री. धनंजय मुंडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन्माननीय अर्थ राज्यमंत्री श्री. राजेंद्र मुळक यांनी 2011-12 या वर्षाचा अर्थसंकल्प या सभागृहाला सादर केला आहे, त्या अर्थसंकल्पावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. मी या सदनाचा सदस्य म्हणून आल्यानंतर हा पहिलाच अर्थसंकल्प आहे. माननीय अर्थ राज्यमंत्री सभागृहात अर्थसंकल्प सादर करीत होते, त्यावेळी त्यांचे संपूर्ण भाषण मी अतिशय काळजीपूर्वक ऐकले आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे.......

माननीय वित्त राज्यमंत्री श्री.राजेंद्र मुळक हे तरुणाईचे नेतृत्व आहे असा माझा त्यांच्याबद्दल एकूण समज आहे. ज्यावेळी ते अर्थसंकल्पीय भाषण करीत होते त्यावेळी मी काळजीपूर्वक त्यांचे भाषण ऐकत होतो आणि तरुणाईला न्याय मिळाला का याचा शोध घेत होतो. माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी आपल्या भाषणामध्ये शायरीच्या माध्यमातून कब्रस्तानचा उल्लेख केला असला तरी राज्यातील तरुणाईला आधार मिळाला आहे असे मला अर्थसंकल्पातून दिसून आले नाही.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी अतिशय चांगल्या पध्दतीने अर्थसंकल्पाचे समर्थन केले. त्यांच्या भाषणातून मला असे दिसून आले की, कितीही खराब धावपट्टी असली तरी चांगल्या गोलंदाजाचा सामना करताना चांगल्या फलंदाजाची जी तारांबळ उडते तशाच प्रकारची तारांबळ माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांची झाली होती.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनीही तोच प्रयत्न केला. शेवटी त्यांना एक वाईड बॉल मिळाला आणि त्या वाईड बॉलवर त्यांनी षटकार लगावला. मला या ठिकाणी हे सांगावयाचे आहे की, राज्याचा अर्थसंकल्प मांडत असताना तरुण तडफदार वित्त राज्यमंत्र्यांनी महाराष्ट्रातील सुशिक्षित बेरोजगारांना नेमके काय दिले? युवक कल्याण आणि क्रीडा विभागासाठी केवळ 25 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. माननीय सदस्या ॲड.उषा दराडे यांनी सांगितले की, युवा धोरण तयार होत आहे.

सभापती महोदय, नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात मी आमदार पदाची शपथ घेतली. त्या अधिवेशनात आम्ही नियम 260 अन्वये युवा धोरणाविषयी चर्चा करणारा प्रस्ताव सभागृहात मांडला होता. युवा धोरणाविषयी सविस्तर चर्चा झाली. युवा कल्याणासाठी काय केले पाहिजे यासंबंधी ऊहापोह झाला. सरकार युवा धोरणाविषयी कोणती पावले उचलणार आहे यासंबंधी सभागृहात दिग्दर्शन झाले. त्या प्रस्तावावरील चर्चेनंतर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील तरुण नेतृत्वाने माननीय मुख्यमंत्र्यांकडे युवा सनद दिली. आज सहा महिन्यांचा काळ उलटला, परंतु अद्याप युवा धोरण जाहीर झालेले नाही. युवक कल्याण आणि क्रीडा विभागासाठी 25 कोटी रुपये तरतूद केल्यामुळे न्याय मिळाला आहे असे मला वाटत नाही. आज महाराष्ट्रात जवळजवळ 37 लाख सुशिक्षित बेरोजगार आहेत. गेली 12 वर्षे आघाडी सरकार या राज्यात सत्तेवर आहे. 12 वर्षे ठराविक पक्षाची विचारधारा घेऊन या सभागृहात अर्थसंकल्प मांडला गेला आहे. 12 वर्षात

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ 13:15

श्री.धनंजय मुंडे.......

एक नवीन पिढी या सभागृहात प्रवेशकर्ती झाली आहे. या नवीन पिढीने असा अर्थसंकल्प पाहिल्यानंतर त्यांची निराशा होण्याशिवाय गत्यंतर नाही.

शासनाने सुशिक्षित बेरोजगारांना न्याय दिलेला नाही. माझी या ठिकाणी शासनाला विनंती आहे की, गोवा राज्याने सुशिक्षित बेरोजगारांना बेरोजगार भत्ता देण्याचे जाहीर केले आहे. महाराष्ट्र राज्यात कधी काळी बेरोजगारांना भत्ता दिला जात होता. माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत हे सातत्याने सुशिक्षित बेरोजगारांना भत्ता देण्याची मागणी करीत आहेत, परंतु त्या मागणीकडे शासन लक्ष देण्यास तयार नाही. माननीय वित्त राज्यमंत्री हे तरुण तडफदार आहेत. माननीय उप मुख्यमंत्री हे तरुण तडफदार आहेत. त्या दृष्टीने त्यांच्याकडे पाहिले जाते.

नंतर 2 ओ.1..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. रामनाथ मोते )**

श्री. धनंजय मुंडे .........

पण एक धोरणाचे प्रतिबिंब म्हणून अर्थसंकल्पात त्याचा विचार होणे आवश्यक आहे. आज राज्यात 37 लाख बेरोजगार आहेत पण त्यांचा अर्थसंकल्पात कुठेही विचार होत नसेल, त्यांना न्याय मिळत नसेल तर हा देश तरुण देश म्हणून पुढे येत असताना आपल्या राज्यातील तरुणाई त्यात कोठे असेल याचाही विचार करणे गरजेचे आहे. क्रीडा धोरणासाठी शासनाने 25 कोटीची तरतूद या अर्थसंकल्पात केलेली आहे. मागील वर्षीच्या अर्थसंकल्पात शासनानेच सांगितले होते की, प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी एक क्रीडांगण दिले जाईल पण मंत्री महोदयांनी उत्तरातून सांगावे की, राज्यात किती ठिकाणी क्रीडांगण झालेले आहेत ? अशा परिस्थितीत यावर्षी जी 25 कोटीची तरतूद केली त्याचा किती उपयोग होईल, याबद्दल शंका वाटते. सभागृहात भाषण करताना सांगितले की, कबड्डी, व्हॉलिबॉल आणि कुस्तीचे सामने भरविण्यासाठी प्रत्येकी 50-50 लाख रुपयाची तरतूद करण्यात आली आहे. मला या निमित्ताने शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, सभागृहात देखील अनेक सन्माननीय सदस्यांना माहिती आहेच की मोठमोठ्या राष्ट्रीय व राज्य स्तरावरील स्पर्धा भरविण्यासाठी 50 ते 60 लाख इतका खर्च येतो. त्यासाठी शासनाने फक्त 50 लाखाची तरतूद केली ती किती पुरी पडणार आहे, हे समजत नाही. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी हिंद केसरी श्री. माने यांचे स्मारक उभे करण्यासंबंधीचा मुद्दा उपस्थित केला पण भविष्यात असे हिंद केसरी राज्यात आणखी तयार होण्यासारखी परिस्थिती मात्र अर्थसंकल्पात दिसत नाही, हे दुर्दैव आहे. याचाच अर्थ असा की, शासन दाखवायचे एक आणि करायचे दुसरे असा प्रकार करते की काय अशी मला शंका वाटते.

श्री. भाई जगताप : महोदय, माझ्या नावाचा उल्लेख झाला म्हणून स्पष्टीकरण वगैरे करणार नाही पण एवढे मात्र मान्य करावे लागेल की, देश स्वतंत्र होऊन 62 वर्षे झाल्यानंतर प्रथमच शासनाने क्रीडा धोरण जाहीर करण्याचा मनोदय व्यक्त केला आहे. धोरणात जे असेल ते सभागृहासमोर येईलच पण कुस्ती, कबड्डी सारख्या मैदानी खेळांचा प्रथमच त्यात समावेश करण्यात आला व त्यासाठी विशेष निधी सुध्दा राखून ठेवला आहे.

.......2......



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे : महोदय, शासनाने यासंबंधीचे नियोजन प्रथमच केले त्याबद्दल मी शासनाचा आभारी आहे, पण पुढे काय विचार आहे हे समजले पाहिजे. आज राज्यातील 7 हजार लघु उद्योग आणि 1200 मोठे उद्योग बंद पडलेले आहेत. त्यामुळे या घडीला 5.50 लाख बेरोजगारांची संख्या नव्याने वाढलेली आहे. या परिस्थितीचा विचार केला नाही तर ग्रामीण भागात जी ढाबा संस्कृती वाढत चाललेली आहे त्याचा परिणाम म्हणून हे बेरोजगार वाममार्गाला जाण्याचीच शक्यता जास्त दिसते. म्हणून अर्थसंकल्पात बेरोजगार तरुणांना न्याय देण्याची भूमिका घेणे आवश्यक होते.

अर्थसंकल्पामध्ये सुरुवातीलाच कृषी विषयी सांगताना शेतकऱ्यांना 50 हजारापर्यंतचे पीक कर्ज बिनव्याजी आणि त्यानंतर 3 लाखापर्यंतच्या कर्जावर फक्त दोन टक्के व्याज आकारण्याचा निर्णय घेतला आहे. मी एका जिल्हा मध्यवर्ती बँकेचे उदाहरण सांगू इच्छितो की, त्या बँकेत एकूण 52 लाख शेतकरी सभासद आहेत. त्यातील 37 लाख शेतकऱ्यांकडे कर्जाची थकबाकी आहे, 15 लाख शेतकऱ्यांनाच या सवलतीचा फायदा होणार आहे. हीच अवस्था संपूर्ण राज्यातील जिल्हा सहकारी बँकांची आहे असे म्हटले तरी चालेल. म्हणून शासनानेच यासंबंधीची माहिती घ्यावी की किती शेतकऱ्यांना या योजनेचा फायदा होऊ शकेल.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे...

म्हणून माझी सभागृहाला विनंती आहे की, यामध्ये शासनाने जो काही निर्णय घेतलेला आहे त्या निर्णयामध्ये जर थोडी शिथिलता आणली तर नक्कीच त्याचा उपयोग शेतक-यांना व शेतक-यांच्या मुलांना होऊ शकेल. आज सगळयात मोठी बेरोजगारी शेतक-यांच्या मुलांची आहे. आज सर्वात मोठा उद्योग देणारे आणि हाताला काम देणारे साधन कोठले असेल तर ते शेती आहे. त्यामुळे या दोन्ही गोष्टींचा विचार या अर्थसकंल्पात होणे आवश्यक आहे. मी मराठवाडयाचे नेतृत्व करीत आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी सांगितले आहे की, या अर्थसंकल्पात सर्व विभागाचा समतोल विकास केला गेला आहे. या अर्थसंकल्पात विभागवार न्याय दिला गेला नाही, पक्ष म्हणून नाही, आमदार म्हणून नाही एवढेच नाही तर सत्तेत जे सोबत आहेत त्यांना सुध्दा न्याय दिला गेला नाही. यासंदर्भातील चर्चा बाहेर सुरु आहे. मी बीड जिल्हा परिषदेचा उपाध्यक्ष असल्यामुळे माझ्या जिल्हापरिषदेचा तीन वेळा अर्थसंकल्प मांडण्याची संधी मला प्राप्त झाली होती. या राज्याला जर सर्वच जिल्हयामधून व सर्वच मतदार संघातून महसूल शासनाला मिळत असेल तर राज्य शासनाने प्रत्येक जिल्हयासाठी व प्रत्येक मतदार संघासाठी विकास निधी समान देण्याची आवश्यकता आहे. परंतु या विकास निधीचे समान वाटप झालेले नाही.

सभापती महोदय, मला एवढेच सांगावयाचे आहे की, जर अशा प्रकारे असमतोल वाढत गेला तर अर्धा महाराष्ट्र वंचित राहील. यामध्ये मराठवाडा, विदर्भ, खान्देश, कोकणचा मतदार संघ समान विकास निधी पासून वंचित राहिलेले आहेत. सत्ताधारी आमदार म्हटले की, विकास आणि विरोधी आमदार म्हटले की, विकास नाही अशी भूमिका आम्ही चालू देणार नाही. विधानसभा सदस्यांच्या मतामुळेच मी या ठिकाणी आमदार म्हणून आलेलो आहे. अर्थसंकल्पात सर्व जिल्हयांना व सर्व लोकप्रतिनिधींना समान न्याय दिला गेला पाहिजे अशी भूमिका घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासन हे वर्ष पर्यटन वर्ष म्हणून साजरे करणार आहे. पर्यटनामध्ये अनेक तीर्थस्थळाला विशेष निधी देण्यात आलेला आहे. अष्टविनायकाला 10 कोटी रुपयांचा निधी देण्यात आलेला आहे. तसेच इतर संस्थांनाना सुध्दा विशेष निधी दिलेला आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे...

प्रकृतीने देशातील एकूण 12 ज्योतिर्लिंगापैकी महाराष्ट्राला 5 ज्योतिर्लिंग दिलेली आहेत. या शासनाने शंकराला सोडले आणि गणपतीला धरले आहे. शंकरावर आपण कानाडोळा केलेला आहे परंतु शंकरालाही तिसरा डोळा आहे आहे हे आपण विसरु नका. महाराष्ट्रातील जी 5 ज्योतिर्लिंग आहेत त्यांना न्याय दिला पाहिजे व त्यासाठी आर्थिक तरतूद करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, अर्थसंकल्पात विभागवार न्याय दिला गेला आहे असे विचार ब-याच सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेले आहेत.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे......

सभापती महोदय, मी आपल्याला सांगू इच्छितो की, मराठवाडयातील रेल्वे मार्गाचा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. तीन वर्षापूर्वी महाराष्ट्र सरकारने केन्द्र सरकारला अर्धा खर्च करण्याची हमी दिली होती. दोन वर्षे होऊन गेली परंतु परळी - बीड - नगर या रेल्वे मार्गासाठी या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये महाराष्ट्र सरकारच्या हिश्याच्या पैशाची तरतूदच करण्यात आली नाही.

सभापती महोदय, मराठवाडयाच्या दृष्टीने आणखी काही महत्वाचे प्रश्न आहेत. उदगीरला दूध भुकटीचा प्रकल्प असून त्यासाठी तरतूद करण्यात आलेली नाही.सन्माननीय मंत्री श्री प्रकाश सोळंके यांना मी सांगू इच्छितो की, आपल्या जिल्हयात सीताफळावर प्रक्रिया करण्यासाठी चार वर्षापूर्वी प्रकल्प जाहीर करण्यात आला होता. या ठिकाणी खानदेशातील केळीचा आणि नाशिक जिल्हयातील कांद्याचा उल्लेख अर्थसंकल्पात करण्यात आला होता परंतु बीड जिल्हयातील सीताफळावर प्रक्रिया करण्याच्या प्रकल्पासाठी एक रुपयांची तरतूद देखील या वर्षीच्या अर्थसंकल्पात करण्यात आलेली नाही. सन्माननीय सदस्य श्री विनायकराव मेटे यांना मी सांगू इच्छितो की बीड जिल्हयाने आपल्याला भरभरुन दिलेले आहे. बीड जिल्हयाने आपल्या पक्षाला पाच आमदार दिलेले आहेत परंतु पाच आमदार देऊन सुध्दा बीड जिल्हयाची अवस्था अत्यंत वाईट आहे.

सभापती महोदय, स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय हे आशिया खंडातील सर्वात जुने रुग्णालय आहे. त्या ठिकाणी महाविद्यालय सुध्दा आहे. परंतु ते मोडकळीस आलेले आहे. औरंगाबादच्या रुग्णालयासाठी तरतूद केली आहे. अंबेजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय हे आशिया खंडातील सर्वात जुने रुग्णालय असून त्यासाठी एक रुपयाची तरतूद देखील या अर्थसंकल्पात करण्यात आलेली नाही.सन्माननीय सदस्य श्री विनायकराव मेटे यांना मी सांगू इच्छितो की, सरकारकडून निधी मिळविण्यासाठी आपणही काही प्रयत्न केला पाहिजे.या रुग्णालयासाठी 15 कोटी रुपयांची गरज आहे. तेथील रुग्णालय मोडकळीस आलेले आहे आणि महाविद्यालय बंद पडण्याच्या मार्गावर आहे. अंबेजोगाई येथील सर्वात जुने रुग्णालय शासनाच्या दुर्लक्षामुळे जर बंद पडणार असेल तर ते शोभा देणारे नाही एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो..

सभापती महोदय, मराठवाडयातील औरंगाबाद जवळ अंजिठा येथे जगप्रसिध्द लेण्या आहेत. त्यासाठी कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. महाराष्ट्र शासन पर्यटन वर्ष साजरे



श्री.धनंजय मुंडे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करीत आहे. परंतु अजिंठयाच्या लेण्यासाठी कोणतीही तरतूद केलेली नाही. अशा अनेक दुर्लक्षित बाबी आहेत त्याकडे अर्थसंकल्पात लक्ष न दिल्यामुळे त्या आणखीनच दुर्लक्षित होतील असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, चंद्रपूर शहराला 500 वर्षे झाल्यामुळे 250 कोटी रुपये देण्यात आले आहेत असा उल्लेख अर्थसंकल्पाच्या भाषणात करण्यात आला आहे. त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो महाराष्ट्रातील ऊर्जा निर्मितीचे सर्वात मोठे स्त्रोत चंद्रपूर जिल्हा आहे त्याचबरोबर सर्वात जास्त प्रदूषण असलेले राज्यातील हे शहर असून त्या शहराच्या विकासासाठी तीन टप्यामध्ये 500 कोटी रुपये देण्यात येणार आहेत. त्याबद्दल मी राज्य शासनाचे अभिनंदन करतो परंतु परळी,खापरखेडा, एकलेहरा , भुसावळ या ठिकाणी सुध्दा वीज निर्मिती होत असते त्यासाठी मात्र तरतूद केलेली नाही. ज्याप्रमाणे चंद्रपूर शहराच्या विकासासाठी या अर्थसंकल्पात तरतूद केलेली आहे त्या प्रमाणे परळी, खापरखेडा, एकलेहरा, भुसावळ इत्यादी जी शहरे वीज निर्मिती करणारी आहेत त्या शहरातील प्रदूषण कमी करण्यासाठी तसेच त्या शहराचा विकास करण्यासाठी तरतूद करावयास पाहिजे होती .

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे....

सभापती महोदय, बीड हा अतिशय महत्वाचा जिल्हा असून तो ऊस तोडणी करणाऱ्या कामगारांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो. अशा या जिल्ह्याला महाराष्ट्रातील दुसऱ्या क्रमांकावरील ऊस पिकविणारा जिल्हा म्हटले जाते. उभ्या महाराष्ट्राला पेंड आणि सरकी पुरवू शकणारा जिल्हा अशी या बीड जिल्ह्याची ओळख निर्माण झाली आहे. या जिल्ह्यामध्ये 30 लाख क्विंटल कापसाचे उत्पादन झाले, त्यापैकी 25 लाख क्विंटल कापसावर या जिल्हयामध्ये प्रक्रिया होते. या जिल्ह्यामध्ये 200 ऑईल मिल असून महाराष्ट्रासह जवळ जवळ 25 राज्यांना सरकी आणि पेंड पुरवू शकतो एवढी त्यामध्ये क्षमता आहे. या अर्थसंकल्पामधून आपण अशा प्रकारच्या छोटया छोटया उद्योगांना मदत करणार आहात, त्याबाबतचा निर्णय लवकर होणे आवश्यक आहे. अशाप्रकारची धोरणे तयार होईपर्यंत आपली पैसे देण्याची कालमर्यादा संपून जाता कामा नये. बीड जिल्ह्यामधील ऑईल मिल, तेल बिया प्रक्रिया उद्योगासंबंधी नवीन धोरण निर्माण करुन त्यामध्ये युवकांना पुढे आणण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत.

सभापती महोदय, हा 58 कोटी रुपये शिलकीचा अर्थसंकल्प असल्याचे म्हटले आहे. मी केलेल्या सूचना जर अंमलात आणल्या असत्या, तशी उपाय योजना आपण केली असती तर ही 58 कोटींची शिल्लक आणखीन वाढलेली आपल्याला दिसली असती. आपल्या राज्यामध्ये दोन अंकी आकडयाच्या लॉटरीला बंदी आहे. महाराष्ट्रात राजश्री टर्मिनलव्दारे विक्री होत असलेल्या गोवा आणि सिक्कीम राज्यातील लॉटरींना दररोज 35 सोडत काढण्याची परवानगी आहे. एका सोडतीसाठी शासनाला 50 हजार रुपयांचा महसूल मिळतो. प्रत्यक्षात एका सोडतीमध्ये एबीसीडी अशाप्रकारच्या वेगवेगळया कॅटेगरी केल्या जातात. यामध्ये मुख्य असलेल्या सोडतीच्या 30 उपसोडती केल्या जातात. त्यामुळे शासनाचा रोजचा 5 कोटी रुपयांचा महसूल बुडत आहे. पर प्रांतियांच्या लॉटरीमधून कोटयावधी रुपयांची कर चुकवेगिरी होत आहे. शासनाच्या वित्त विभागाने 21 आणि 28 जानेवारीला दोन परिपत्रके काढली असून अनधिकृतपणे लॉटरी तिकिटांची विक्री केली जात असल्याची कबूली देण्यात आली आहे. या बाबत योग्य ती काळजी घेऊन या कर चुकवेगिरी करणाऱ्यांवर कारवाई केली असती तर दररोजचे 5 कोटी या प्रमाणे किती कोटी रुपयांचा कर वाचला असता?

DGS/ MMP/

श्री. धनंजय मुंडे....

सभापती महोदय, या ठिकाणी ग्राम विकास आणि पर्यावरण विभागाच्या योजनेसाठी 200 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील लोकप्रतिनिधी म्हणून मी या तरतुदीचे नक्कीच समर्थन करतो व अभिनंदन करतो. परंतु त्याचबरोबर मला हे देखील सांगितले पाहिजे की, हा 200 कोटींचा निधी खूपच अपूरा पडत आहे. आपली ही सुरुवात चांगली आहे म्हणून मी तिचे अभिनंदन केले. माननीय राज्यमंत्री श्री. राजेंद्र मुळक साहेबांनी अर्थसंकल्प मांडीत असतांना "कब्रस्तान जा रहे थे" अशाप्रकारचा एक शेर ऐकविला. परंतु हा अर्थसंकल्प पाहिल्या नंतर हा शेर मंत्री महोदयांना दुसरीकडे कुठेतरी म्हणावयाचा असावा असे मला वाटते. मी शेवटी या अर्थसंकल्पाच्या बाबतीत एवढेच सांगतो की, या शासनाकडून महाराष्ट्रातील जनतेची या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून बेवफाई झालेली आहे. या निमित्त मी एक गालीबचा शेर आपणास ऐकवतो.

"ए दिले नादान तुझे हुआ क्या है,
आखिर इस दर्द की दवा क्या है,
हमको उनसे है वफा की उम्मीद,
जो नही जानते वफा क्या है !"

अशा प्रकारचा तुमच्या बाबतीत महाराष्ट्रातील जनतेचा समज झालेला आहे. त्यामुळे हा अर्थसंकल्प महाराष्ट्राच्या जनतेच्या उपयोगी पडणारा नाही एवढे सांगून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

----

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषाताई दराडे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, प्रथम मी याठिकाणी माननीय वित्तमंत्र्यांनी जो अर्थसंकल्प सादर केलेला आहे, त्याचे समर्थन करते. तसेच मला येथे एक भावना व्यक्त करावयाची आहे. आमच्या ग्रामीण भागामध्ये एक म्हण आहे की,"स्वत:च्या डोळयातील मुसळ दिसत नाही पण दुसऱ्याच्या डोळयातील कुसळ दिसते." याठिकाणी आमचे छोटे बंधू सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे साहेब म्हणाले की, "आखिर इस दर्द की दवा क्या है," तर "यह अर्थसंकल्प ही तो दर्द की दवा है"

श्री.धनंजय मुंडे (खाली बसून) : आपको तो मालूम ही नहीं की वफा क्या है.

ॲड.उषाताई दराडे : आपको तो वफा दिखती ही नही है क्योंकि आप को तो बेवफा देखने की आदत पड गई है.

सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी यांनी जेंडर बजेटचा उल्लेख केलेला आहे, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करते आणि त्यांच्या सूचनेचे स्वागत करते. याठिकाणी "विधिमंडळातील निवडक भाषणे व लेख - 1952 ते 1972" या श्री.बाळासाहेब भारदे यांनी लिहिलेल्या पुस्तकाला त्यावेळचे विधानसभेचे सन्माननीय अध्यक्ष श्री.बाबासाहेब कुपेकर यांनी प्रारंभिक लिहिलेले होते.माननीय श्री.बाबासाहेब कुपेकर साहेब असे म्हणतात की,"श्री.के.टी. गिरमे यांच्या "विधानसभा परिचय आणि कामकाज" या पुस्तकाला 1966 मध्ये माननीय श्री. बाळासाहेब भारदे यांनी लिहिलेल्या "पुरस्कारात्मक निवेदनातील लोकशाही संसदीय परंपरा, विधानसभेचे स्वरुप, कामकाज व महत्व इत्यादी विषयी मोजक्या शब्दामध्ये जे विचार व्यक्त केलेले आहेत ते त्यांच्या चिंतनशीलतेची उच्च अनुभूती देणारे, मनात घर करुन रहाणारे व कोणालाही अंतर्मुख व्हावयास लावणारे असल्याने ते येथे अधोरेखित केल्याशिवाय राहवत नाही." पुढे ते असे म्हणतात की, "लोकांची भलाई हीच आपली कमाई अशी भावना उभयपक्षी असेल तर लोकशाहीची पुण्याई ही कृतार्थ बनल्याशिवाय रहाणार नाही."

सभापती महोदय, याठिकाणी सदनासमोर अर्थसंकल्प येत असताना लोकशाहीमध्ये विरोधी पक्षाचे स्थान हे अनन्यसाधारण अशा प्रकारचे आहे आणि सत्ताधारी पक्षाचेही स्वत:चे असे एक स्थान आहे.सत्ताधारी पक्ष शासन चालवित असताना त्यामधील चुका दाखविणे परंतु त्या सकारात्मक दृष्टीकोनातून दाखविणे अशा प्रकारची भूमिका विरोधी पक्षाने खऱ्या अर्थाने पार पाडावयाची आहे."अर्थसंकल्पावरील भाषणे" या पुस्तकातील पहिल्या प्रकरणातील पान क्र.2 व 3 मध्ये माननीय श्री.बाळासाहेब भारदे पुढे असे म्हणतात की, "कर घेतल्याशिवाय कोणत्याही सरकारचा ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषाताई दराडे . . . .

कारभार चालणे शक्य नाही. फक्त हे कर गरीब लोकांवर पडू नयेत एवढीच दक्षता घ्यावयाची असते आणि या अर्थसंकल्पामध्ये देखील तशा प्रकारची दक्षता घेतलेली आहे. त्याचप्रमाणे पान क्र.5 वरील 1960 च्या भाषणामध्ये माननीय श्री.बाळासाहेब भारदे यांनी असे म्हटलेले आहे की, "संस्कृतमध्ये अनुनलेखोचोपेक्षा असा उल्लेख आहे." हे एक वचन आहे. याचा अर्थ असा की, जर एखाद्या गोष्टीचा उल्लेख केला नाही एवढ्यावरुन त्या गोष्टीची उपेक्षा केली आहे असे म्हणणे बरोबर नाही. म्हणून याठिकाणी विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांकडून असे वक्तव्य करण्यात आले की, शासनाने अमुक गोष्टीचा उल्लेख केलेला नाही, त्या गोष्टीचा उल्लेख केलेला नाही. त्या विषयी मला असे सांगावयाचे आहे की, याठिकाणी जीवनदायी योजनेचा उल्लेख झालेला नाही. म्हणजे जीवनदायी योजनेसाठी शासन पैसे देणार नाही असा त्याचा अर्थ होऊ शकत नाही. माननीय श्री.बाळासाहेब भारदेसाहेबांनी त्यावेळेला विरोधकांनी ज्या सूचना दिल्या होत्या त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले होते. तसेच या सगळया सूचना पुरोगामी आहेत असे म्हटले होते. शाहू, फुले,आंबेडकर यांच्या पुरोगामी महाराष्ट्राला तसेच संत ज्ञानेश्वर माऊली, तुकोबारायाच्या, नामदेवाच्या महाराष्ट्राला, समाज परिवर्तनाच्या कामाला चालना देणारे आहेत म्हणून आम्ही सर्व पुरागामी सूचना स्वीकारतो असे त्यावेळी त्यांनी सांगितले होते. माझा दैवावर विश्वास नाही पण यासाठी मला ॲप्रोप्रिएट शब्द आठवत नाही म्हणून मी सांगते की, मला याठिकाणी दुर्देवाने असे सांगावयाचे आहे की, विरोधकांकडून पुरोगामी स्वरुपाच्या सूचना, विधायक सूचना ज्या महाराष्ट्रामध्ये समाज परिवर्तनाचे काम घडवून आणतील अशा प्रकारच्या सूचना अपेक्षित होत्या. परंतु अर्थसंकल्पाच्या संबंधातील चर्चेच्या माध्यमातून विरोधकांकडून अशा प्रकारच्या कोणत्याही सूचना आलेल्या नाहीत.

**(सभापतीस्थानी -माननीय उप सभापती)**

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे....

श्री. वि. स. पागे यांनी 1952 ते 1978 या कालावधीत विधिमंडळात केलेल्या निवडक भाषणाच्या संग्रहातील पुस्तकात पृष्ठ क्रमांक 35 वर 1954 मध्ये त्यांनी अर्थसंकल्पावरील चर्चेत भाग घेताना असे म्हटले होते की,

"As regards the points whether this budget is a poor man's budget I can only refer to the long list of new items of expenditure i.e. given in the memorandum. I should say that a list of 388 items has been given here. Has anybody read the whole list and found out if there is any single item i.e. going to help the exploiters only?. I would like to know whom it is going to benefit. All these schemes are largely going to benefit the poor man, the villager and the common man. "

सभापती महोदय, हा अर्थसंकल्पाचा क्रायटेरिया आहे. संसदीय परंपरा, लोकशाहीची परंपरा आणि समिश्र अर्थ व्यवस्था, या संदर्भात खऱ्या अर्थाने आदर्श घ्यावयाचा असेल तर तो श्री. वि.स.पागे यांच्या भाषणातून घेता येतो. त्यानुसार हा अर्थसंकल्प लोकाभिमुख आहे काय तर तो लोकाभिमुख आहे. या अर्थसंकल्पामध्ये गरिबांना लागणाऱ्या वस्तुंवर कर लावलेला आहे काय, तर नाही लावला. चैनीच्या वस्तुवर कर लावला आहे की नाही म्हणजे शासनाला कर मिळावा याची दक्षता घेतली आहे काय तर ती घेतलेली आहे. सन्माननीय श्री. वि. स. पागे आणि सन्माननीय श्री. भारदे यांचे असे मत होते की, यापूर्वी झालेल्या सर्व मुख्यमंत्र्यांनी या महाराष्ट्राच्या कल्याणाचे हित जोपासण्याचा प्रयत्न केलेला आहे. मग ते श्री. यशवंतराव चव्हाण असतील, श्री. सुधाकरराव नाईक असतील, श्री. वसंतदादा पाटील असतील, श्री. वसंतराव नाईक असतील किंवा आता या देशाचे कृषी मंत्री श्री. शदर पवार असतील या सर्वांनी अर्थसंल्पाच्या माध्यमातून समाज परिवर्तनाची चळवळ कशी पुढे नेता येईल या दृष्टिकोनातून या महाराष्ट्रामध्ये सातत्याने प्रयत्न केलेले आहेत. त्याचप्रमाणे या वर्षीचा अर्थसंकल्प सुध्दा समाज परिवर्तनाच्या पुरोगामी चळवळीला दिशा देणारा अर्थसंकल्प आहे, असे माझे मत आहे आणि मला ते या ठिकाणी आवर्जून व्यक्त करावयाचे आहे. शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण भागातील सर्व घटक, युवक, कामगार, मध्यमवर्ग या सर्वांच्या हिताचा हा अर्थसंकल्प असल्यामुळे त्याला पाठींबा देणे मला गरजेचे वाटते.

..2..

ॲड. उषा दराडे.....

सभापती महोदय, या अर्थसंकल्पातील बोटावर मोजण्या इतक्या गोष्टीचा मी या ठिकाणी उल्लेख करणार आहे. सन 2009-2010 मध्ये महसुली जमा रुपये 86,910 कोटी रुपये होती. सन 2010-2011 मध्ये महसुली जमा 1 लाख 7 हजार 159 कोटी रुपये असून एकूण वाढ 23.03 टक्के आहे. राज्य योजनेमध्ये राज्याच्या वार्षिक योजनेचे आकारमान 41,500 कोटी रुपये एवढे आहे. त्यामध्ये अनुसूचित जाती उपयोजनेसाठी 4233 कोटी रुपये तसेच आदिवासी उपयोजनेसाठी 3696 कोटी रुपये तसेच जिल्हा सर्वसाधारण योजनेसाठी 4319 रुपये ठेवण्यात आलेले आहेत. या सर्व आकडयावरुन असे दिसते की, हा अर्थसंकल्प पुरोगामी अशा प्रकारचा आहे.

कृषी संलग्न क्षेत्रासाठी क्रांतिकारी निर्णय झालेला आहे. 50 हजार रुपयापर्यंतचे कर्ज शून्य टक्के व्याजाने आणि त्यापुढचे जे रेग्युलर कर्जाची परत फेड करतील त्यांना 2 टक्के व्याजाने 3 लाख रुपया पर्यंतचे कर्ज देण्यात येणार आहे. सभापती महोदय, कृषीच्या संदर्भात आणि महिलांच्या संदर्भात महाराष्ट्र राज्य हे पुरोगामी राज्य आहे. महाराष्ट्रातील शेतकरी या महाराष्ट्रालाच नव्हे तर देशातील जनतेला जगवणारा शेतकरी आहे. क्रांतिकारी उत्पादन करण्यामध्ये अग्रेसर आहे. या ठिकाणी थोडया वेळा पूर्वीच सन्माननीय सदस्य श्री. धनजंय मुंडे यांनी बीड जिल्ह्याचा उल्लेख केलेला आहे. कापूस उत्पादनामध्ये, ऊस उत्पादनामध्ये आणि रेशिम उत्पादनामध्ये बीड जिल्हा महाराष्ट्रात दुसऱ्या क्रमांकावर आहे. महाराष्ट्रात पांढरे सोने ज्याला म्हणतात तो कापूस मोठया प्रमाणात पिकलेला आहे. पण हे करत असताना काही गोष्टींकडे लक्ष देण्याची गरज आहे. शेतीची प्रगती करत असताना, शेतकऱ्याला सांभाळत असताना 7,200 कोटी रुपयांची केंद्र शासनाची कर्ज माफी असेल, महाराष्ट्र शासनाने दिलेली 6000 कोटी रुपयाची कर्ज माफी असेल, अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीच्या संदर्भात करण्यात आलेली 1000 कोटी रुपयाची मदत असेल या सगळया गोष्टी जशा पूरक आहेत त्याच पध्दतीने आणखी काही गोष्टींकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..3..



ॲड. उषा दराडे.....

सभापती महोदय, या सभागृहात मी वारंवार सेंद्रीय शेती विषयी प्रश्न उपस्थित केलेले आहेत.. या राज्यातील शेती यापेक्षा अधिक उपजाऊ करण्याची आवश्यकता आहे. आमच्याकडे श्री. जाधव नावाचा उदंड वडगावचा कार्यकर्ता आहे. या कार्यकर्त्यांने 6 एकर शेतीमध्ये ठिबक सिंचन पध्दतीने खरबूज लावले आहेत. त्याच्याकडे एकूण 30 एकर शेती आहे त्यापैकी फक्त 15 एकर वहितीखाली आहे. ठिबक सिंचन आणि सेंद्रीय शेतीच्या माध्यमातून त्याला प्रत्येक वर्षी एकरी साडे तीन लाख रुपये उत्पन्न मिळते. त्याचा उत्पादन खर्च एकरी 50 हजार रुपयापर्यंत गेलेला नाही. असे असताना त्याला एकरी तीन लाख रुपया पर्यंतचे उत्पन्न मिळत आहे.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे ....

एकरी 3 लाखाचे उत्पन्न जर त्यांना मिळू शकते तर आपण हा प्रयोग का करु शकत नाही ? मला स्वत:ला रासायनिक खते न वापरता सेंद्रीय खतावर ठिबक सिंचनामध्ये 3 एकर जमिनीमध्ये एकरी 3 लाख रुपयांचे केळीचे उत्पन्न मिळाले. मला सांगण्यास आनंद वाटतो की, त्यावर उष्णतेचा परिणाम झाला नाही, वाऱ्याचा परिणाम झाला नाही, अतिवृष्टीचा किंवा वादळवाऱ्याचा परिणाम झाला नाही, अवकाळी पावसाचा सुध्दा परिणाम झाला नाही. याचा अर्थ या महाराष्ट्रामध्ये सेंद्रीय शेती विषयीचे धोरण घेणे गरजेचे आहे. त्याचा उल्लेख मी वारंवार केलेला आहे. या ठिकाणी श्री. बाळासाहेब थोरात कृषी मंत्री असताना त्यांनी माझ्या एका प्रश्नाला असे उत्तर दिले होते की, आपली जी कृषी विद्यापीठे आहेत त्या विद्यापीठांमध्ये सेंद्रीय शेती हा विषय आणला जाईल आणि शाळांच्या अभ्यासक्रमामध्ये कृषी हा विषय आणला जाईल. अजूनपर्यंत हे अभ्यासक्रम तयार झालेले नाहीत. यासाठी शासनाने ताबडतोबीने एखादी कमिटी बनवावी आणि सेंद्रीय शेती हा विषय कृषी विद्यापीठांमध्ये व शेती हा विषय शालेय शिक्षणामध्ये कशा पध्दतीने आणता येईल या दृष्टीने गांभीर्याने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, आपली रोजगार हमी योजना ही अत्यंत क्रांतिकारी योजना आहे. ज्या वेळी महाराष्ट्रामध्ये रोजगार हमी योजना सुरु झाली त्या योजनेच्या संदर्भामध्ये महाराष्ट्राने आता अग्रेसर भूमिका घेतलेली आहे. 1977 मध्ये रोजगार हमी योजना विधेयक एकमताने मंजूर झाले. त्यावेळी कै. वि. स. पागे यांनी आपले असे मत व्यक्त केले होते की, "पुरोगामी विधेयकाला मांडण्यात आलेल्या सुधारणा या पुरोगामीच आहेत आणि ती सर्व आपली ध्येये आहेत. गावात सर्व व्यक्तींना काम मिळाले पाहिजे या ध्येयाप्रत आपल्याला वाटचाल करावी लागेल. ज्याला जे काम पाहिजे तेच आणि गावातच काम मिळेल अशा प्रकारची आपण वाट पाहात होतो म्हणून हे धोरण आपण सुरु केले." महाराष्ट्र शासन रोजगार हमी योजना चालवित आहेच पण आपण एमआरईजीएस सुध्दा चालवितो. यामध्ये आपण अत्यंत प्रगतिशील अशा प्रकारची पावले उचललेली आहेत. 2001-2002 मध्ये आपण 30 हजार 579 कामे पूर्ण केली. 16.2 कोटी मनुष्यदिवस रोजगार उपलब्ध केला. त्यावर 914 कोटी रुपये खर्च झाले. 2002-2003 मध्ये 42 हजार 500

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे ....

कामे पूर्ण केली. 2003-2004 मध्ये 68 हजार 382 कामे आपण पूर्ण केली. 2004-2005 मध्ये 74 हजार 724 कामे पूर्ण केली. 2005-2006 मध्ये 91 हजार 605 कामे पूर्ण केली. 2008 मध्ये राज्यामध्ये अशाच पध्दतीने 55 लाख जॉब कार्ड दिले. 27 हजार ग्रामपंचायतींपैकी 24 हजार 315 ग्रामपंचायतींमध्ये कोणतेही काम दिले जात नाही, या दृष्टीने लक्ष देणे गरजेचे आहे. जे केले त्याबद्दल अभिनंदन. थोड़ा है, थोड़े की जरुरत है. ती जरुरत पूर्ण करणे आणि मजुरांना मिळेल त्या ठिकाणी काम देणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे. त्या दृष्टीने याकडे पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, शिक्षणाच्या बाबतीत मी फक्त एकच सांगेन. मी केंद्र सरकारचेही अभिनंदन करीन की, त्यांनी घटना दुरुस्ती करुन शिक्षणाचा मूलभूत अधिकार दिला. पण महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाला शिफारस केली पाहिजे आणि आपणही निर्णय घेतला पाहिजे की, केवळ 6 ते 14 वर्षे वयोगटातील मुलांचीच काळजी घेऊन चालणार नाही आणि त्यांनाच अधिकार देऊन चालणार नाही तर शून्य ते सहा वर्षे वयोगटातील मुले सुध्दा यामध्ये समाविष्ट करुन घेतली जावीत, अशा प्रकारची दुरुस्ती केंद्र शासनाने करावी अशी शिफारस करावी तसेच महाराष्ट्र शासनाने वेगळा निर्णय घेऊन शून्य ते सहा वर्षे वयोगटातील मुलांच्या शिक्षणासाठी आपल्याला काही ना काही निर्णय घेणे गरजेचे आहे. शिक्षणावर शिक्षक प्रतिनिधी जास्त बोलतील. मी त्यांचा वेळ घेऊ इच्छित नाही.

सभापती महोदय, शिक्षण, आरोग्य, शेती आणि महिला यावर अर्थसंकल्पामध्ये तरतूद करीत असताना भरीव तरतूद करावयास पाहिजे. केंद्र सरकार आरोग्यावर एकूण अर्थसंकल्पाच्या 1 टक्का खर्च करते तर महाराष्ट्र शासन आरोग्यावर 0.5 टक्के खर्च करते. आपण देण्याची धडपड करतो परंतु यामध्ये कोठे तरी पुढे पाऊल टाकून अर्थसंकल्पात आरोग्यावर किमान 5 टक्क्यापर्यंत तरतूद ठेवण्याची गरज आहे. शिक्षणावर किमान 4 ते 5 टक्के तरतूद अर्थसंकल्पात करण्याची गरज आहे. शेतीला उद्योगधंद्याचा दर्जा देणे गरजेचे आहे. शेतीला उद्योगाचा दर्जा दिल्या शिवाय शेतकऱ्यांची कंबर मोडणे बंद होणार नाही आणि आत्महत्या थांबणार नाहीत. त्यांना जो जोडधंदा दिला जातो

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे .....

त्याची प्रगती कशी होईल हे पाहिले पाहिजे. दुधाचा धंदा आता खूप अडचणीत यावयास लागला आहे. म्हणून त्यांना जोडधंदे अधिक कसे देता येतील या दृष्टीने आपण प्रयत्न करणे गरजेचे आहे.

यानंतर मला महिलांच्या संदर्भात मुद्दा मांडावयाचा आहे. महाराष्ट्र हा शाहू, फुले, आंबेडकरांचा आहे. घटनेने आम्हाला जगण्याचा समान अधिकार दिलेला आहे. आता देशामध्ये महिलांची संख्या अर्धी आहे आणि स्त्रियांची संख्या अर्धी आहे असे म्हणता येत नाही. आता ती आकडेवारी संपलेली आहे. गर्भजल परीक्षेमुळे आणि गर्भपातामुळे स्त्रियांच्या जन्माचा दर 1 हजार पुरुषांच्या मागे 600, 700, 800, 900 असा झालेला आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे.....

ज्या महिला जन्माला येतात त्या अपघाताने जन्माला येतात. विलिंग्ली येत नाहीत. कोणत्याही आई-वडिलांना असे वाटत नाही की, आपल्याला कन्या रत्न झाले पाहिजे. मुलीचा गर्भ पाडू शकत नाही, म्हणजे महिला अपघाताने जन्माला येतात. जन्माला आल्यानंतर या देशातील पुरुषांना श्वास घेण्याचा जेवढा अधिकार तेवढाच अधिकार आम्हाला सुध्दा आहे. याची जाणीव महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आम्हाला करुन दिलेली आहे. आम्ही महिला आहोत याचा आम्हाला आनंद वाटतो. या देशातील महिलांना सुध्दा त्याचा स्वाभिमान वाटतो. आमच्यामध्ये श्रम करण्याची शक्ती आहे, बौध्दिक श्रम करण्याची शक्ती आहे. मानसिक श्रम करण्याची शक्ती आहे. आम्ही सकाळी 5 वाजल्यापासून रात्री 11-12 वाजेपर्यंत मेहनत करीत असतो. पण महिलांच्या श्रमाला मूल्य देण्याचे धोरण स्वीकारले जात नाही. महिलांच्या श्रमाला मूल्य व प्रतिष्ठा देण्याचे पाऊल टाकले जात नाही. शासनाने या संदर्भात पावले टाकली आहेत.

1994 साली आदरणीय श्री.पवार साहेब हे मुख्यमंत्री होते. त्यांनी त्यावेळी महिलांसाठी धोरण जाहीर केले होते. त्या धोरणाच्या प्रस्तावनेत माननीय श्री.पवार साहेब असे म्हणाले होते की, कायदे, तरतुदी, कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून समाज परिवर्तनाचा दृष्टीकोन समोर ठेवून त्याची अंमलबजावणी करण्याची मानसिकता समाज घटकाची जोपर्यंत होणार नाही तोपर्यंत स्त्रियांना समान दर्जा मिळणार नाही. हा लढा स्त्री मुक्तीचा नाही. स्त्री किंवा पुरुष विरोधाचा नाही तर हा लढा स्त्री समानतेचा आहे. जसा सावित्रीबाई फुले व ज्योतिबा फुले यांनी एक विचाराने संसार केला, विचारांचा संसार केला. अशा पध्दतीचा संसार समाजातील प्रत्येक स्त्री व पुरुषांनी करावा. ही अपेक्षा त्यावेळी ज्योतिबांनी व्यक्त केली होती. ती अपेक्षा पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्रात माननीय श्री.पवार साहेबांनी खूप पुरोगामी धोरणे राबविली. महाराष्ट्रात महिला आर्थिक विकास मंडळ आहे, महाराष्ट्रात महिला आयोग आहे. मी या आयोगाची चेअरमन होते. पण या आयोगासाठी पुरेशी तरतूद केली जात नाही. महिलांना आता को-पार्शन म्हणून मान्य केलेले आहे. वडिलांच्या प्रॉपर्टीत व आनुवंशिक प्रॉपर्टीमध्ये भावाबरोबर समान दर्जा देण्याची शासनाने कायद्यात दुरुस्ती केलेली आहे. 'घर दोघांचे' ही योजना सुरु केली आहे. ही योजना

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे....

महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात आलेली नाही, पण ग्रामीण भागात ती योजना सुरु झाली आहे. पण त्या कायद्याची अंमलबजावणी योग्य पध्दतीने होत नाही. आजही पीटीआर काढला तर त्यावर बाबाचेच नाव दिसून येते, पण दुर्दैवाने आमच्या भगिनीचे नाव त्यावर नसते. शाळेत आईचे नाव लावण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

सभापती महोदय, 'लक्ष्मी' नावाची योजना आहे. पूर्वी एखाद्या मुलीचे लग्न झाल्यावर जर तिने अर्ज केला तरच नवऱ्याच्या नावाबरोबर तिचे 7/12 वर नाव लावले जात होते. पण मागील दोन वर्षापूर्वी मी या संदर्भात प्रश्न उपस्थित केल्यावर माननीय महसूल मंत्र्यांनी असे जाहीर केले होते की, ती अट काढून टाकत आहोत. मुलीचे लग्न झाले की तिचे नाव 7/12 वर आले पाहिजे. अशा खूप योजना आहेत. हा पुरोगामी महाराष्ट्र आहे. मुलींना शासन सवलती देत आहे. मुलींना स्कॉलरशिप दिली जाते. महिलांसाठी आता 50 टक्के आरक्षण मिळणार आहे. या चळवळीतून या देशाला सक्षम करणारी महिला उभी राहील, महिला रडणारी असणार नाही. महिलांच्या विषयी एका ठिकाणी असे म्हटले गेले होते की,

मी एकटीच माझी असते कधी कधी
गर्दीत भोवतीच्या नसते कधी कधी

ही जी महिला आहे ती कधी कधी एकटी राहते. तिला सामुदायिकपणे देशाच्या विकासाच्या प्रक्रियेमध्ये आणण्याच्या कामासाठी या अर्थसंकल्पाकडे एक हत्यार म्हणून पाहिले जाईल अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करते आणि आपले रजा घेते. धन्यवाद.

-----

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : आता दुपारचे 2 वाजत आले आहेत. सभागृहाची बैठक आता स्थगित करावयाची की चर्चा पुढे सुरु ठेवावयाची ते मी सभागृहाला विचारु इच्छितो.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असता. )

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, ज्या सन्माननीय सदस्यांची भाषणे राहिली आहेत त्या सर्वांना बोलण्याची आपण संधी द्यावी.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, ज्या सन्माननीय सदस्यांना जायचे असेल त्यांना जाऊ द्यावे. आज आम्हाला बोलण्याची संधी द्यावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, ज्या सन्माननीय सदस्यांना भाषण करावयाचे आहे त्यांना बोलण्याची संधी आपण द्यावी. या चर्चेला उद्या उत्तर दिले जाणार आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते या दोघांनी आपल्याला आणि माननीय सभापतींना सुध्दा विनंती केली होती की, आज या चर्चेसाठी वेळ अपुरा पडत असेल तर उद्या काही सन्माननीय सदस्यांची भाषणे व त्यानंतर मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे. असे जर केले तर राहिलेल्या सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळू शकेल. आम्ही बाहेर पायरीवर बसलो होतो त्यावेळी सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी आमच्याबद्दल मत व्यक्त केले होते, त्यामुळे आज आम्ही त्यांचा विचार करुन बोलत आहोत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 14:00

**उप सभापती** : आता सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले हे शेवटचे वक्ते असतील. उर्वरित सन्माननीय सदस्यांना उद्या थोडा वेळ बोलण्याची संधी दिली जाईल आणि त्यानंतर मंत्री महोदयांचे उत्तर होईल. सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी आपले भाषण सुरु करावे.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रामनाथ मोते)**

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले (नामनियुक्त) : परम आदरणीय सभापती महोदय, सन 2011-12च्या अर्थसंकल्पावरील चर्चेमध्ये सहभागी होण्याची मला संधी दिली त्याबद्दल मी आपले मनापासून आभार मानतो.

सभापती महोदय, सर्वस्पर्शी अर्थसंकल्पाला स्पर्श करण्यासाठी मी उभा आहे. महाराष्ट्राच्या विविध भागातील सर्वसामान्य माणसांच्या गरजांचे प्रतिबिंब आपल्याला पहावयाचे असेल तर ते या अर्थसंकल्पामध्ये पहावयास मिळेल. हा अर्थसंकल्प म्हणजे सर्वसामान्य माणसांच्या गरजांचा प्रातिनिधिक अर्थसंकल्प आहे. सर्वसामान्य माणसांच्या गरजा या अर्थसंकल्पामध्ये पहावयास मिळतात. सर्वसामान्य माणसाचा गाभा म्हणजे हा अर्थसंकल्प आहे. कुटुंब प्रमुखाला दोन गोष्टी कराव्या लागतात. कुटुंबातील सदस्यांच्या गरजा आणि भावना यांचे नियोजन करुन कुटुंब चालवावे लागते. कुटुंबाचे वर्तमान, भविष्य आणि एकी ह्या गोष्टी कुटुंब प्रमुखाच्या नेतृत्वावर अवलंबून असतात. ज्या प्रमाणे या राज्याचा गाडा हाकत असताना महाराष्ट्रातील सर्वसामान्य माणसांच्या गरजा, महाराष्ट्रातील सर्व सामान्य माणसांच्या भावना आणि महाराष्ट्रातील सर्वसामान्य माणसाची श्रद्धा याचे प्रतिबिंब राज्यकर्त्यांच्या नीतीमध्ये प्रतिबिंबीत होणे आवश्यक असते त्या प्रमाणे मला वाटते या अर्थसंकल्पामध्ये त्या गोष्टी प्रतिबिंबीत झालेल्या आहेत.

सभापती महोदय, महाराष्ट्राचे भौगोलिक क्षेत्र 3.08 लाख चौ.कि.मी. आहे. देशामध्ये महाराष्ट्र राज्य हे लोकसंख्येच्या बाबतीत दुस-या क्रमांकावर आहे, उद्योगाच्या बाबतीत दुस-या क्रमांकावर आहे. एकूण देशाच्या लोकसंख्येपैकी महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या 9.4 टक्के आहे. महाराष्ट्रातील 42 टक्के लोक शहरात राहातात. महाराष्ट्राची औद्योगिक भरभराट वाखाणण्यासारखी आहे. राज्याच्या स्थूल उत्पन्नात 89 टक्के औद्योगिक आणि सेवा यांचा अंतर्भाव आहे, 11 टक्के कृषी आणि तत्सम सेवा यांचा हिस्सा आहे. राज्यातील लहान मोठ्या उद्योगांच्या माध्यमातून राज्याची आणखीन भरभराट होण्याच्या दृष्टीने राज्यकर्ते प्रयत्न करीत असल्यामुळे मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. महाराष्ट्र ही अध्यात्माची भूमी आहे. मानवता, सहिष्णुता हे आमचे अलंकार आहेत. आचार्य देवो भव ही आमची संस्कृती आहे.

...नंतर श्री. गिते...

प्रा. सुरेश नवले...

सभापती महोदय, "आचार्य देवो भव ", "मातृ देवो भव" आणि या पाहुण्यांना देखील आम्ही "अतिथी देवो भवो" (हा आमचा पठ्ठया शेवटचा वाघ इकडे आला. आता तिकडे वाघही शिल्लक नाही. वाघ जरी बाहेर वाढले तरी तिकडचा शेवटचा वाघ इकडे आल्यामुळे आता तिकडे वाघच शिल्लक राहिलेले नाही.)

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये मुस्लीम बांधवांचा विचार केला गेलेला आहे, या अर्थसंकल्पात हिंदुंचा विचार केला गेलेला आहे. या अर्थसंकल्प तयार करताना ज्ञानेश्वरापासून तुकारामापर्यंत व भंडारा डोंगरापासून सहयाद्रीच्या कोपऱ्यापर्यंत असा सर्वांगीण विचार करण्यात आलेला आहे. माननीय अर्थमंत्र्यांनी संपूर्ण महाराष्ट्रातील श्रध्दांचा विचार करुन हा अर्थसंकल्प या सभागृहात सादर केलेला आहे. भेदभाव आम्हाला मान्य नाही. विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म, भेदाभेद भ्रम अंमगळ. भेदावर राज्यकर्ते म्हणून आमचा विश्वास नाही. या राज्यामध्ये कोणी भेदाभेद करीत असेल तर त्यांच्याकडे दुर्लक्ष करुन विष्णुमंय जग यावर विश्वास ठेवून राज्यकर्ते राज्याचा कारभार करीत आहेत असा संकल्प या अर्थसंकल्पात सोडलेला आहे. म्हणून मी राज्यकर्त्यांना आणि आमच्या माननीय अर्थ राज्यमंत्र्यांना मनापासून धन्यवाद देतो.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील 2989 कोटी रुपयांची कर्ज माफी शेतकऱ्यांना महाराष्ट्र शासनाने दिलेली आहे. परंतु या कर्जमाफीच्या संदर्भात मात्र कोणीही उल्लेख करीत नाही. कर्जमाफीची एवढी मोठी रक्कम कोणा सदस्याला दिसू नये. वयाच्या चाळीशी नंतर डोळयांना नंबर लागतो. सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांना सोडले तर समोरच्या बाकांवर बसलेले बहुतांशी सदस्य चाळीशीतले आहेत. महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांना 2988 कोटी रुपयांची कर्जमाफी दिली आहे. हा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या बाबतीत अतिशय परिणामकारक निर्णय शासनाने घेतलेला आहे. शासनाने घेतलेल्या या निर्णयाबद्दल मी महाराष्ट्र शासनास धन्यवाद देतो.

सभापती महोदय, कृषी संजीवनी योजना चालू करुन महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना एक नवीन संजीवनी देण्याचा महाराष्ट्र शासनाने प्रयत्न केलेला आहे. महाराष्ट्र शासन नगर, जळगाव आणि नाशिक या तीन जिल्हयामध्ये निर्यात सुविधा केंद्र सुरु करणार आहे. आमच्या जिल्हयामध्ये सीताफळे अतिशय स्वादिष्ट, अतिशय रसपूर्ण आहेत. सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडेजी मी

2...

प्र.सुरेश नवले...

आपणास सांगू इच्छितो की, बीड जिल्हयात असे सांगितले जाते की, निजामाला स्वप्न पडले आणि त्यांच्या स्पप्नात सीताफळ आले. मग त्या निजामाने आपल्या बेगम सोबत बसून सीताफळ खाल्ले. " बेगम के साथ सिताफल खाया.". त्यामुळे बीड जिल्हयातील सीताफळाची निर्यात व्हावी म्हणून माझी राज्य शासनाला विनंती आहे की, ज्या गोष्टीचा मोह निजामाला सुध्दा पडला, त्या सीताफळाचा मोह राज्यमंत्र्यांना पडावा आणि एक निर्यात सुविधा केंद बीड येथे निर्माण करण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्नशील रहावे.

सभापती महोदय, अर्थसंकल्पात 745 कोटी रुपयांची रोजगार हमी योजनेसाठी तरतूद करण्यात आली आहे. त्यातील 223 कोटी विहिरींच्या कामांवर खर्च करण्यात येणार आहे. 134 कोटी रुपयांच्या माध्यमातून महाराष्ट्रात फळबागांचा कार्यक्रम राबविण्याचा शासन प्रयत्न करणार आहे. मला एका गोष्टीची खंत वाटते की, शासनाने शेततळयांसाठी 24 कोटी 32 लक्ष रुपयांची तरतूद केलेली आहे. ती तरतूद अतिशय तोकडी आहे. आपण सिंचनाच्या बाबतीत 19 टक्क्यांपर्यंत गेलेलो आहोत. महाराष्ट्रातील सिंचन क्षेत्र वाढवावयाचे असेल तर महाराष्ट्राला विहिरी आणि शेततळयां शिवाय पर्याय नाही. राज्यात शेततळी आणि विहिरींचा कार्यक्रम मोठया प्रमाणात हाती घेण्यात यावा अशी मी या निमित्ताने आग्रही मागणी करतो.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 14:10

प्रा.सुरेश नवले........

शेततळ्यांसाठी शासनाने जी तरतूद केली आहे ती वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत अशी मी आग्रहाची विनंती करीत आहे.

सभापती महोदय, संत गाडगे महाराजांनी महाराष्ट्रात अनेक ठिकाणी धर्मशाळा उभ्या केल्या. गाडगे महाराजांना माहित होते की, खेडेगावातून शहरांमध्ये येणाऱ्या गरीब माणसाला राहण्याची सोय नसते. त्यामुळे शासनाने गरीब रुग्णांच्या नातेवाईकांना रुग्णालय परिसरात राहण्यासाठी सोय व्हावी याकरिता 24 कोटी रुपयांची तरतूद केली त्याबद्दल मी शासनाला मनापासून धन्यवाद देतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र सरकारने बालकांना सक्तीचे शिक्षण देण्यासाठी केंद्र सरकारकडे 2025 कोटी रुपयांचा आराखडा सादर केला आहे. राज्याच्या अर्थसंकल्पात यासाठी 725 कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित केली आहे. महाराष्ट्रात मुंबई, ठाणे, पुणे या मोठ्या शहरांमध्ये जी मुले भीक मागतात, त्यांचा देखील या योजनेमध्ये अंतर्भाव करणे आवश्यक आहे. या भीक मागणाऱ्या मुलांच्या सक्तीच्या शिक्षणाची सोय कोण करणार आहे? या मुलांना भीक मागण्यास प्रवृत्त करणाऱ्या अनेक टोळ्या आहेत. या टोळ्यांचा बीमोड करुन भीक मागणाऱ्या मुलांकरिता सुध्दा सक्तीच्या शिक्षणाची सोय महाराष्ट्र सरकारने केली पाहिजे अशी आग्रही मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

सभापती महोदय, राज्याचे क्रीडा धोरण घोषित होत आहे. या क्रीडा धोरणामध्ये किती विद्यार्थ्यांमागे क्रीडा प्रशिक्षक नेमले जाणार आहेत यावर या विद्यार्थ्यांचे भवितव्य अवलंबून आहे. क्रीडा धोरण निश्चित करताना या गोष्टीचा प्राधान्याने विचार व्हावा. किमान 100 विद्यार्थ्यांमागे एक क्रीडा प्रशिक्षक नेमण्यात यावा. जेणेकरुन ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये महाराष्ट्र निश्चितपणे अग्रभागी असू शकेल. त्यादृष्टीने शासनाने संकल्प सोडावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र एकेकाळी कुस्तीमध्ये अग्रभागी होता. कै.मारुती माने यांना पाहिल्यानंतर प्रत्येक युवकाला स्फूर्ती वाटत असे की, आपणही कुस्ती खेळावी. 1982 मध्ये विद्यार्थी संस्थेचा अध्यक्ष असताना मी कै.मारुती माने यांना बलभीम महाविद्यालयामध्ये निमंत्रित केले होते. त्यांनी कोल्हापुरी भाषेत खुसखुशीत भाषण केले होते. एक पहिलवान कोल्हापुरी साज चढवून करवीर भाषेतून महाराष्ट्राच्या कुस्तीविषयी भाषण करतो हा अनुभव आम्ही घेतला.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ 14:10

प्रा.सुरेश नवले........

महाराष्ट्र शासनाने याची जाणीव ठेवून कवठेपिरान येथे त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ स्मारक उभे करण्याचा संकल्प सोडला आहे. हा संकल्प महाराष्ट्राला आदर्शवत ठरेल याबद्दल शंका नाही. तरुण पिढीला या स्मारकाकडे पाहून आपणही कुस्ती खेळावी असे वाटल्याशिवाय राहणार नाही. माननीय सदस्य श्री.पाशा पटेल हे जी कुस्ती खेळतात ती कुस्ती नाही. आम्हाला अपेक्षित असलेली ती कुस्ती नाही. मागील काळात श्रीकृष्णाने जी खेळली ती कुस्ती, रामायणात रामाने खेळली ती कुस्ती आम्हाला अभिप्रेत आहे. महाराष्ट्राच्या मातीतील कुस्तीला प्राधान्य देण्याचा शासनाने प्रयत्न केला आहे. कुस्तीगिरांच्या मानधनामध्ये वाढ करण्याचा शासनाने संकल्प सोडला आहे. ही वाढ किती असणार आहे हे मंत्री महोदयांनी स्पष्ट करावे, म्हणजे आमच्यासारख्या कुस्तीवर प्रेम करणाऱ्यांना आनंद वाटेल.

सभापती महोदय, भारतातील प्रत्येक माणसाला असे वाटते की, आपले स्वत:चे एक घर असावे. महाराष्ट्रातील अनुसूचित जाती, जमाती, नवबौध्द यांच्या घराचा प्रश्न निकाली काढावा म्हणून शासनाने 800 कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पामध्ये प्रस्तावित केली आहे. एक बंगला बने न्यारा. माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांचा बंगला मोठा असला तरी सर्वसामान्य माणसांचे घराचे स्वप्न साकार करण्याचा संकल्प माननीय वित्त मंत्री व वित्त राज्यमंत्री यांनी सोडला आहे त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो.

नंतर 2 झेड.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ पूर्वी श्री. भोगले...... 14:15

प्रा. सुरेश नवले .........

महोदय, राज्यात भटक्यांची संख्या खूप मोठ्या प्रमाणावर आहे. खेड्या-पाड्यात गेलो तर आपल्याला गावाच्या बाहेर पार बांधलेला असतो त्या पारावर लहान लहान मुले, ज्यांच्या नाकातून शेंबूड बाहेर येत असतो अशा अवस्थेत ही भटकी मुले दिसतात. या भटक्यांनाही स्वत:चे घर असावे हा संकल्प शासनाने या अर्थसंकल्पातून सोडलेला आहे. पण त्यासाठी फक्त 20 कोटीची तरतूद प्रस्तावित केली ती अतिशय कमी असल्याने भरीव वाढ करणे आवश्यक आहे.

महोदय, या राज्याला दिशा देण्याचे सामर्थ्य ज्या उद्योगामध्ये आहे त्या विभागाला माननीय राणे साहेबांच्या रुपाने एक वाघासारखे नेतृत्व मिळाले आहे. पण त्यासंदर्भात माझी अशी विनंती आहे की, एकूण नियतव्ययाच्या फक्त 0.6 टक्के म्हणजेच फक्त 400 कोटीची तरतूद उद्योग विभागासाठी केली आहे. खरे तर या विभागाला 4000 कोटीची तरतूद केली तरी ती कमीच पडणार आहे. पण 400 कोटीची तरतूद करुन "हत्तीसमोर किलोभर फुटाणे" ठेवण्याचाच हा प्रकार आहे. सुशिक्षीत बेरोजगारांचा प्रश्न सोडविण्याचे सामर्थ्य असलेल्या विभागाचा सहानुभूतीने विचार करावा व राज्यातील बेरोजगारीचा प्रश्न सोडून तरुणांना न्याय द्यावा अशी माझी आग्रहाची विनंती आहे. त्यासाठी उद्योग विभागाच्या तरतुदीमध्ये भरीव वाढ करण्याची गरज आहे.

महोदय, जो वडापाव राज्यातील लाखो गोरगरिबांचे अन्न आहे त्यावरील कर शासनाने 12.5 टक्क्यावरुन 5 टक्क्यावर आणला आहे.....अडथळा.....काही लोकांच्या मनात मात्र विकृती आहे व त्याचा परिपाक म्हणून या लाखो लोकांचे अन्न असलेल्या वडापावचे नाव शिववडा ठेवले. उद्या हे लोक भज्यांचे नाव सुध्दा बदलतील. यावरुनच त्यांची कल्पनाशक्ती खुंटली की काय अशी शंका येते. असा प्रयत्न करुन हे लोक अत्यंत खुळचट कल्पनेचा आविष्कार लोकांसमोर मांडण्याचा प्रयत्न करीत असतात, हे चुकीचे आहे. "वदनी कवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे" असा श्लोक आपण जेवणापूर्वी म्हणतो पण आता "वदनी वडापाव घेता नाम घ्या अर्थमंत्र्यांचे" असे लोक म्हणू शकतील म्हणून माझी विनंती आहे की, वडापाव हा पूर्णपणे करमुक्त करावा.

महोदय, राज्यात वाघांची संख्या वाढल्याचे समजते. वाघाचे दर्शन घडावे म्हणून शासनाने या अर्थसंकल्पात संकल्प केलेला आहे. पण मी अगोदरच सांगितले की, तिकडच्या बाजूचे सर्व वाघ इकडे आले आणि आता शेवटचा एक वाघ सुध्दा सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकरांच्या

....2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .........

रुपाने नुकताच इकडे आलेला आहे. अजून एक दोन वाघ आहेत पण त्यांची नखे काढून ताईंच्या हातात दिलेली आहेत. त्यामुळे "या चिमण्यांनो परत फिरा" म्हणायची वेळ आली आहे. राज्यातील एकूण चिमण्यांची संख्या पाहिली तर अतिशय भयावह आहे. पूर्वी दारात चिमण्या यायच्या, चिवचिवाट करायच्या, चिमणा-चिमणीची प्रणय दृश्ये पहायला मिळायची परंतु आता दुर्दैवाने कुठलेही दृश्य आणि चिवचिवाट सुध्दा पहायला मिळत नाही. म्हणून "चिमण्यांना परत फिरा" म्हणायची वेळ आली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले....

त्यामुळे चिमण्यांच्या संदर्भातील विचार शासनाने करावा व महाराष्ट्रातील पर्यावरण साधण्याचा संकल्प सोडावा अशी आग्रहाची विनंती करतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने 60 अब्ज घन फूट पाणी अडवण्याचा निर्णय घेतलेला आहे. यामध्ये 150 प्रकल्प घेतले जाणार असून 2 लाखा पेक्षा अधिक हेक्टर जमीन ओलिता खाली आणली जाणार आहे. त्यामुळे विरोधी पक्षातील सदस्य कावले, त्रागा करु लागले, तापले तर या पाणी साठयाचा उपयोग होऊ शकेल. त्यांना पुरुन उरेल इतके हे पाणी आहे.

सभापती महोदय, विदर्भाचे कविवर्य विठ्ठल वाघ असे म्हणतात की,

"पाय पडता पाण्यात,
पाणी शहारलं होतं
भारी शरमल होत,
लई वरमल होतं."

त्यामुळे या पाण्याचे ऐश्वर्य जर शेतीला लाभले तर शेतीची सुपिकता अजून वाढू शकते व त्यापासून महाराष्ट्राचे नवनिर्माण घडू शकते. महाराष्ट्र शासनाने पुनर्निर्माण करण्याचा संकल्प सोडलेला असल्यामुळे मी महाराष्ट्र शासनास मनापासून धन्यवाद देतो व आपली रजा घेतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र...

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्री. रामनाथ मोते) : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे.

उद्या गुरवार, दिनांक 31 मार्च, 2011 रोजी सकाळी 10.30 वाजता सभागृहाची विशेष बैठक घेण्यात येणार असून सदर बैठकीत महाराष्ट्र विधान परिषद नियम 101 अन्वये लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.45 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 2 वाजून 22 मिनिटांनी, गुरुवार, दिनांक 31 मार्च, 2011 च्या सकाळी 10.30 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही